एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, बुधवार ६ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-६२, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 62 Marathi - Daily - Mumbai, 6 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in
Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
ड्रायव्हरचा मुलगा आता आमदार!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### तत्काल पासपोर्टसाठी ९ मे रोजी सरकारची विशेष मोहीम

**मुंबई -** तत्काल पासपोर्टसाठी प्रलंबित असलेल्या अर्जांचा वेगाने निपटारा करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाकडून येत्या ९ मे रोजी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. या मोहिमेत मुंबईच्या



विभागीय पासपोर्ट कार्यालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेली सर्व पासपोर्ट सेवा केंद्रे ९ मे रोजी शनिवार असूनही सुरू राहणार आहेत. या दिवशी फक्त तत्काळ पासपोर्टसाठी करण्यात आलेल्या अर्जांचा निपटारा करण्यात येणार आहे. यामध्ये मालाड, अंधेरी, लोअर परेल, ठाणे व नाशिक येथील पासपोर्ट सेवा केंद्रांचा समावेश आहे. तत्काळ पासपोर्ट अर्ज प्रलंबित असलेल्या अर्जदारांना कार्यालयात हजर राहण्यासाठी आज विभागीय पासपोर्ट कार्यालयाच्या अधिकृत पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन अपॉइंटमेंट देण्यात आल्या आहेत.




### टीसीएसच्या ४ आरोपींना १४ दिवसांची कोठडी

**नाशिक -** नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीत घडलेल्या लैंगिक अत्याचार व बळजबरीने धर्मांतर प्रकरणातील ४ मुरव्य आरोपींना आज न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणातील चार मुरव्य आरोपी तौसिफ अत्तार, दानिश शेख, शाहरुख कुरेशी व रझा मेमन यांची पोलीस कोठडी आजपर्यंत होती. त्यामुळे आरोपींना आज न्यायालयात हजर करण्यात आले होते.

# लैंगिक शोषणातील आरोपींना यापुढे पॅरोल नाही
## नसरापूर घटनेनंतर सरकारचा कठोर निर्णय

■ मुंबई

**पुण्याच्या** भोर तालुक्यातील नसरापूर येथील एका साडेतीन वर्षीय चिमुकलीवर एका ६५ वर्षीय नराधमाने बलात्कार करून तिची दगडाने ठेचून हत्या केल्याच्या संतापजनक घटनेनंतर आरोपीला कठारोत कठोर शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी राज्यभरातून होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीत फडणवीस यांनी लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल देता येणार नाही, अशा प्रकारची कायदेशीर तरतूद करण्याची घोषणा करत विधी व न्याय विभागाला तसे निर्देश दिले. ते म्हणाले, लैंगिक प्रकरणातील ८० ते ९० टक्के आरोपी हे त्याच गुन्ह्यांत अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात. पॅरोलवर सुटल्यानंतर ते पुन्हा तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात सरकारने



**पुणे जिल्ह्यातील नसरापुरात साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवरील बलात्कार व हत्या प्रकरणामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाची अत्यंत गंभीर दखल घेत सरकारने आता विधी व न्याय विभागाला लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात. त्यानंतर पुन्हा ते तोच गुन्हा करतात. त्यामुळे या आरोपींना पॅरोल नको, अशी भूमिका सरकारने घेतली आहे.**

यासंबंधी एक कायदा केला होता. हा कायदा दोन-तीन वर्षे अस्तित्वात होता. पण नंतर तो न्यायालयाने रद्दबातल केला. आता यावर कोणताही पर्याय नसताना पुन्हा नव्याने कठोर कायदा तयार करावा, असे निर्देश विधी व न्याय विभागाला दिले आहेत.

नसरापूरची घटना घडल्यानंतर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले होते की, मी पीडितेच्या वडिलांशी बोललो आहे. मी त्यांना समजावून सांगितले आहे की, आपल्याला नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा करून घ्यायची आहे. त्यासाठी वेळेत आरोपपत्र दाखल होणे व केस चालणे महत्त्वाचे आहे. या प्रकरणी हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टीला फास्ट ट्रॅकवर नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. नराधमाला भरचौकात फाशी द्यावी, असे वाटले तरी » पान २ वर

### नराधमाला हालहाल करून संपवा! राज ठाकरेंचा संताप

मनसे प्रमुख ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत नसरापूर घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, या घटनेने शब्दश: मनाचा थरकाप उडाला आणि भयानक चीड आली. या आरोपीला सरकारने कायदा काय सांगतो किंवा अजून कोण काय म्हणेल याचा विचार न करता हालहाल करत संपवावे. सरकार अशा घटनांमध्ये जेव्हा फास्ट ट्रॅक पद्धतीने कारवाई करू म्हणते, तेव्हा सरकारने फास्ट ट्रॅकची व्यारव्या पण सांगावी. कारण अशा घटना घडल्यानंतरच सरकारला जाग येते. महाराष्ट्रात मुली, स्त्रिया पळवून नेण्याचे, त्यांचे शोषण करण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे आणि असा नाही ते एरवाद्या वर्षीच वाढत आहे, तर ते वर्षागणिक वाढत आहे, याचा अर्थ कायद्याचा धाक अजिबात उरलेला नाही. त्यात या घटनेनंतर नसरापूर परिसरात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर लाठीमार केल्या गेल्याच्या बातम्या पण आल्या. ही तत्परता स्त्रियांचे, मुलींचे शोषण करणाऱ्यांच्या विरोधात सरकार का दारववत नाही? » पान २ वर



## हरलो नाही, आम्हाला हरवले राजीनामा द्यायचा प्रश्नच नाही
### ममता बॅनर्जींचा आरोप

**पश्चिम बंगाल निकालानंतर राजकीय वातावरण तापले असून, ममता बॅनर्जींनी भाजपावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, आम्ही निवडणूक हरलो नाही, आम्हाला कट रचून हरवले गेले. त्यामुळे मी राजभवनात जाऊन राजीनामा देणार नाही. आम्हाला पराभूत करण्याचा प्रयत्न झाला आहे. भाजपा निवडणूक आयोगाच्या माध्यमातून आम्हाला अधिकृतपणे पराभूत करू शकते, पण आम्ही नैतिकदृष्ट्या निवडणूक जिंकली आहे.**



■ कोलकाता

**पश्चिम** बंगालसह पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल काल जाहीर झाले. बंगालमध्ये भाजपाने २९४ पैकी २०७ जागा जिंकून पहिल्यांदाच सत्ता मिळवली आहे. तर ममता यांच्या तृणमूलला केवळ ७८ जागा मिळाल्या. १५ वर्षांनंतर ममता बॅनर्जींची सत्ता गेल्यामुळे ममता संतप्त झाल्या आहेत. त्यांनी आज भाजपावर अनेक आरोप केले. ममता बॅनर्जी म्हणाल्या की, मी का जाऊ? आम्ही हरलोच नाही. जिंकलो असतो तर शपथेपूर्वी राजीनामा दिला असता. आता राजभवनात जाण्याचा प्रश्नच नाही. ते चोरी करून जिंकले म्हणून मला राजीनामा द्यावा लागेल असे त्यांना वाटत असेल, तर तसे होणार नाही.

ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगावरही आरोप केले. त्या म्हणाल्या की, भारतीय जनता पार्टी आणि भारत निवडणूक आयोग यांच्या संगनमतातून हा निकाल लागला आहे. निवडणूक आयोगाने लोकांचे संविधानिक अधिकार हिरावून घेतले आणि ईव्हीएममध्ये गैरव्यवहार केला. मतदानाच्या दोन दिवस आधी आमच्या कार्यकर्त्यांना अटक करून छापे टाकण्यात आले. आयपीएस आणि आयएएस अधिकाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर बदल्या करण्यात आल्या. एसआयआरच्या नावाखाली १०० जागा लुटल्या. एसआयआर प्रक्रियेत ९० लाख नावे वगळण्यात आली होती. न्यायालयात गेल्यानंतर ३२ लाख नावे पुन्हा समाविष्ट करण्यात आली. भाजपा अतिशय कपटी खेळी खेळली. » पान ७ वर

## मेहली मिस्त्रींचे विरोधात मतदान
### श्रीनिवासन, सिंग टाटा ट्रस्टमधून बाहेर

■ मुंबई

**टाटा** ट्रस्टमधील सत्तासंघर्षात आता नवे वळण आले आहे. सहविश्वस्त मेहली मिस्त्री व जे. एन. मिस्त्री यांनी टीव्हीएस मोटरचे चेअरमन वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांना टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्टमध्ये पुन्हा नियुक्त करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात मतदान (व्हेटो) केले आहे. त्यामुळे श्रीनिवासन आणि विजय सिंग यांना ११ मे रोजी टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्तपद सोडावे लागणार आहे.

श्रीनिवासन आणि सिंग यांचा सध्याचा कार्यकाळ पुढील रविवारी संपणार असून, ट्रस्टच्या नियमांनुसार, कोणत्याही विश्वस्ताचा कार्यकाळ वाढवण्यासाठी 'सर्वानुमते संमती' अनिवार्य आहे. मात्र, दोन विश्वस्तांनी विरोधात मतदान केल्यामुळे वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांचे पुन्हा विश्वस्त होणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे. टाटा ट्रस्टकडे टाटा सन्स मधील सुमारे ६६ टक्के हिस्सा आहे. ती टाटा उद्योग समूहाची होल्डिंग कंपनी आहे.

श्रीनिवासन आणि सिंग यांनी एकमेकांच्या पुनर्नियुक्तीच्या बाजूने मतदान केले होते. मात्र मेहली मिस्त्री यांनी दोघांच्या विरोधात मतदान केले. एका व्यक्तीच्या विरोधी मतामुळेच त्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला होता. इतर विश्वस्तांमध्ये नोएल टाटा (टाटा ट्रस्टचे अध्यक्ष) आणि जहांगिर मिस्त्री यांनी मतदान केले नव्हते. » पान ५ वर

## पाच राज्यांची निवडणूक संपताच भाजपाची गोव्यासाठी तयारी सुरू

■ पणजी

**पाच** राज्यांतील विधानसभा निवडणुका पार पडताच आता पुढील वर्षी गोव्यात विधानसभा निवडणुकीची तयारी भाजपाने सुरू केली आहे. यासाठी



पक्षाचे नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि इतर राष्ट्रीय नेते गोव्यात येणार आहेत. राज्यात सलग चौथ्यांदा सत्तास्थापन करण्याचे भाजपाचे लक्ष्य असून, संघटनात्मक फेरबदल आणि मजबुतीकरणावर भर दिला जात आहे.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी नुकतीच दिल्लीत केंद्रीय नेतृत्वाची भेट घेऊन मंत्रिमंडळ फेरबदल आणि संघटनात्मक विस्तारावर चर्चा केली. या बैठकीत संघटना मजबूत करण्यासोबतच विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा झाली. नितीन नबीन यांनी त्यांना अल्पसंख्याक समुदायाशी संपर्क वाढवण्याचे आणि भाजपासाठी पाठिंबा मिळवण्याचे निर्देश दिले आहेत. दिल्ली भेटीत आगामी निवडणुकीबाबत राष्ट्रीय अध्यक्षांशी चर्चा झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी स्वतःच दिली आहे. त्यांनी केंद्रीय नेते लवकरच गोव्यात येतील, असेही सांगितले आहे.

## आधार जनहित याचिकेबाबत निर्णय सरकारवर सोपवला



■ नवी दिल्ली

**बेकायदेशीर** स्थलांतरितांकडून होणारा गैरवापर रोखण्यासाठी, नवीन आधार कार्ड केवळ सहा वर्षांखालील मुलांनाच जारी करण्याची मागणी करणारी जनहित याचिका वकील अश्विनी कुमार उपाध्याय यांनी दाखल केली आहे. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने निकाली काढताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, सहा वर्षांपर्यंतच्या नागरिकांनाच नवीन आधार कार्ड देण्याबाबतचा मुद्दा सोडवण्यासाठी विधिमंडळाच्या हस्तक्षेपाची आणि विद्यमान कायद्यात योग्य दुरुस्तीची गरज आहे.

या याचिकेत म्हटले होते की, सध्याच्या पडताळणी प्रक्रियेचा फायदा घेत घुसखोर सहजपणे आधारकार्ड मिळवतात. त्यानंतर तेच आधार वापरून रेशनकार्ड, जन्म प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, वाहन परवाना यांसारखी कागदपत्रे मिळवून ते भारतीय नागरिकांप्रमाणेच वावरू लागतात. परदेशी नागरिकांसाठी वेगळी श्रेणी असली तरी, घुसखोर भारतीय नागरिकांच्या श्रेणीत अर्ज करून सहज आधार मिळवतात.

३१ मार्च २०२६ पर्यंत सुमारे १४४ कोटी आधार क्रमांक जारी झाले आहेत. त्यामुळे बहुतांश नागरिकांकडे आधीच आधार असल्याने आता केवळ नवजात आणि लहान मुलांनाच आधाराची गरज आहे. त्यामुळे ६ वर्षांपर्यंतची मर्यादा निश्चित करणे वाजवी आहे. या याचिकेवरील सुनावणीत सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने म्हटले की, याचिकाकर्त्याने या सर्व मुद्यांकडे राज्य सरकार आणि इतर संबंधित पक्षांचे लक्ष वेधणे हा योग्य मार्ग ठरेल.

## शिर्डी जमीन गैरव्यवहार प्रकरणी खरातला ९ मेपर्यंत पोलीस कोठडी

■ नाशिक

**शिर्डी** जमीन गैरव्यवहार प्रकरणात भोंदू अशोक खरात याला राहाता न्यायालयाने ९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील चार दिवस पोलिसांकडून त्याची कसून चौकशी केली जाणार आहे. नाशिकमधील अत्याचार प्रकरणाशी संबंधित असलेल्या या प्रकरणात जमीन खरेदी आणि अवैध सावकारीचे आरोप असून, शिर्डी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला आज राहाता सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. सरकारी वकील ॲड. गौरव बोर्डे यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, आरोपीने जमीन व्यवहारासाठी एवढी मोठी रक्कम कुठून आणली, याचा तपास करणे आवश्यक आहे. तसेच विविध पतसंस्थांमधील अनेक खात्यांद्वारे मोठ्या प्रमाणात व्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला. एकूण १४ व्यवहारांमधून सुमारे ५ कोटी ५२ लाख रुपयांची उलाढाल झाल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक निवांत जाधव यांनी न्यायालयात सांगितले की, गुन्हा गंभीर असून, आरोपीकडून सखोल चौकशी आवश्यक आहे.

## उबाठा खासदाराच्या अपघातग्रस्त पत्नीची विचारपूस करण्यासाठी शिंदे रुग्णालयात

■ मुंबई

**उबाठा** गटाचे ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांच्या पत्नी पल्लवी पाटील यांचा अलीकडेच अपघात झाला. त्या सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. ही गोष्ट कळताच एकनाथ शिंदे आज संजय दिना पाटील यांच्या पत्नीच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी मुलुंड येथील फोर्टिस रुग्णालयात गेले. एकनाथ शिंदे यांनी त्यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. यानंतर पुन्हा एकदा ऑपरेशन टायगरची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

एकनाथ शिंदे यांनी अनेकदा राजकीय संघर्ष विसरुन यापूर्वीसुद्धा अनेक विरोधकांच्या अशा पद्धतीच्या भेटी घेतल्याची उदाहरणे आहेत. उबाठाचे खा.



संजय राऊत आजारी असताना शिंदे यांनी आमदार सुनील राऊत यांना फोन करून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. आता त्यांनी खा. संजय दिना पाटील यांची भेट घेतली आहे. गेल्या काही दिवसांपासून ठाकरेंचे खासदार फुटणार असल्याच्या बातम्या असताना एकनाथ शिंदे हे संजय दिना पाटलांच्या पत्नीची विचारपूस करण्यासाठी वेळ काढून रुग्णालयात गेल्याने राजकीय कुजबूज सुरू झाली आहे. काही दिवसांपूर्वीच ठाकरे गटाचे ८ खासदार कोणालाही सुगावा लागू न देता एकनाथ शिंदे यांना भेटल्याची चर्चा रंगली होती. या बातमीने मोठी खळबळ उडाली होती. ठाण्यातील व्होल्टास कंपनीच्या परिसरात रात्रीच्या सुमारास एकनाथ शिंदे हे ठाकरे गटाच्या खासदारांना भेटले. रात्री उशिरा सुरू झालेली ही बैठक पहाटेपर्यंत सुरू होती.

## साई रिसॉर्ट प्रकरणात आ. अनिल परब निर्दोष

■ रत्नागिरी

**रत्नागिरीच्या** दापोली तालुक्यातील मुरुड येथील गाजलेल्या साई रिसॉर्ट प्रकरणात उबाठा आमदार अनिल परब यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली. खेड येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने हा निर्णय दिला. यामुळे गेल्या काही वर्षांपासून चर्चेत असलेल्या या प्रकरणावर कायदेशीर पडदा पडला आहे. या रिसॉर्टच्या बांधकामावेळी विविध नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. यानुसार किनारपट्टी नियमन क्षेत्राशी संबंधित नियमांचे उल्लंघन, अपूर्ण इमारतीवर कर आकारणी, मुद्रांक शुल्क टाळणे, बनावट कागदपत्रे वापरणे आणि वीज जोडणीसाठी चुकीची माहिती देणे असे अनेक आरोप झाले होते. मात्र, न्यायालयात सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने मांडलेला युक्तिवाद निर्णायक ठरला. जमीन आणि बांधकाम हे दोन वेगवेगळे घटक असल्याचे स्पष्ट केले. तसेच सरकार पक्षाकडून सादर करण्यात आलेले पुरावे ठोस नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले.

## अहमदाबाद विमान अपघातामागे लिथियम बॅटरी दोष! वैमानिक निर्दोष
### वैमानिकांच्या संघटनांचा दावा

**अहमदाबाद येथे १२ जून २०२५ रोजी घडलेल्या एअर इंडियाच्या विमान अपघात प्रकरणी आता फेडरेशन ऑफ इंडियन पायलट्स या वैमानिकांच्या संघटनेने केंद्र सरकारला २१ पानांचे सविस्तर पत्र पाठवले आहे. या पत्रात हा अपघात वैमानिकाच्या चुकीमुळे नव्हे, तर विमानातील लिथियम बॅटरीमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळे गंभीर बिघाड होऊन झाला, असे म्हटले नाही.**

■ नवी दिल्ली

**१२ जून** २०२५ रोजी अहमदाबादहून लंडनकडे जाणारे बोईंग ७८७-८ प्रकारचे विमान उड्डाणानंतर काही



वेळातच वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहावर कोसळले होते. या भीषण दुर्घटनेत २४१ प्रवासी आणि इतर १९ जणांसह एकूण २६० जणांचा मृत्यू झाला होता. विमान दुर्घटना अन्वेषण विभागाने मागील वर्षी जुलै महिन्यात प्राथमिक अहवाल सादर केला होता. आता फेडरेशन ऑफ इंडियन पायलट्स या वैमानिकांच्या संघटनेने केंद्र सरकारला २१ पानांचे सविस्तर पत्र पाठवले. त्यात हा अपघात पायलट्सच्या चुकीमुळे नाही, तर विमानात बसवलेल्या लिथियम बॅटरीमधील बिघाडामुळे झाला असल्याचा दावा केला आहे. विमानाच्या लिथियम बॅटरीमध्ये शॉर्टसर्किट झाले होते. या शॉर्टसर्किटमुळे » पान ७ वर

## व्हाईट हाऊसजवळ पुन्हा गोळीबार
### चकमकीत संशयित हल्लेखोर जरवमी

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या उपस्थितीत हिल्टन हॉटेलमधील कार्यक्रमात झालेल्या गोळीबाराची घटना ताजी असताना सोमवारी पुन्हा एकदा व्हाईट हाऊसजवळ गोळीबार झाल्याने अमेरिकेत खळबळ उडाली आहे. व्हाईट हाऊस परिसरात एका बंदुकधारी हल्लेखोराने सिक्रेट सर्व्हिस एजंटवर गोळ्या झाडल्या. यावेळी झाडलेल्या चकमकीत हल्लेखोर जखमी झाला आहे. या घटनेमुळे व्हाईट हाऊसमध्ये काही काळासाठी शटडाऊन करण्यात आला होता.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



सिक्रेट सर्व्हिसचे उप संचालक मॅथ्यू क्विन यांनी पत्रकार परिषदेत या घटनेची माहिती » पान ७ वर

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

हाऊसकीपींग स्टाफ व महिला, पगार ग्रॉस- 15,473/-, वार्षिक बोनस, PF, ESIC लागू. संपर्क- CISB Services- **9867949433/ 8779462234.** {NC260395}

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वार्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC260340}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशियन पाहिजेत. चांगला पगार + आकर्षक सुविधा. संपर्कः- **9820683431** {NC260407}

कांदिवली (वेस्ट) पेस्ट कंट्रोल कामासाठी अनुभवी/ बिनअनुभवी मुले पाहिजेत. **9029181030** {NC260356}

दादर येथे कंपनीसाठी फ्रेश B.com Lady Account Assistant पाहिजेत. Tally Word Excel आवश्यक. संपर्कः- **02224228330 / 9987328717** {NC260416}

गोरेगाव येथे त्वरीत जागा भरणे आहे. स्टोअरकिपर आणि हाऊसकिपिंग सुपरवायझर, संपर्कः- **9987328717 / 02224228330** {NC260414}

अनुभवी (पार्ट टाईम अकाऊंटंट) तसेच वॉर्ड बॉय, नर्सेस पाहिजेत. भेटा- डॉ. खंडेपारकर नर्सिंग होम, सर भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी, दादर पूर्व मुंबई-४०००१४. वेळ - सकाळी ११.०० -१२.३० आणि सायंकाळी ७.००- ८.३०. email-apply. knh@gmail.com {NC260409}

सिक्युरिटी गार्डची भरती ड्युटी 8 तास मुलुंड, वैशाली नगर/ वरळीनाका- **9004883251** {NC260410}

भायखळा / माझगांव विभागात कुरियर डिलिव्हरीसाठी कमिशन / पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260413}

## पाहिजेत

कंपनीला बँक कामासाठी फुलटाईम/ पार्टटाईम मुले पाहिजेत पार्टटाईम बाईक राईडर्स पाहिजेत चांगला पगार अर्ज रेशनकार्डसहित भेटा- दुपारी 11 ते 9 स्पिडलिंक कुरीयर शॉप नं 3 आनंद अपार्टमेंट तेलीगल्ली क्रॉसरोड अंधेरी पूर्व{NC260261}

अलिबागयेथील रिसॉर्टकरिता 1) इलेक्ट्रिशियन पाहिजेत 2) गार्डनसाठी अनुभवी माळी पाहिजे. भेटा (12 ते 2 पर्यंत)- नार्वेकर कंपनी, अजंता अपार्टमेंट, कुलाबा बस स्टेशन/ ससून डॉक शेजारी, कुलाबा, मुंबई. {NC260396}

**सुप्रसिध्द ऑफसेट प्रिंटिंग प्रेसमध्ये त्वरीत पाहिजेत 4 कलर कोमोरी 28x40 ( ऑटो प्लेट ): प्रिंटर, फीडरमॅन, बॉयलर, सायपा कटिंग मशीन ऑपरेटर, ६ क्लॅम्प परफेक्ट बाइंडिंग ऑपरेटर**
**सुविधा- Tea, Snacks, OT: 1.5 Times ESIC, PF, BONUS, TRAVELLING**
**पत्ता: ई-११, प्लॉट नं. २३ ते २६, भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्क, नाशिक हायवे रोड जवळ, भिवंडी**
**9769706594**

परेल येथे ऑफीससाठी फ्रेशर्स ऑफीस असिस्टंट आणि मार्केटिंगसाठी पाहिजेत. **9920053121** {NC260362}

बँक जॉबसाठी मुला, मुलींची भरती. पगार 18800/- ते 35500/- **9021058575** {NC260362}

**कस्टम डिपार्टमेन्टसाठी हाऊसकिपींग सुपरवायझर, मुले पाहिजेत. पगार** २२०००/-. **7208551929 / 9702126571** {NC260380}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, पाहिजे संपर्कः **9820930362/ 9930589715** {NC260212}

## पाहिजेत

महाराष्ट्रीयन कुटुंबास घरकामासाठी बाई पाहिजे. ''माहेर'' पोर्तुगीज चर्च, दादर पश्चिम. **9869688244.** {NC260341}

कोपरखैरणे येथे 28x40 कोमोरी ४ कलर मशीनसाठी अनुभवी प्रिंटर व फिडरमन पाहिजे. संपर्क साई आर्टः **9820433552/ 9820542141** {NC260353}

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरला अदाणी इलेक्ट्रिसिटी कामासाठी वायरमन, इलेक्ट्रिशियन, सुपरवायझर इलेक्ट्रिकल, आयटीआय, प्रशिक्षित असलेले बोरीवली ते भाईंदर विभागात काम करण्यासाठी संपर्कः **7777045584, 8879966988** {NC260364}

कांदिवली चारकोपच्या अक्षरा हायस्कूल सेक्टर 8, येथे शाळेतील राखरखावकरिता अनुभवी माळी फुलटाईम पाहिजेत. त्वरित भेटाः अक्षरा हायस्कूल, प्लॉट नं.1, आरएससी 12, चारकोप सेक्टर 8, कांदिवली पश्चिम. मुंबई. फोनः **7393036036** {NC260322}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकींगसाठी मुले व मुली पाहिजे. जयगणेश मेटल प्रिंट, गाळा नंबर-६, बबनमिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर-२, गोरेगांव (पूर्व)- **9820382105/ 8879772701** {NC260204}

स्क्रीन प्रिंटर आणि स्टॉपरमॅन पाहिजे. जय गणेश मेटल प्रिंट, गाळा नंबर-६, बबन मिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर-२, गोरेगांव (पूर्व)- **9820382105/ 8879772701** {NC26020}

कॉटनग्रीनमध्ये प्रिन्टिंग प्रेसकरिता ४ कलर मशीनसाठी १) प्रोडक्शन सुपरवायझर कम प्रिंटर २) पंचिंग ऑपरेटर (फोइलिंग जाणणाऱ्यांना प्राधान्य), हेल्पर पाहिजेत. राहण्याची सोय. **7977798755** {NC260316}

घाटकोपर (असल्फा) प्रिंटिंग प्रेसमध्ये हेल्पर आणि ४ कलर ऑफसेट मशीनसाठी बॉयलर पाहिजेत. संपर्क वेळ ११.०० ते ७.००. फोन- **9819996770/ 9930861233** {NC260309}

पेस्ट कंट्रोल ऑपरेटरसाठी अनुभवी/ बिनअनुभवी कामगार पाहिजेत. गिरगांव **9820534868/ 9833832512** {NC260321}

प्रिंटिंग प्रेस बाईंडिंग विभागासाठी बाईंडर आणि हेल्परची आवश्यकता आहे. पत्ताः B-205, श्रेयस इंडस्ट्रियल इस्टेट, जय कोच, गोरेगाव (ईस्ट), मुंबई. संपर्क कराः **9664073035** {NC260328}

## पाहिजेत

Bhiwandi मधील SM74 2 Color मशीनसाठी अनुभवी Printer आणि Cutting मशीनसाठी ऑपरेटर पाहिजे. Mob. No.:- **9819453956/ 7045363180** {NC260360}

शिपिंग कंपनीकरिता ऑफिस बॉय (वय २५ वर्षांपेक्षा कमी) सीव्ही ईमेल करा ops@aindley.com Mob- **9819619626** {NC260372}

मुंबईमधील नामांकित कॉन्ट्रॅक्टरला फक्त मुंबईतील साईट करताच. इलेक्ट्रिशन, वायरमन, व हेल्पर त्वरित पाहिजेत पगार व गाडी भाडे दिले जाईल. संपर्क- **9819178977** {NC260370}

दुकानात काम करण्यासाठी मुलगा/मुलगी पाहिजे पत्ताः राजुभाई हरगोविंदास, शॉप नं.८, रूबी अपार्टमेंट, एम. व्ही. रोड, विशाल हॉलजवळ अंधेरी पूर्व, मुंबई ४०००६९ {NC260302}

साकीनाका, सफेदपुल येथील प्रिंटिंग प्रेससाठी अनुभवी सिलिंडर पंचींग ऑपरेटर पाहिजे. मनोज प्रिंटर्सः **9920350009** {NC260399}

Tally Operator आणि सेल्समन कमीत कमी 2 वर्षाचा अनुभव पाहिजे व Tally Prime चा अनुभव पाहिजे. मोबाईल - **9324706797 / 9821232807** {NC260400}

पॅथॅलॉजी लॅबसाठी रक्ताचे नमुने पिक-अप आणि ड्रॉपसाठी मुले/मुली पाहिजेत. पगार + पीएफ + मेडिकल बेनिफीट संपर्कः- **9321982254** (हितेश ठाणेकर) {NC260433}

रॉयल इंटरनॅशनल स्कूल, डोंबिवली (पूर्व) येथे हाऊसकिपिंग / शिपाई जेन्ट्स (पुरुष) अनुभवी काम करणारा कर्मचारी पाहिजेत. येताना टाईप केलेला अर्ज फोटो लावून व पॅनकार्ड, आधारकार्डची कॉपी सोबत आणावी. दि. ०९-०५-२०२६ (शनिवार) समक्ष भेटा. भेटायची वेळ- सकाळी १०-३, पत्ता - पी अ‍ॅण्ड टी कॉलनी, गांधीनगर, मानपाडारोड, डोंबिवली (पूर्व)- **8291990505 / 508 / 509.** {NC260429}

मिठाईच्या दुकानात अनुभवी Counter boy पाहिजे 12 तास घाटकोपर **9699927271** {NC260431}

अकाऊंट असिस्टंट फ्रेशर्स / अनुभवी पाहिजे. पगार - 15,000/- संपर्कः- 205, क्षितिज, अंधेरी स्पोर्ट कॉम्प्लेक्ससमोर, अंधेरी वेस्ट, **8369253099 / 9920171604** (भेटण्याची वेळ संध्याकाळी 4 ते 8) {NC260428}

## पाहिजेत

दादरला महिन्याच्या बाळाला सांभाळण्यासाठी तसेच वर कामासाठी २४ तासासाठी बाई, शिवाय नास्ता, जेवण बनवण्यासाठी वेगळी बाई पाहिजे. उत्तम पगार, संपर्कः- **9323912681** {NC260430}

कलर लॅबसाठी ऑफिस बॉय पाहिजेत. वय १८ ते ३५, दादर ठाणे राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्कः- **9819043753 / 9930147586.** {NC260427}

सिव्हील, प्लंबिंग कामासाठी हेल्पर आणि ट्रेनी हवेत. तंबाखू व दारूचे व्यसन नको. वय १८ ते २५ शुक्रवार ८ मे रोजी सायंकाळी ६ ते ८ प्रत्यक्ष भेटावे. व्ही. आर. मराठे, ऑफिस क्र.५ व ६, पूर्ती, १३५ सेनापती बापट मार्ग, माटुंगा रोड (पश्चिम रेल्वे), फोन- **9324860050** {NC260426}

दादर (वेस्ट) गारमेन्ट दुकानासाठी सेल्सगर्ल / सेल्समेन पाहिजेत. पगार- १२,०००/- पासून (वेळः- १०-९) **9867207299 / 9821822492** {NC260425}

डिलिव्हरी बॉयस आणि सेल्समन पाहिजे. वय २५ ते ४०, बायोडाटा पाठवा- **8850835942** {NC260424}

घरी काम करायला जोडपे पाहिजे. राहायची आणि खायची शाकाहारी सोय. बाई घरी काम करेल, पुरुष ऑफिसमध्ये काम करेल. पगार- २०,०००/- फोन- **9820355492** {NC260418}

पाहिजे प्यून ऑफिस व हाऊसकिपिंगसाठी भेटाः सांताक्रूझ पूर्व पगार- 13,000- 15,000 फोन **9920078150 / 9320214111**{NC260419}

विलेपार्ले अंधेरी बोरिवली शाळा कॉलेज सोसायटीमध्ये हाऊसकिपिंगसाठी मुले किंवा मुली पाहिजेत. फोन- **9224272537** {NC260420}

''कालबादेवीमध्ये ऑफिस कामासाठी SSC (पास/ नापास) मुली पाहिजे (वयः 18-25)'' :- **9820338880** {NC260421}

वाईन शॉपकरिता पाहिजेत. काऊन्टर सेल्समॅन- पगार १५,०००/- अतिरिक्त. हेल्पर कम प्यून / हाऊसकिपिंग- पगार १२,०००/- अतिरिक्त. वय २०/३५ वर्ष. संपर्कः- - राजेंद्र **9833590966 / 7666661910.** मॉडर्न वाईन्स, अमर कुंज, ३७७, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम) {NC260422}

हेल्पर पाहिजे राहण्याची जेवणाची सुविधा. अंधेरी **9769891697,** पॅकिंग गर्ल्स पाहिजे. {NC260440}

## पाहिजेत

सतगुरू इंटरप्राईज कंपनीकरिता विलेपार्ले येथे नामांकित शाळा / कॉलेज मध्ये त्वरित प्यून पाहिजेत. (वयोमर्यादा-४५ वर्षापर्यंत) पत्ताः- 414-E / 4 था माळा, झी-शान, opp. सनसिटी सिनेमा, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व) Email: satguruenterprise1@gmail.com, **9326007480 / 9820426010** {NC260436}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

किमान २ वर्षांचा अनुभव असलेला पुरुष उमेदवार हवा. विरार कार अ‍ॅक्सेसरीज शोरूमसाठी संपर्कः- **9834141058** {NC260442}

प्रिंटिंग प्रेससाठी पाहिजेत डिलिव्हरीबॉय, डीटीपी ऑपरेटर, अकाऊंटंट. संपर्कः- क्रियेटिव्ह आर्ट, युनिट 41, ओल्ड रामगोपाळ इंडस्ट्रीयल इस्टेट, जवाहर टॉकिजसमोर, डॉ. आरपी रोड, मुलुंड (पश्चिम) **9892270217 / 8976167616 / 9222806020** {NC260434}

चष्म्याच्या दुकानात मुलगा / मुलगी पाहिजे. १२ वी पास वयोमर्यादा ३५, पगार- १५,०००/- चर्नीरोड **9820835457** {NC260435}

दीप्ती एअर सिस्टिम्स आसनगाव येथे फॅब्रिकेशन कामासाठी आर्क वेल्डर्स आणि हेल्पर्स पाहिजे. **7039364173** {NC260437}

स्त्री-पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा- **7040206848** {NC260438}

दहिसर ईस्ट मध्ये अनुभवी ड्रायव्हर कम ऑफिस असिस्टंट पाहिजे. पगार योग्यता अनुसार संपर्कः- गिरीशभाई - **9820006915** {NC260441}

नवीन न्यूज पेपर मार्केटींग कामासाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे. **9892687313 / 9082356927** {NC260443}

ड्रायव्हर पाहिजे, कंपनीच्या ऑफिससाठी, कायमस्वरूपी, सर्व फायद्यांसहित. उत्तम वेतन. 30,000/- संपर्कः- **9324804788** {NC260444}

बांद्रा (पूर्व)/ठाणे (माजिवाडा) येथे फ्लॅट साफसफाई कामासाठी मुले / मुली पाहिजेत, सुपरवाईझर पाहिजे. पगारः- 15,000/- सुपरवाईझर :- 20,000/-, **7028463942** {NC260445}

पाहिजेत हाऊसकिपिंग कम ऑफिस बॉय, वय ४५ वर्षे पर्यंत, इंडकॉन, जे. बी. नगर, अंधेरी पूर्व, संपर्कः- **9892846010** {NC260446}

## पाहिजेत

सुप्रसिद्ध ज्वेलरीच्या शोरूमसाठी अनुभवी / बिनअनुभवी काऊंटर सेल्सगर्ल आणि टॅलीचे ज्ञान असणारे बिलिंगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. वय ३५ पर्यंत. बायोडेटा फोटो सोबत प्रत्यक्ष भेटा, सकाळी ११ ते २ पर्यंत. भारती ज्वेलर्स - भाग्य हेरिटेज, १ ली गांवठन लेन, शबरी हॉटेल जवळ, सांताक्रूझ वेस्ट - **9820676717** {NC260447}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260448}

ड्रायव्हर पाहिजे. विक्रोळी येथील कुटुंबासाठी जवळच्या भागात राहणारा अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. इनोव्हा कार, वयोमर्यादा ५० वर्षांपेक्षा कमी असावी. कामाची वेळ सकाळी ७ ते दुपारी ३, साप्ताहिक सुट्टी शनिवार. मासिक पगार रु. २०,०००/- अर्जदाराकडे स्वतःची वैयक्तिक ओळखपत्रे असावीत. संपर्कः- श्री. नीलवर्ण- **7977770155.** {NC260449}

पाहिजेत लॉजमध्ये रूम साफ + इतर किरकोळ कामासाठी मुलगा सकाळी 7 ते 2, रु. 12,000/- + पास भेटा : लक्ष्मी लॉज माटुंगा (पूर्व) मो. **7304554988** {NC260450}

कोमोरी फोर कलर प्रिंटर, फिडरमॅन, बॉयलर, पेपर कटिंगसाठी बाईंडर, पंचिंग मशीन व लॅमिनेशन मशीन ऑपरेटर पाहिजेत. श्री साई ग्राफिक्स मानकोली नाका भिवंडी. मो. नं. **9167736969** {NC260451}

अंबरनाथ येथे वायरमन आणि हेल्पर पाहिजे. संपर्कः- **8698832194** {NC260013}

बांद्रा ते भाईंदर विभागाकरिता गॅस मीटर रिडींगसाठी मुले पाहिजेत. per visit 30/- **9820385767** {NC260452}

डेटा एंट्री ऑपरेटर आणि डी.टी.पी. ऑपरेटर पाहिजे. संपर्कः- प्रकाश- **9820795030** {NC260453}

बुकिंग क्लार्क (पुरुष) पाहिजे. कोंडुसकर ट्रॅव्हल्स प्रा.लि. दादर (ऑफिस) **9321180999** वाशी (सानपाडा- ऑफिस) **9594930309** {NC260452}

## Situation Vacant

Required office assistant at kandivali call **9869423657** {NC260386}

Reqd Tally operator with accounting knowledge at our Kandiwali West office. Call: **9820080461** {NC260369}

## Situation Vacant

Need delivery boy male king circle contact Mahavir Mobile- **9137221274** {NC260423}

SDA PRODUCT BORIVALI (WEST) REQUIRED 1/3 YEARS EXPERIENCE TALLY OPERATOR, HAVING KNOWLEDGE OF GST compliance, Finalisation of accounts, PREFREABLY DAHISAR TO KANDIVALI: **9930160151, 9137849839,** sales@sdagroup.in {NC260391}

## Situation Vacant

Wanted computer operator, Peon, Accountant, students, male female Retired person **9167683051** {NC260432}

## गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3,000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9076403434 / 8652643434** {NC260411}

**-: वाचकांना सूचना :-**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# लैंगिक शोषणातील आरोपींना यापुढे पॅरोल नाही

पान १ वरून

लोकशाहीत ते करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण कुणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये, यासाठी कोणतीही पळवाट न ठेवता त्याला मृत्यूदंडाची शिक्षा कशी होईल याचा प्रयत्न राज्य सरकार करेल.

नसरापूर बलात्कार-हत्या प्रकरणातील आज आरोपीच्या कुटुंबियांनीही त्याच्या कृत्यावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. आरोपीची पत्नी म्हणाली की, त्या बाळाची हत्या झाली त्याच ठिकाणी त्याला तसेच ठेचून मारले पाहिजे. मला त्याचे तोंडही पाहायचे नाही. त्याचा अंत्यविधी झाल्याचेही मला कुणी सांगू नका. मागील १० वर्षांपासून तो आमच्या संपर्कात नाही. त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. फक्त फाशी नाही, त्याला ठेचलाच पाहिजे. जिवंत जाळला पाहिजे. त्यानंतरही माझ्या मनाची झालेली आग शांत होणार नाही. त्याचे नाव आमच्या नावाला जोडले गेले आहे. त्यामुळे आम्हाला लोकांचे बोल ऐकून घ्यावे लागत आहेत.

तर आरोपीचा मुलगा म्हणाला की, माझा बाप म्हणवून घेण्याचीही मला लाज वाटत आहे. त्या चिमुकलीशी त्याने अमानुष कृत्य केले. त्याला कठोरात कठोर शिक्षा द्यायला हवी. विशेषतः त्याला त्याच ठिकाणी ठेचून मारून त्या चिमुकलीला न्याय दिला पाहिजे. नसरापूर येथील घटनेच्या निषेधार्थ आज सोलापुरात जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन करण्यात आले. नागरिकांसह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन करत निषेध व्यक्त केला. या आंदोलनात शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे आणि भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर सहभागी झाल्या होत्या. आंदोलकांनी घोषणाबाजी करत घटनेचा तीव्र निषेध नोंदवला. त्याचबरोबर नाशिकमध्येही उबाठाच्या महिला आघाडीने आक्रमक भूमिका घेत पक्ष कार्यालयाबाहेर आंदोलन केले.

## नराधमाला हालहाल करून संपवा! राज ठाकरेंचा संताप

पान १ वरून- या आरोपीला शिक्षा व्हायला पाहिजे आणि ती होईलच पण अशा घटना वारंवार का घडत आहेत? ज्या महाराष्ट्राने देशाच्या स्त्री शिक्षणाचा, स्त्री सक्षमीकरणाचा पाया घातला त्या महाराष्ट्रात अशा घटना वारंवार का घडत आहेत याचा थोडा सर्वांगीण विचार व्हायला हवा की नको? अशी घटना घडली की जनतेच्या मनातला रोष उमटतो, सरकार मग कुठलेही असो त्यांचा कोडगेपणा दिसून येतो. दोनचार दिवसांत हे सगळे विसरले जाते, पण यावर काहीतरी मूलभूत विचार आणि कृती करावी लागेल यावर आपण कधी बोलणार आहोत का ?

# आजचे राशी भविष्य

बुधवार ता. ६ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | धार्मिक कार्यक्रमात सहभागाचे योग. वायफळ खर्च टाळण्यासाठी नियोजन करा. जोडीदाराशी बेबनाव संभवतो. |
| वृषभ | काही कठीण प्रसंग येतील. संयम आणि निर्धार गरजेचा राहील. दैनंदिन कामात सतर्क राहा. |
| मिथुन | शुभकार्याचे नियोजन करण्यास अनुकूलता. कार्यक्षेत्रात प्रगतीच्या नवीन संधी येतील. पैशाचा ओघ चांगला राहील. |
| कर्क | नवीन उपक्रमात सहभाग फायदेशीर ठरेल. पैशाचा ओघ चांगला राहील. कामे वेळेत पूर्ण होतील. |
| सिंह | तीर्थाटनास अनुकूल दिवस. प्रवास मानसिक उभारी देईल. जोडीदाराबरोबर मतभेद संभवतात. |
| कन्या | नियोजनपूर्व कामे करा. वाढत्या खर्चाची चिंता वाटेल. कामात चुका टाळा. |
| तूळ | महत्त्वाचे निर्णय घेण्यास अनुकूल दिवस. कौटुंबिक शुभकार्याची बोलणी होतील. वरिष्ठांची प्रशंसा लाभेल. |
| वृश्चिक | मानसिक अस्वस्थता येईल. पूजाप्रार्थनेतून दिलासा मिळेल. अतिरिक्त कामाचे दडपण येईल. |
| धनु | तणावावर मात करावी लागेल. मन रिझवण्याचा प्रयत्न करा. वादाची खुमखुमी टाळा. |
| मकर | बचतीला प्राधान्य द्या. मानसिक अस्वस्थता राहील. जोडीदाराबरोबर नाहक वाद टाळा. |
| कुंभ | इच्छापूर्तीसाठी अनुकूल दिवस. जोरदार आर्थिक लाभाचे योग. शुभकार्यात सहभागाचा आनंद मिळेल. |
| मीन | आज प्रवासाचे योग आहेत. त्यातून नवीन लोकांशी परिचयाची संधी लाभेल. भविष्यात त्यातून फायदा होईल. |

## महाराष्ट्र पद्मीनी विकली लॉटरी

सोडत दर मंगळवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 18 | सोडत दिनांक 05/05/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | PM-05 : 2391 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 2391 | त्रिमूर्ती लॉटरी एजन्सी - मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2016 | लॉटरी भांडार - नागपूर |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0486 | 1036 | 2377 | 3160 | 3658 | 4050 | 6107 | 7760 | 8799 | 9219 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0129 | 0760 | 1184 | 1910 | 2255 | 5402 | 5498 | 5650 | 5949 | 9325 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2422 | 3960 | 5150 | 6779 | 6926 | 6948 | 7090 | 7751 | 8217 | 9684 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0755 | 2387 | 3709 | 3858 | 4409 | 5771 | 6084 | 6657 | 8236 | 9997 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1424 | 2209 | 2917 | 3531 | 4401 | 5053 | 5657 | 6446 | 6965 | 7762 | 8382 | 9208 |
| | | 1442 | 2211 | 2923 | 3623 | 4405 | 5054 | 5706 | 6466 | 7005 | 7763 | 8392 | 9270 |
| | | 1453 | 2223 | 2945 | 3641 | 4434 | 5058 | 5727 | 6484 | 7027 | 7764 | 8411 | 9283 |
| | | 1488 | 2241 | 2961 | 3644 | 4443 | 5062 | 5765 | 6502 | 7051 | 7769 | 8475 | 9294 |
| | | 1491 | 2250 | 2985 | 3655 | 4467 | 5077 | 5785 | 6521 | 7054 | 7784 | 8484 | 9297 |
| 0000 | 0716 | 1516 | 2258 | 2986 | 3682 | 4480 | 5112 | 5786 | 6541 | 7068 | 7844 | 8518 | 9299 |
| 0007 | 0738 | 1519 | 2259 | 2988 | 3710 | 4482 | 5138 | 5836 | 6549 | 7078 | 7876 | 8523 | 9354 |
| 0008 | 0770 | 1550 | 2260 | 3005 | 3727 | 4493 | 5144 | 5866 | 6556 | 7083 | 7882 | 8571 | 9399 |
| 0018 | 0781 | 1581 | 2264 | 3007 | 3735 | 4508 | 5146 | 5870 | 6606 | 7095 | 7885 | 8604 | 9447 |
| 0020 | 0800 | 1601 | 2266 | 3027 | 3740 | 4514 | 5159 | 5875 | 6607 | 7111 | 7922 | 8612 | 9479 |
| 0021 | 0830 | 1614 | 2299 | 3031 | 3805 | 4526 | 5164 | 5927 | 6612 | 7120 | 7927 | 8628 | 9515 |
| 0041 | 0870 | 1631 | 2304 | 3053 | 3813 | 4545 | 5256 | 5930 | 6620 | 7128 | 7941 | 8687 | 9552 |
| 0051 | 0895 | 1706 | 2310 | 3056 | 3862 | 4582 | 5257 | 5935 | 6626 | 7226 | 7947 | 8691 | 9585 |
| 0058 | 0903 | 1708 | 2324 | 3063 | 3892 | 4584 | 5295 | 5938 | 6630 | 7236 | 7970 | 8712 | 9597 |
| 0059 | 0908 | 1711 | 2326 | 3071 | 3905 | 4599 | 5304 | 5957 | 6644 | 7310 | 7971 | 8718 | 9621 |
| 0062 | 1005 | 1718 | 2331 | 3081 | 3945 | 4624 | 5308 | 5965 | 6656 | 7341 | 8002 | 8758 | 9667 |
| 0088 | 1045 | 1719 | 2367 | 3093 | 3988 | 4634 | 5315 | 5981 | 6658 | 7408 | 8012 | 8778 | 9688 |
| 0095 | 1049 | 1737 | 2472 | 3119 | 4036 | 4649 | 5319 | 6065 | 6662 | 7417 | 8015 | 8785 | 9729 |
| 0107 | 1062 | 1744 | 2483 | 3123 | 4039 | 4657 | 5324 | 6066 | 6665 | 7426 | 8018 | 8790 | 9747 |
| 0114 | 1066 | 1769 | 2506 | 3148 | 4044 | 4660 | 5375 | 6069 | 6667 | 7427 | 8036 | 8804 | 9750 |
| 0209 | 1078 | 1770 | 2520 | 3161 | 4063 | 4689 | 5410 | 6075 | 6675 | 7447 | 8093 | 8820 | 9790 |
| 0246 | 1113 | 1771 | 2521 | 3219 | 4073 | 4724 | 5415 | 6116 | 6681 | 7470 | 8117 | 8823 | 9803 |
| 0328 | 1117 | 1855 | 2525 | 3223 | 4089 | 4729 | 5423 | 6147 | 6712 | 7475 | 8125 | 8841 | 9826 |
| 0331 | 1133 | 1867 | 2535 | 3301 | 4103 | 4732 | 5434 | 6153 | 6760 | 7484 | 8127 | 8853 | 9829 |
| 0342 | 1139 | 1870 | 2542 | 3309 | 4111 | 4800 | 5435 | 6157 | 6766 | 7507 | 8128 | 8858 | 9831 |
| 0357 | 1145 | 1878 | 2545 | 3333 | 4114 | 4802 | 5447 | 6162 | 6775 | 7514 | 8135 | 8867 | 9849 |
| 0383 | 1147 | 1905 | 2564 | 3360 | 4140 | 4843 | 5470 | 6176 | 6781 | 7563 | 8146 | 8883 | 9881 |
| 0398 | 1148 | 1932 | 2596 | 3370 | 4144 | 4870 | 5538 | 6183 | 6783 | 7577 | 8165 | 8884 | 9888 |
| 0400 | 1171 | 2012 | 2597 | 3383 | 4166 | 4874 | 5541 | 6239 | 6797 | 7580 | 8166 | 8885 | 9900 |
| 0408 | 1185 | 2024 | 2598 | 3393 | 4186 | 4890 | 5564 | 6259 | 6804 | 7608 | 8199 | 8948 | 9901 |
| 0450 | 1203 | 2029 | 2620 | 3396 | 4200 | 4900 | 5576 | 6263 | 6807 | 7662 | 8259 | 9005 | 9904 |
| 0458 | 1218 | 2035 | 2658 | 3431 | 4251 | 4906 | 5578 | 6264 | 6809 | 7687 | 8268 | 9045 | 9911 |
| 0459 | 1230 | 2075 | 2669 | 3438 | 4259 | 4946 | 5585 | 6267 | 6849 | 7699 | 8283 | 9051 | 9922 |
| 0500 | 1271 | 2079 | 2682 | 3462 | 4263 | 4955 | 5588 | 6282 | 6851 | 7709 | 8285 | 9054 | 9933 |
| 0508 | 1281 | 2093 | 2690 | 3463 | 4268 | 4995 | 5592 | 6353 | 6862 | 7727 | 8298 | 9127 | 9942 |
| 0528 | 1315 | 2120 | 2705 | 3483 | 4284 | 5000 | 5594 | 6358 | 6864 | 7731 | 8308 | 9141 | 9947 |
| 0559 | 1345 | 2121 | 2764 | 3484 | 4315 | 5028 | 5596 | 6399 | 6866 | 7735 | 8324 | 9165 | 9949 |
| 0584 | 1391 | 2122 | 2815 | 3512 | 4352 | 5035 | 5602 | 6419 | 6875 | 7748 | 8331 | 9168 | 9954 |
| 0615 | 1403 | 2195 | 2827 | 3523 | 4356 | 5036 | 5654 | 6436 | 6937 | 7751 | 8339 | 9191 | 9967 |
| 0691 | 1416 | 2200 | 2913 | 3526 | 4362 | 5037 | 5656 | 6437 | 6962 | 7757 | 8358 | 9197 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता.६/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ४ | २ | ७ |
| ४२ | २४ | ७४ |
| ४७ | २९ | ७९ |
| १३० | ४८० | ४५८ |
| २४८ | ६७९ | ३५९ |

# लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी शुभ विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 05/05/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-00 : 6826 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3075 | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 5500 | ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0792 | 1316 | 2243 | 2874 | 2980 | 4488 | 4686 | 5933 | 8898 | 8989 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1197 | 1225 | 1429 | 1466 | 2506 | 3276 | 5098 | 5771 | 6432 | 8074 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0790 | 1914 | 4821 | 5207 | 5799 | 6591 | 6885 | 7259 | 8670 | 9694 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1198 | 2272 | 3146 | 4481 | 5416 | 6217 | 7359 | 7926 | 8968 |
| | | 1323 | 2290 | 3162 | 4493 | 5457 | 6241 | 7387 | 7960 | 8975 |
| | | 1372 | 2292 | 3372 | 4617 | 5458 | 6265 | 7469 | 7973 | 9045 |
| 0000 | 0416 | 1419 | 2293 | 3376 | 4644 | 5501 | 6347 | 7474 | 7984 | 9069 |
| 0014 | 0497 | 1442 | 2298 | 3519 | 4647 | 5514 | 6391 | 7475 | 8145 | 9100 |
| 0017 | 0501 | 1498 | 2350 | 3583 | 4742 | 5552 | 6406 | 7528 | 8164 | 9118 |
| 0018 | 0517 | 1524 | 2398 | 3773 | 4743 | 5633 | 6464 | 7537 | 8176 | 9130 |
| 0040 | 0526 | 1531 | 2402 | 3915 | 4834 | 5780 | 6536 | 7577 | 8212 | 9486 |
| 0043 | 0687 | 1588 | 2410 | 3931 | 4925 | 5805 | 6592 | 7601 | 8214 | 9681 |
| 0056 | 0740 | 1644 | 2490 | 4008 | 4954 | 5806 | 6627 | 7646 | 8280 | 9692 |
| 0065 | 0807 | 1814 | 2508 | 4037 | 5091 | 5838 | 6629 | 7697 | 8285 | 9708 |
| 0103 | 0852 | 1838 | 2511 | 4180 | 5097 | 5853 | 6636 | 7713 | 8363 | 9718 |
| 0109 | 0906 | 1898 | 2527 | 4209 | 5105 | 5937 | 6646 | 7724 | 8435 | 9742 |
| 0207 | 0969 | 1917 | 2693 | 4228 | 5115 | 6046 | 6691 | 7726 | 8444 | 9776 |
| 0223 | 0970 | 2002 | 2702 | 4251 | 5145 | 6069 | 6769 | 7744 | 8475 | 9818 |
| 0277 | 1061 | 2019 | 2839 | 4283 | 5155 | 6112 | 6815 | 7770 | 8569 | 9820 |
| 0278 | 1127 | 2059 | 2867 | 4285 | 5281 | 6129 | 7097 | 7786 | 8692 | 9909 |
| 0290 | 1146 | 2091 | 2881 | 4320 | 5285 | 6161 | 7227 | 7789 | 8718 | 9944 |
| 0315 | 1166 | 2231 | 2966 | 4344 | 5303 | 6163 | 7273 | 7799 | 8826 | 9959 |
| 0327 | 1169 | 2239 | 3007 | 4347 | 5315 | 6178 | 7304 | 7847 | 8903 | 9995 |
| 0377 | 1183 | 2267 | 3063 | 4465 | 5376 | 6186 | 7347 | 7870 | 8951 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • महालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 05/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — SM-07 : 7261

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0037 | 0170 | 1889 | 2824 विराज एन्टरप्रायझेस, नाशिक | 3186 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 3510 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 3990 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर | 4393 | 4864 | 6331 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1049 | 4072 | 4811 | 5012 | 5406 | 8127 | 8133 | 9160 | 9680 | 9727 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0631 | 0657 | 0882 | 1231 | 1342 | 2028 | 2124 | 3378 | 5258 | 5687 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0778 | 1688 | 3027 | 4514 | 5721 | 7065 | 8183 | 9257 |
| | 0825 | 1707 | 3043 | 4909 | 5789 | 7079 | 8487 | 9290 |
| 0042 | 0879 | 1978 | 3105 | 4914 | 5885 | 7091 | 8538 | 9299 |
| 0051 | 1019 | 2229 | 3329 | 4926 | 6022 | 7254 | 8658 | 9379 |
| 0095 | 1034 | 2230 | 3398 | 5112 | 6474 | 7350 | 8700 | 9421 |
| 0102 | 1134 | 2368 | 3536 | 5159 | 6476 | 7478 | 8951 | 9452 |
| 0120 | 1141 | 2386 | 3737 | 5301 | 6606 | 7564 | 8969 | 9556 |
| 0160 | 1157 | 2424 | 3833 | 5429 | 6609 | 7678 | 8985 | 9646 |
| 0172 | 1173 | 2512 | 3872 | 5456 | 6625 | 7683 | 8988 | 9696 |
| 0237 | 1199 | 2756 | 4180 | 5501 | 6684 | 7746 | 9063 | 9710 |
| 0330 | 1362 | 2784 | 4240 | 5551 | 6757 | 7874 | 9119 | 9742 |
| 0403 | 1396 | 2828 | 4464 | 5563 | 6901 | 8043 | 9185 | 9932 |
| 0406 | 1660 | 2972 | 4487 | 5597 | 7063 | 8080 | 9193 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# दहावी-बारावी पुरवणी परीक्षांचे शुल्क वाढले

■ वर्धा

राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने पुरवणी परीक्षांच्या शुल्कात वाढ जाहीर केली आहे. जुलै-ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या पुरवणी परीक्षांपासून ही वाढ लागू करण्यात येणार आहे.

मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी यासंदर्भातील अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले असून, कार्यकारी परिषदेच्या निर्णयानुसार शुल्क संरचनेत बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार योजनेतील तसेच खाजगी विद्यार्थ्यांना वाढीव शुल्क भरावे लागणार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी नियमित, तंत्र विषय घेणारे आणि खाजगी विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क ५७० रुपये निश्चित करण्यात आले आहे. प्रशासकीय, गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र शुल्क प्रत्येकी २० रुपये राहणार आहे. प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क शास्त्र विषयासाठी १० रुपये, तर तंत्र विषयासाठी प्रति विषय १०० रुपये असेल.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 05/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — GL-03 : 3746

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4153 | 4784 | 5410 हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा | 6283 महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर | 6390 विराज एन्टरप्रायझेस, नाशिक | 7158 | 7235 | 8196 | 9715 | 9953 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1569 | 3066 | 3990 | 4231 | 7389 | 7488 | 7556 | 8507 | 9625 | 9675 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0089 | 1199 | 2432 | 4660 | 5400 | 6184 | 6468 | 6792 | 7351 | 9008 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1229 | 2321 | 2421 | 3846 | 4166 | 5277 | 6474 | 6901 | 7386 | 9081 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1511 | 2276 | 3115 | 3792 | 4584 | 5658 | 6564 | 7297 | 8382 | 9162 |
| | | 1573 | 2289 | 3150 | 3824 | 4683 | 5675 | 6598 | 7379 | 8383 | 9191 |
| 0001 | 0692 | 1615 | 2324 | 3199 | 3914 | 4837 | 5725 | 6616 | 7472 | 8397 | 9258 |
| 0076 | 0853 | 1643 | 2361 | 3217 | 3928 | 4842 | 5743 | 6632 | 7607 | 8585 | 9352 |
| 0102 | 0865 | 1691 | 2373 | 3234 | 3993 | 4914 | 5817 | 6653 | 7616 | 8621 | 9382 |
| 0163 | 0870 | 1724 | 2431 | 3330 | 4031 | 4932 | 5866 | 6672 | 7657 | 8694 | 9496 |
| 0180 | 0901 | 1752 | 2454 | 3333 | 4033 | 5053 | 5878 | 6676 | 7673 | 8755 | 9543 |
| 0194 | 0903 | 1838 | 2493 | 3334 | 4068 | 5079 | 5958 | 6678 | 7712 | 8785 | 9589 |
| 0204 | 0971 | 1861 | 2504 | 3373 | 4115 | 5093 | 6026 | 6697 | 7759 | 8792 | 9597 |
| 0219 | 1012 | 1931 | 2520 | 3389 | 4164 | 5115 | 6092 | 6723 | 7765 | 8801 | 9614 |
| 0279 | 1103 | 1996 | 2565 | 3436 | 4195 | 5135 | 6158 | 6739 | 7774 | 8802 | 9618 |
| 0291 | 1113 | 2029 | 2612 | 3468 | 4231 | 5228 | 6168 | 6928 | 7775 | 8809 | 9658 |
| 0350 | 1128 | 2047 | 2633 | 3477 | 4250 | 5251 | 6220 | 6937 | 7777 | 8851 | 9661 |
| 0354 | 1172 | 2048 | 2697 | 3518 | 4373 | 5267 | 6261 | 6963 | 7818 | 8863 | 9676 |
| 0409 | 1182 | 2065 | 2726 | 3525 | 4400 | 5280 | 6333 | 7021 | 7839 | 8877 | 9719 |
| 0440 | 1205 | 2084 | 2823 | 3622 | 4412 | 5352 | 6364 | 7059 | 8028 | 8888 | 9747 |
| 0490 | 1263 | 2132 | 2829 | 3636 | 4429 | 5400 | 6372 | 7127 | 8033 | 8894 | 9779 |
| 0500 | 1287 | 2191 | 2917 | 3673 | 4438 | 5406 | 6398 | 7146 | 8080 | 8925 | 9783 |
| 0576 | 1299 | 2192 | 2970 | 3694 | 4439 | 5431 | 6480 | 7172 | 8240 | 8971 | 9876 |
| 0590 | 1372 | 2224 | 3059 | 3696 | 4464 | 5435 | 6519 | 7197 | 8248 | 9097 | 9912 |
| 0645 | 1392 | 2266 | 3096 | 3733 | 4467 | 5436 | 6547 | 7237 | 8337 | 9121 | 9942 |
| 0649 | 1495 | 2273 | 3111 | 3752 | 4491 | 5600 | 6563 | 7273 | 8368 | 9140 | 9968 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# कोकणात चार पायांच्या कोंबडीच्या पिल्लाचा जन्म



■ रत्नागिरी

**दापोली** तालुक्यात एका कोंबडीच्या पिल्लाला पाहण्यासाठी सध्या लोकांची प्रचंड गर्दी होत आहे. या पिल्लाला दोन नव्हे चक्क चार पाय आहेत.

दापोली शहरालगत असलेल्या नवानगर वस्तीत राहणारे बुवा सावंत यांच्या घरी एका कोंबडीने चक्क चार पायांच्या पिल्लाला जन्म दिला आहे. सावंत यांच्या कोंबडीने इतरही पिल्लांना जन्म दिला आहे. मात्र यातील एकाच पिल्लाला दोनऐवजी चार पाय असल्याचे पाहून स्वतः सावंत कुटुंबिय आणि ग्रामस्थ थक्क झाले. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच हे पिलू पाहण्यासाठी मोठी झुंबड उडाली आहे.

पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, हा कोणताही चमत्कार नसून 'जेनेटिक म्युटेशन' म्हणजेच जनुकीय बदलामुळे घडलेला दुर्मीळ प्रकार आहे. हे पिलू सध्या पूर्णपणे सुदृढ आहे. निसर्गाचा हा आगळावेगळा आविष्कार सध्या संपूर्ण दापोली तालुक्यात कुतूहलाचा आणि चर्चेचा विषय ठरला आहे.

# त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तीर्थ येथे प्रस्तावित ध्वजस्तंभाचे भूमिपूजन

■ नाशिक

**त्र्यंबकेश्वर** येथील कुशावर्त तीर्थ येथे प्रस्तावित ध्वजस्तंभाच्या भूमिपूजन कार्यक्रम काल पार पडला. हा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. गोविंद देवगिरी महाराज, श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष, यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. हा सोहळा वेदघोष आणि भक्तिभावात पार पडला. अखिल भारतीय आखाडा परिषद आणि त्र्यंबकेश्वर पुरोहित संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जुना, निरंजनी, आनंद, आवाहन, अटल, बडा उदासीन, नया उदासीन आणि निर्मल अशा विविध आखाड्यांचा सहभाग होता.

यावेळी महाराष्ट्राचे जलसंपदा व कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन बोलताना म्हणाले की, आगामी सिंहस्थ कुंभमेळा लक्षात घेऊन त्र्यंबकेश्वर येथे पायाभूत सुविधा विकसित करत भाविकांना अधिकाधिक सोयी उपलब्ध करून देण्यास सरकार कटिबद्ध आहे. कुंभमेळ्यासाठी अपेक्षित लाखो भाविकांच्या सोयीसाठी पायाभूत सुविधा मजबूत करण्याचे व्यापक काम सुरू आहे. त्यांनी गोदावरी घाटांचे बांधकाम, डीपी रस्ते, त्र्यंबकेश्वर-गोदावरी लिंक योजना, बिल्व तीर्थ विकास, विभागीय जलव्यवस्था आणि नदीचा सतत प्रवाह कायम ठेवण्यासाठी गोदावरी लिफ्ट वॉटर सिस्टीम प्रकल्प यांसारख्या कामांचा आढावा घेतला.

# डॉ.संग्राम पाटलांचा इंग्लंडला परतण्याचा मार्ग मोकळा

■ मुंबई

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आणि भाजपाविरोधात समाजमाध्यमावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल झाल्यानंतर लूकआऊट सर्क्युलर नोटीसमुळे वादात अडकलेल्या युकेस्थित डॉक्टर आणि यूट्यूबर डॉ. संग्राम पाटील यांना हायकोर्टाने दिलासा दिला. डॉ.संग्राम पाटील यांनी परदेशातूनही तपास यंत्रणांसमक्ष हजर राहून सहकार्य करण्याचे हमीपत्र सादर केले. याची दखल घेत न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या एकल पिठाने लूकआऊट सर्क्युलरमध्ये बदल करण्याचे आदेश देत इंग्लंडला परतण्याचा मार्ग मोकळा केला

भाजपा नेत्यांविषयी सोशल मीडियावर पोस्ट अपलोड केल्याप्रकरणी ब्रिटन येथील डॉक्टर आणि युट्यूबर संग्राम पाटील यांच्या विरोधात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर त्यांना लूकआऊट नोटीसही बजावण्यात आली आहे. याप्रकरणी संग्राम पाटील यांनी हायकोर्टात धाव घेत ज्येष्ठ वकील सुदीप पासबोला, ॲड. उज्ज्वलकुमार चव्हाण आणि ॲड. आदित्य हिरे यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज मंगळवारी न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या समोर सुनावणी झाली.

# चालकाकडून वाहनाचा फोटो काढला वाहतूक पोलीस निरीक्षक निलंबित



■ मुंबई

**वाहतुकीचा** नियमभंग करणाऱ्या वाहन चालकाला दंड ठोठावताना आपल्या गाडीवरील चालकाला वाहनाचा फोटो काढायला लावणे वाहतूक पोलीस निरीक्षकांना चांगलेच महागात पडले. स्वत:ची जबाबदारी आपल्या वाहनचालकावर सोपविल्याप्रकरणी वाहतूक पोलीस निरीक्षक सचिन पाटील यांच्यावर गृह विभागाने कारवाई केली असून, त्यांचे निलंबन करण्यात आले आहे. अशा प्रकारे झालेली ही पहिलीच कारवाई आहे.

वाहतुकीचा नियमभंग केलेल्या चालकांच्या वाहनाचा नंबर प्लेटचा फोटो मशीनद्वारे काढला जातो. या मशीनद्वारेच ई चलन आकारले जाते. मात्र या मशीनद्वारे ई चलन दंड आकारण्याचे अधिकार केवळ वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनाच आहेत. तरीही मोटार वाहन निरीक्षक सचिन पाटील यांनी देवनारमध्ये कार्यरत असताना त्यांनी आपल्या वाहनचालकाच्या ताब्यात हे ई चलन मशीन दिले. या वाहन चालकाकडून ई चलन मशीनवरून वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनाचा फोटो काढतानाची चित्रफीत समाजमाध्यमांवर सर्व ठिकाणी प्रसिद्ध झाली. त्याचप्रमाणे याविषयीचे वृत्तही वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले. गृह विभागाने याची गंभीर दखल घेतली. या प्रकारामुळे शासनाची प्रतिमा मलिन झाली असून, महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचा भंग करणारी आहे, असा ठपका ठेवत मोटार वाहन निरीक्षक सचिन पाटील यांच्यावर परिवहन आयुक्तांनी निलंबनाची कारवाई केली आहे. आता निलंबनाच्या काळात त्यांना कोणतीही खासगी नोकरी किंवा व्यवसाय करता येणार नाही, असे आदेशात नमूद केले आहे. त्यांनी खासगी नोकरी केल्यास त्यांच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा गृह विभागाने दिला आहे.

# राष्ट्रवादीचे रायगड जिल्हाध्यक्ष दोन दिवसांपासून नॉट रिचेबल

■ रायगड

**राष्ट्रवादी** अजित पवार गटाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे हे गेल्या दोन दिवसांपासून नॉट रिचेबल असल्याने कर्जत-खालापूर मतदारसंघात कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेमुळे पक्षांतर्गत नाराजी आणि राजकीय घडामोडींना वेग आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

स्थानिक स्तरावर घारे यांच्याबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले असून, पक्षात सुरू असलेल्या नाराजीच्या या घटनेकडे गंभीरतेने पाहिले जात आहे. काही दिवसांपूर्वी कर्जत-खालापूर मतदारसंघातील एका पक्षप्रवेश सोहळ्यातही घारे यांची नाराजी उघडपणे दिसून आली होती.

रायगड जिल्ह्यात शिंदे गट आणि राष्ट्रवादी यांच्यातील राजकीय वादही चिघळलेला आहे. मात्र, शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी वाद संपले असून, पुढे एकत्र काम करू, असे वक्तव्य एका कार्यक्रमात केल्याने नवे राजकीय समीकरण तयार होण्याची शक्यता आहे. त्यातून घारे यांची राजकीय कोंडी झाल्याची चर्चा रंगली आहे.

# महावितरणच्या अपर्णा गिते यांना पोलीस महासंचालक पदक



**मुंबई-महावितरणच्या** कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) अपर्णा गिते यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल मानाच्या पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे महावितरणसह पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अपर्णा गिते यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीत अत्यंत कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि शिस्तबद्ध अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच सार्वजनिक हितासाठी त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेऊन त्यांना या पदकाने गौरवण्यात आले आहे. गिते यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महावितरण प्रशासनाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# पुणे-मुंबई महामार्गावर कारला आग! चालकाचा होरपळून मृत्यू

■ पुणे

**मुंबई** जुन्या महामार्गावर वडगाव मावळ येथे मध्यरात्री मुंबईहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या भरधाव चारचाकी वाहनाला अचानक आग लागल्याने चालकाचा होरपळून मृत्यू झाला.

ही घटना वडगाव मावळ येथील उड्डाणपुलावर रात्री सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास घडली. वाहनाला लागलेली आग काही क्षणातच भडकली आणि संपूर्ण गाडीने पेट घेतला. आगीचा वेग इतका प्रचंड होता की, चालकाला वाहनातून बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. परिणामी तो गाडीतच अडकून राहिला आणि होरपळून त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वडगाव पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने आग विझवण्याचा प्रयत्न केला, तोपर्यंत वाहन पूर्णपणे जळून खाक झाले होते. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते.

# माळशेज घाटात एसटी-स्कार्पिओ अपघातात चार जणांचा मृत्यू

**तीन जण गंभीर जखमी**

■ ठाणे

**मुरबाड-माळशेज** घाट महामार्गावरील वैशाखरे वळणाजवळ आज सकाळी अपघात घडला. एसटी बस आणि स्कॉर्पिओ कार यांची धडक होऊन चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एका लहान मुलासह तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.



हा अपघात माळशेज घाट परिसरातील वैशाखरे वळणावर घडला. अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचा अक्षरशः चुराडा झाला. स्कॉर्पिओमधील दोन पुरुष आणि एका महिलेचा मृत्यू झाला असून, जखमींमध्ये एका लहान मुलाचाही समावेश आहे. जखमींना तातडीने टोकावडे ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना वाहनातून बाहेर काढले. या अपघातामुळे काही काळ कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

# चंद्रभागेत स्नान करताना १७ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू

■ पंढरपूर

**पंढरपुरातील** चंद्रभागा नदीत स्नानासाठी गेलेल्या १७ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी घडली. शिवराज गणेश इधाटे असे मृत मुलाचे नाव आहे. तो जालनाच्या चांदई एक्को या गावाचा रहिवासी होता.

शिवराज हा आपल्या आई-वडिलांसह विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे दर्शनासाठी पंढरपुरात आला होता. आज सकाळी तो आई-वडिलांसोबत चंद्रभागा नदीत स्नानासाठी गेला असता, पाण्याची खोली लक्षात न आल्याने तो बुडाला. स्थानिक बांधवांच्या मदतीने शिवराजला बाहेर काढल्यावर तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले. भाविक बुडण्याची आठवडाभरातील ही दुसरी घटना असून चार दिवसांपूर्वी आंध्र प्रदेश येथील एका भाविकाचाही याच नदीत बुडून मृत्यू झाला होता.

# मोदींच्या पतनाला सुरुवात! खा. राऊतांचा घणाघात

■ मुंबई

**पश्चिम** बंगालमध्ये विरोधी पक्षाचा झालेला पराभव ही मोदी यांच्या पतनाची सुरुवात आहे. दिवा विझताना त्यांची वात मोठी होते, मग तो विझतो. हे हिंदुत्वाचे शास्त्र आहे,



हे मी हिंदुत्ववादी भाजपाला सांगतो. मोदींनी खरे बोलण्याचे धडे घेतले पाहिजेत, असा घणाघात उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी केला.

संजय राऊत पुढे म्हणाले की, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमधील विरोधकांचा पराभव हा देशासाठी, लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. या देशात कोणत्याही राज्यात विरोधी पक्षाचे अस्तित्व ठेवायचे नाही, ही भूमिका ठेवत जर सत्ताधारी पक्ष काम करत असेल तर यापुढे विरोधकांनी लढायलाच नको. पश्चिम बंगालमध्ये लाखो मतदार कापले जातात. मतदारांची संख्या कमी करत विजय मिळवला जातो. त्या पापामध्ये निवडणूक आयोग सहभागी असतो. त्यानंतर उत्सव साजरा करतात. काल ज्या निवडणुकांचे निकाल लागले त्यासारख्या निवडणुका पाकिस्तान, रशियामध्ये होतात. अजरबैजानमध्ये निकालाच्या आधीच निकाल जाहीर होताना मी पाहिले आहे. भारतामध्येही त्याच पद्धतीने निवडणूक आणि लोकशाही जाताना दिसत आहे. महिला आरक्षणाचा विषय असता तर मग केरळमध्ये का भाजपाला मतदान झाले नाही? तामिळनाडूमध्ये भाजपाला का मतदान झाले नाही? तिथे नवीन पक्ष कसा निवडून आला? पंतप्रधानांनी भान ठेवत बोलले पाहिजे. महिला आरक्षणाची इतकी चिंता होती तर ते कधीच झाले असते. तुम्हाला मतदारसंघ वाढवायचे आहेत. बाकी काही नाही. केरळमध्ये तामिळनाडूमध्ये तुमच्या पक्षाला का यश मिळाले नाही?

# विमानात पॉवर बँकला आग चंदिगड विमानतळावर स्फोट

■ चंदिगड

**चंदिगड** येथील शहीद भगतसिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज हैदराबादहून आलेल्या इंडिगोच्या विमानात पॉवर बँकने अचानक पेट घेतल्याने स्फोट झाला. दुपारी सुमारे ३.३२ वाजता विमान सुरक्षित उतरल्यावर टर्मिनलकडे जात असताना एका प्रवाशाच्या पॉवर बँकने अचानक पेट घेतला. त्यामुळे केबिनमध्ये धूर पसरून प्रवाशांमध्ये घबराट निर्माण झाली. कर्मचाऱ्यांनी तत्परतेने आग आटोक्यात आणत आपत्कालीन दरवाजे उघडले. या गोंधळात काही प्रवासी घाईघाईत बाहेर पडताना किरकोळ जखमी झाले. स्थानिक माहितीनुसार, सुमारे पाच जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर इंडिगोने अधिकृत निवेदन जारी करत सर्व प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे टर्मिनलपर्यंत पोहोचवल्याचे सांगितले.

# सोलापूरमध्ये अभियांत्रिकी शिक्षणाला चालना! तीन नवे अभ्यासक्रम सुरू

■ मुंबई

**सोलापूर** व परिसरातील अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून पदवीस्तराचे तीन नवीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

या अंतर्गत एआय अँड मशीन लर्निंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन हे अभ्यासक्रम सुरू होणार असून, प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सोलापूर आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम स्थानिक स्तरावर उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांकडे स्थलांतर करण्याची गरज कमी होणार आहे. या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी मिळणार असून, तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी नवे पर्याय उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे हा निर्णय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत लाभदायक ठरणार असल्याचे मानले जात आहे.

# तीन जहाजांवर अडकलेल्या खलाशांची तत्काळ सुटका करा

**उच्च न्यायालयाचे सक्त आदेश**

**मुंबई** - मुंबई किनारपट्टीजवळ जप्त केलेल्या ३ जहाजांवर अडकलेल्या ५० खलाशांची तत्काळ सुटका करा, असे सक्त आदेश उच्च न्यायालयाने आज संबंधित जहाजांच्या मालकांना दिले. जहाज मालकांनी खलाशांना पाळीव प्राण्यांपेक्षाही वाईट वागणूक दिली आहे, अशा कठोर शब्दांत ताशेरे ओढतानाच न्या. रवींद्र घुगे आणि न्या. हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने खलाशांच्या सुटकेचा आदेश देत त्यांना दिलासा दिला.

समुद्रात बेकायदेशीरपणे इंधन आणि बिटुमेनची वाहतूक केल्याप्रकरणी एमटी अस्फॉल्ट स्टार, एमटी स्टेलर रुबी आणि एमटी अल जाफझिया ही जहाजे मुंबईच्या किनारपट्टीपासून ११ नॉटिकल मैल अंतरावर जप्त करण्यात आली. या तीन जहाजांवर ५० खलाशी अडकले होते. जहाजावर अन्न व पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्यामुळे ७ खलाशांनी 'हॅबियस कॉर्पस' याचिका दाखल केली होती.

# केरळमध्ये संतप्त हत्तीचा कहर हल्ल्यात ट्रक चालकाचा मृत्यू

■ तिरुवनंतपूरम



**केरळमधील** अंगमाली येथील किडंगूर श्री महाविष्णू मंदिरात १ मेच्या उत्सवासाठी आणलेल्या 'मय्यनाड पार्थसारथी' नावाच्या हत्तीने साखळ्या तोडून धुमाकूळ घातला. यात एका ट्रक चालकाचा मृत्यू झाला, तर माहुत गंभीर जखमी झाला. संतप्त हत्तीने अनेक वाहनांची तोडफोड केली. आपल्या सुळ्यांनी कार उचलून फेकली. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.

मय्यनाड पार्थसारथी नावाचा हत्ती अचानक हिंसक झाला आणि त्याने विश्रांतीच्या ठिकाणी साखळ्या तोडल्या. आपल्या सुळ्यांनी कार उचलून ती फेकून दिली. ट्रान्सपोर्ट ट्रक चालक विष्णू (४०) याला हत्तीने चिरडून ठार मारले. माहुत प्रदीप हे गंभीर जखमी झाले. हत्तीने एका कारला सुळ्यांनी उचलून फेकले आणि वाहनांची नासधूस केली. सुमारे तीन तासांच्या थरारानंतर वन विभागाने भुलीचे इंजेक्शन देऊन हत्तीला शांत केले. मंदिर उत्सवांमध्ये हत्तींकडून होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांत वाढ झाली आहे.

# राज्य राखीव पोलीस भरतीतील ८५ टक्के प्रश्न खासगी प्रश्नसंचातील

■ दौंड

**दौंड** येथे राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) भरती परीक्षेत महाराष्ट्र पब्लिकेशन या खासगी क्लासच्या नमुना प्रश्नपत्रिकेतील तब्बल ८५ प्रश्न जसेच्या तसे विचारण्यात आले होते. यावर टीका करत शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे व काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला असून, त्यात नमुना प्रश्नपत्रिका आणि प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्न यांची तुलना दाखवण्यात आली आहे.

सुळे म्हणाल्या की, हा व्हिडिओ खरा असेल तर अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी जीव तोडून मेहनत घेतात. अशा प्रकारांमुळे परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होतो. एक-दोन प्रश्न जुळणे समजू शकते, पण ८५ प्रश्न जुळणे गंभीर बाब आहे. याची सखोल चौकशी झाली पाहिजे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार सरकारवर निशाणा साधत म्हणाले की, पोलीस भरतीसारख्या संवेदनशील प्रक्रियेत असा प्रकार घडतो, म्हणजे आतूनच कुठेतरी साखळी जुळलेली आहे का, असा गंभीर प्रश्न निर्माण होतो.

सरकारकडून केवळ घोषणा आणि जाहिराती होत आहेत, पण प्रत्यक्षात तरुणांच्या भविष्याशी खेळ सुरूच आहे. ३,९७७ विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे मेहनत घेऊन ही परीक्षा दिली. त्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरणाऱ्यांना वाचवायचे की जबाबदारांना शिक्षा द्यायची, हा निर्णय आता सरकारने घ्यायचा आहे. संबंधित खासगी संस्था महाराष्ट्र पब्लिकेशन अकॅडमी यांनी याबाबत स्पष्टीकरण देताना सांगितले की, आमच्या पुस्तकांचा दर्जा चांगला असल्याने अनेक प्रश्न जुळतात.

# आदिवासी शिक्षणाला चालना २४ आश्रमशाळांची श्रेणीवाढ

**मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी**

■ मुंबई

**आदिवासी** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यासाठी राज्याच्या आदिवासी विकास विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या ५ प्राथमिक आणि १९ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

या निर्णयानुसार, प्राथमिक शाळांचे माध्यमिक शाळांमध्ये, तर माध्यमिक शाळांचे कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक पदनिर्मिती तसेच खर्चाच्या डोंगराळ आणि दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे. या श्रेणीवाढीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच पुढील शिक्षण घेणे शक्य होणार असून, शिक्षणाचा गळती दर कमी होण्यास मदत होईल. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आदिवासी भागातील शैक्षणिक सुविधा मजबूत होणार असून, विद्यार्थ्यांच्या प्रगतीला नवे बळ मिळणार आहे.

# पिंपरीत बाळ चोरणाऱ्या महिलेला नागरिकांनी पकडले

■ पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड** शहरातील काळभोर नगर परिसरामध्ये लहान बाळ चोरण्याच्या तयारीत असलेल्या एका महिलेला नागरिकांनी पकडून बेदम चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. नागरिकांनी चोप दिलेल्या महिलेकडील बॅगमध्ये चाकू, मुंगीचे औषध आणि स्प्रे आढळला. ही महिला नेमके कशासाठी बाळ चोरी करत होती आणि तिचे आणखी काही साथीदार आहेत का, याचा तपास सध्या पिंपरी पोलीस करत आहेत. मात्र या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये खळबळ उडाली आहे. घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी संबंधित महिलेला अडवून तिची चौकशी केली असता ती समाधानकारक उत्तरे देऊ शकली नाही. यानंतर तिच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने नागरिकांनी तिला पकडून ठेवले.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# कुंभमेळा खर्चाचा सोहळा ठरू नये

**पुढचे** सहा महिने राज्य सरकारचे सगळे लक्ष हे नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीकडे लागलेले असेल. कुंभमेळ्यापूर्वीचे जे काही धार्मिक उपक्रम असतात, त्याची त्र्यंबकेश्वर आणि नाशिक येथे सुरुवात झालेली आहे. प्रामुख्याने कुंभमेळ्याच्या यशस्वितेसाठी ध्वजस्तंभ उभारण्याच्या प्रकाराला विशेष महत्त्व असते. हा ध्वजस्तंभ प्रतिकात्मक स्वरूपाचा असतो. या धर्मध्वजांची उंची किती असावी याबद्दलचे काही विशेष नियम नाहीत. परंतु धर्मध्वज अधिकाधिक उंच असावा अशी स्वाभाविक इच्छा कुंभमेळ्याशी संबंधित असलेल्या संस्थांची दिसते. मग तो त्र्यंबकेश्वरचा नाशिकचा पुरोहित संघ असेल किंवा त्या त्या ठिकाणच्या मंदिरांचे विश्वस्त असतील. या धर्मध्वजांच्या अनावरणासाठी राजकारण्यांचाही डेरा तिथे दाखल होतो. कुंभमेळा पार पाडेपर्यंत या सगळ्या विविध धार्मिक गटांना सांभाळून ठेवण्याशिवाय राजकारण्यांनाही पर्याय नसतो. एकीकडे कुंभमेळ्याची तयारी वेग घेत असताना दुसरीकडे ज्या परमपावन गोदावरीच्या किनाऱ्यावर हा कुंभमेळा होणार आहे, त्या गोदावरीचा त्र्यंबकपासून ते नाशिकपर्यंतचा प्रवाह अजूनही प्रदूषित आहे. धर्मध्वज उभारण्याचा कालावधी तिथी मुहूर्त जसे पाळले जातात किंवा त्यासाठी जशी त्या त्या ठिकाणच्या धार्मिक संस्था किंवा सरकार तसा उत्साह दाखवतात. तसा कुंभमेळ्यामध्ये सर्वाधिक महत्त्व हे गोदावरीच्या स्नानाला असते. त्या गोदावरीचा प्रवाह किंवा पाणी शुद्ध आणि निर्मल राहावे यापैकी कोणत्याही संस्था पुढाकार घेताना दिसत नाहीत. म्हणजे काही निमित्त असेल. तरच स्वच्छता करायची. अन्यथा तीच गोदावरी नदी स्वच्छता आणि दुर्गंधीला आंदण द्यायची हे प्रकार वर्षानुवर्षे चालू राहिले आहेत. केंद्र सरकारने नमामी गंगेचा प्रकल्प राबवून पंचवीस-तीस टक्के का असेना, परंतु गंगेचा प्रवाह शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. गोदावरीच्याबाबतीत मात्र राज्य सरकार, नाशिक महापालिका आणि कुंभमेळ्याशी संबंधित सगळ्या धार्मिक संस्था पूर्णपणे उदासीन राहिल्याचेच पाहायला मिळते. कार्यक्रम, समारंभ आणि त्यातून प्रसिद्धीची हौस भागवून घेण्यासाठी पुढच्या सहा महिन्यांत अशीच भाऊगर्दी झालेली पाहायला मिळेल.

### मूळ गोदामातच दुर्लक्षित

गेल्या सहा महिन्यांपासून नाशिक शहर आणि परिसरामध्ये इतर बरीच विकासकामे सुरू झालेली आहेत. अर्थातच यातली बरीच विकासकामे ही घाईगर्दीने पुरी केली जात आहेत. वेळेचे बंधन दिल्याने या विकासकामांमध्ये कामाचा दर्जा कितपत राहील याबद्दल शंका व्यक्त होते आहे. म्हणजे आता तर काम करणाऱ्यांच्या मानसिकतेत आणि एकूणही लोकांच्या चर्चांमधून ही कुंभमेळ्याची कामे आहेत. म्हणजे या कामांचे आयुष्य फार तर फार पुढच्या चार पाच वर्षाचेच मानले जाते. आणि मग 'नेमेचि येतो कुंभमेळा' या उक्तीप्रमाणे यातली ७० ते ८० टक्के कामे पुन्हा आठ-दहा वर्षांनी करायला घेतली जातात. आज नाशिक महापालिका हीच प्रामुख्याने या सगळ्या कामांचे वाटप आणि नियंत्रण करते आहे. कुंभमेळा आदर्श स्वरूपात सर्वोत्तम व्यवस्थेत पार पडावा ही राज्य सरकारची इच्छा आहे. परंतु त्यासाठी अक्षरशः चोवीस तास कामांची पाहणी, त्यांचा दर्जा, गुणवत्ता, आवश्यकता, उपयुक्तता पाहणारी यंत्रणाच आढळून येत नाही. कुंभमेळ्याच्या काळात केवळ गर्दीवर नियंत्रण आणि गर्दीसाठी सोयीसुविधा एवढा मर्यादित दृष्टीकोन लक्षात घेऊनच नियंत्रण कक्ष किंवा ज्याला वॉर रूम म्हटले जाते ती उभारली जाते. म्हणजेच कुंभमेळा आणि गर्दी एवढेच समीकरण डोक्यात ठेवून विकासकामांचीही घाईगर्दी केली जात असल्याचे दिसते. जवळपास पंचवीस हजार कोटींचा खर्च या कुंभमेळ्याच्यानिमित्ताने होईल. एवढा मोठा निधी खर्चून एकही स्थायी स्वरूपाचे काम किंवा प्रकल्प उभा राहू शकलेला नाही. गेल्या अनेक वर्षांपासून कुंभमेळ्यामध्ये रग्गड पैसा ओतला जातो. परंतु गोदावरीचे पावित्र्य, तिची स्वच्छता किंवा रामकुंडापासून किमान तीन-चार किलोमीटरचा गोदावरीचा किनारा स्वच्छ आणि पर्यटनाबरोबरच काही धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उत्तम स्वरूपात राहील, अशी कामेही होऊ शकलेली नाहीत. अगदी काही एकर जमीन संपादित करून उभारले जाणारे साधूग्राम याचा जरी विचार केला तर प्रत्येक कुंभमेळ्यामध्ये त्या त्या साधूंच्या आखाड्याला जागा वाटून दिली जाते किंवा निश्चित केली जाते. त्याठिकाणी कुंभमेळ्याव्यतिरिक्त नाशिक तीर्थक्षेत्राचा लौकिक वाढवेल किंवा त्याचे पर्यटनाचे महत्त्व वृद्धिंगत होईल असे प्रकल्पदेखील राबवता येऊ शकतात.

### चेहरामोहरा बदलला पाहिजे.

यातला सर्वात विचार करण्यासारखा भाग हा आहे की, त्र्यंबकपासून ते नाशिकपर्यंतची गोदावरी स्वच्छ आणि निर्मल राहू शकलेली नाही. त्यात सोडले जाणारे सांडपाणी, किनाऱ्यावरची अस्वच्छता, पात्रामध्ये उगवणारी पानफुटी या सगळ्या प्रकारातून ज्या गोदावरीमुळे नाशिक हे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. तो मुख्य हेतूच दुर्लक्षित होतो. आतादेखील कुंभमेळ्याची गर्दी आणि त्यानिमित्ताने वेगवेगळ्या कामांची भाऊगर्दी यालाच महत्त्व आलेले आहे. गोदावरीची स्वच्छता अजूनही दुर्लक्षित आहे. प्रत्यक्ष रामकुंडाचा परिसरसुद्धा कुंभमेळ्याच्या काळात तरी स्वच्छ पाण्याने प्रवाहित राहील की नाही याबद्दलही शंका वाटू लागते. कुंभमेळ्याचे धर्मध्वज उभारणे हा जरी त्या परंपरेचा भाग असला तरी तो पवित्र गोदामातेच्या पावन परिसरासाठी आवश्यक असलेले धर्मकर्तव्य त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे ठरते. गेल्या दोन-तीन वर्षांपासून तिथे सुरू झालेल्या गोदावरीच्या आरत्या म्हणजे पुन्हा सरकारी खर्चाचा उत्तम नमुना ठरतो. केवळ या आरतीसाठी वार्षिक दहा कोटींची तरतूद केलेली आहे. या आरतीनंतरही तिथे होणारी अस्वच्छता तितक्याच सोयीस्करपणे दुर्लक्षित होत राहते. म्हणूनच कुंभमेळा हा केवळ खर्च करण्याचा सोहळा ठरू नये. निदान या कुंभमेळ्यातून तरी एकूणच नाशिक त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्राचा आणि गोदावरी परिसराचा कायापालट झाला पाहिजे. चेहरामोहरा बदलला पाहिजे.

## क्रीडा

# सॅमसनची झंझावाती खेळी! चेन्नईचा दिल्लीवर ८ गडी राखून सहज विजय



**आयपीएल २०२६ च्या ४८ व्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने चेन्नई सुपर किंग्ससमोर १५६ धावांचे लक्ष्य ठेवले. दिल्लीने नाणेफेक जिंकून अरुण जेटली स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने २० षटकांत ६ गडी गमावून १५५ धावा केल्या.मात्र संजू सॅमसनच्या झंझावाती फलंदाजीने दिल्लीवर ८ गाडी राखून सहज विजय मिळवला.**

नवी दिल्ली

**या सामन्यात** दिल्लीच्या कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सुरुवातीला मोठी धावसंख्या उभारून प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, डावाची सुरुवात जरी वेगवान झाली, तरी लगेचच गडी गमावल्याने दिल्ली अडचणीत सापडली. पथुम निस्संकाने काही चांगले फटके खेळत संघाला सुरुवात करून दिली, पण तो १९ धावांवर बाद झाला. त्यानंतर केएल राहुल (१२), करुण नायर (१३) आणि नितीश राणा (१५) हेही मोठी खेळी करू शकले नाहीत. कर्णधार अक्षर पटेलही अवघ्या २ धावांवर बाद झाला. चेन्नईच्या गोलंदाजांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि अचूक गोलंदाजी करत दिल्लीच्या फलंदाजांना बांधून ठेवले. मुकेश चौधरी, अकील हुसेन आणि नूर अहमद यांनी महत्त्वाच्या विकेट घेत दिल्लीला दबावाखाली ठेवले.अडचणीच्या परिस्थितीत समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी मिळून ६५ धावांची भागीदारी करत संघाला पुन्हा उभारी दिली. स्टब्सने ३८ धावांची चांगली खेळी केली.

चेन्नईच्या डावाच्या सुरुवातीला मिचेल स्टार्कने अचूक गोलंदाजी करत फक्त ३ धावा देत चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर ऋतुराज गायकवाड आणि संजू सॅमसन यांना धावा काढताना अडचणी आल्या. मात्र लुंगी एनगिडीने पुनरागमन करत गायकवाडला अवघ्या ६ धावांवर बाद करून पहिला धक्का दिला. डीप स्क्वेअर लेगला समीर रिझवीने उत्कृष्ट झेल घेतला. केएल राहुलनेही प्रभावी क्षेत्ररक्षण करत उर्विल पटेलला यष्टीचीत केले. अक्षर पटेलच्या स्लो चेंडूवर उर्विल फसला आणि १७ धावांवर माघारी परतला. ११ ते १२ व्या षटकांदरम्यान सामन्याचा वेग बदलला. संजू सॅमसनने आक्रमक पवित्रा घेत कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर तब्बल १८ धावा कुटल्या आणि ३२ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने दोन षटकार आणि एक चौकार मारत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतरही संजू सॅमसनने आक्रमक खेळ सुरूच ठेवला. टी. नटराजन आणि लुंगी एनगिडी यांच्या गोलंदाजीवर त्याने सलग षटकार आणि चौकार मारत धावगती वाढवली. त्याला कार्तिक शर्माचीही चांगली साथ मिळाली.

या टप्प्यावर चेन्नईने १५.५ षटकांत २ गडी गमावून १३८ धावा करत सामन्यावर मजबूत पकड मिळवली. सॅमसनने नटराजनच्या १५ व्या षटकात १९ धावा काढल्या. त्याने या षटकात दोन षटकार आणि एक चौकार मारला. संजू सॅमसनची झंझावाती फलंदाजी आणि कार्तिक शर्माची संयमी साथ यामुळे संघाने सहज विजय मिळवला.

## गुकेशनंतर कार्लसनचा पुन्हा पराभव डच खेळाडू व्हॅन फोरेस्टची सरशी

ॲमस्टरडॅम

**जागतिक** क्रमवारीत अव्वल असलेल्या मॅग्नस कार्लसेन याला पुन्हा एकदा पराभवाचा धक्का बसला आहे. भारताच्या गुकेश डोम्माराजू याच्याकडून झालेल्या पराभवानंतर आता नेदरलँड्सच्या जॉर्डन व्हॅन फोरेस्ट यानेही त्याच्यावर मात केली. २०२६ मधील टेपे सीगेमेन स्पर्धेत झालेल्या कार्लसनच्या पराभवामुळे बुद्धिबळ विश्वात चर्चेला उधाण आले आहे.



या सामन्याची सुरुवात सावधपणे झाली होती. दोन्ही खेळाडू एकमेकांच्या चालींचा बारकाईने अंदाज घेत होते. सामना जसजसा पुढे गेला तसतसा तो अधिक तणावपूर्ण झाला. शेवटच्या टप्प्यात दोघांकडेही वेळ कमी उरला होता. त्यामुळे प्रत्येक चाल महत्त्वाची ठरत होती. एका टप्प्यावर सामना बरोबरीत सुटेल असे वाटत होते. मात्र जॉर्डन व्हॅन फोरेस्टने शेवटच्या क्षणी आक्रमक खेळ करत दबाव कायम ठेवला आणि अखेरीस कार्लसेनला पराभव मान्य करावा लागला.

## टी-२० क्रमवारीत भारत अव्वल इंग्लंड-ऑस्ट्रेलियाला मागे टाकले

दुबई

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केलेल्या क्रमवारीत भारताने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. भारत पुरुष क्रिकेट संघ टी-२० आंतरराष्ट्रीय प्रकारात अव्वल स्थानावर कायम असून, त्याने इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघांना मागे टाकले आहे. भारतीय संघाने अलीकडेच मोठी कामगिरी करत मार्च महिन्यात तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला. ही स्पर्धा जिंकून किताब राखणारा भारत हा पहिलाच संघ ठरला. या स्पर्धेचे आयोजन भारत आणि श्रीलंका यांनी संयुक्तपणे केले होते. या विजयामुळे भारताचे क्रमवारीतील स्थान अधिक मजबूत झाले. क्रमवारी तयार करताना गेल्या एका वर्षातील सामन्यांना पूर्ण महत्त्व दिले. सध्या भारताच्या खात्यात २७५ गुण आहेत. इंग्लंड पुरुष क्रिकेट संघ २६२ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर ऑस्ट्रेलिया पुरुष क्रिकेट संघ २५८ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील फरक थोडा कमी झाला असला तरी भारत अजूनही अव्वल स्थानी आहे. इतर संघांमध्ये न्यूझीलंड पुरुष क्रिकेट संघ २४७ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे.

## पदक मिळाले, पण दखल नाही! सात्त्विक-चिराग यांची खंत

मुंबई

**थॉमस** कप २०२६ मध्ये भारताने कांस्यपदक जिंकूनही देशात अपेक्षित उत्साह दिसला नाही. यामुळे भारतीय बॅडमिंटनपटू सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी नाराज झाल्याची माहिती आहे. त्यांच्या इन्स्टाग्राम स्टोरीमुळे ही बाब चर्चेत आली.

या दोन्ही खेळाडूंनी स्पर्धे नंतर एक संदेश शेअर करत म्हटले की, आम्ही घरी परतलो, पण गेल्या दोन आठवड्यांत काय घडले याची कोणालाच माहिती नाही आणि कुणालाही त्याची पर्वा नाही. त्यांनी कोणाचे नाव घेतले नसले तरी, त्यांच्या या वक्तव्यातून संघाच्या कामगिरीकडे दुर्लक्ष झाल्याची भावना स्पष्ट होते. चिरागनेही हाच संदेश शेअर केल्याने दोघांची नाराजी अधिक ठळक झाली. या संदेशानंतर चाहत्यांनीही प्रतिक्रिया देत




खेळाडूंना पाठिंबा दिला. अनेकांनी असे मत व्यक्त केले की, देशासाठी पदके जिंकून आणणाऱ्या खेळाडूंचे अधिक सन्मानाने स्वागत व्हायला हवे. काहींनी हेही नमूद केले की, क्रिकेटव्यतिरिक्त इतर खेळांना तितकेसे महत्त्व दिले जात नाही.


दरम्यान, भारताने या स्पर्धेत चांगली कामगिरी करत कांस्यपदक जिंकले. पुरुष संघासाठी हे दुसरे पदक ठरले. याआधी २०२२ मध्ये भारताने सुवर्णपदक जिंकले होते. या वेळी संघाने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली होती.

### सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

मनुष्य जन्म हा नुसता जगण्यासाठी नसतो, तर स्वतःला ओळखण्यासाठी, शिकण्यासाठी आणि इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी असतो.

### पंचांग



**बुधवार, ६ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

* वैशाख कृष्ण चतुर्थी
* नक्षत्र : मूळ

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० धनु

रवी उदय- ०६-०९
रवी अस्त- १९-०१

**राजर्षी छत्रपती श्री शाहू महाराज स्मृतिदिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४


Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

### पाककृती

## ग्रिल्ड कोरिएन्डर गार्लिक फिश

★**साहित्य :** ५०० ग्रॅम पापलेटचे तुकडे, १-१/२ टेबलस्पून आले-लसूण पेस्ट, १ टेबलस्पून कोकम आगळ, मीठ चवीनुसार, १/२ टीस्पून मिरे पूड, १/२ लिंबू रस, १ टेबलस्पून चिली फ्लेक्स तेल, कोथिंबीर.

★**कृती-** सर्वप्रथम पापलेटचे काप करून घ्यावेत. मीठ लावून छान धुऊन घ्यावेत. धुतलेल्या पापलेटच्या तुकड्यांना आले-लसूण पेस्ट लावावी. चवीनुसार मीठ घालून घ्यावे. ग्रिल्ड कोरिएन्डर गार्लिक फिश, बारीक केलेली मिरपूड घालून घ्यावी. सोबतच लिंबाचा रस घालून घ्यावा. कोकम आगळ असल्यास कोकम आगळ ही घालून घ्यावे. कोकममुळे माशांना छान चव येते. सर्वात शेवटी चिली फ्लेक्स घालून घ्यावेत आणि आता वरील सर्व पदार्थ छान पैकी माशांना दोन्ही बाजूने लावून घ्यावे आणि हे मासे अर्धा तासासाठी मॅरिनेट होण्यासाठी ठेवावे. नॉनस्टिक पॅनवरती हे माशाचे तुकडे किंवा ग्रील पॅन वरती हे माशाचे तुकडे दोन्ही बाजूंनी छान शॅलो फ्राय करून घ्यावेत. माशाचे तुकडे भाजत आले की बारीक चिरलेली कोथिंबीर थोड्या बटरमध्ये कालवून माशांवर ती लावावी आणि पुन्हा माशाचे तुकडे छान पैकी दोन्ही बाजूंनी भाजून घ्यावेत. डाएट कॉन्शस लोकांनी हे तुकडे कमी तेलातच भाजावेत. हे माशाचे तुकडे गरमागरम कोरडेच खायला छान लागतात किंवा तुम्ही तांदळाच्या भाकरीसोबतही खाऊ शकता.



**महावितरण** ई-निविदा सुचना

म.रा.वि.वि.कं.मर्या, अहिल्यानगर मंडल कार्यालयांतर्गत येणा-या संगमनेर व श्रीरामपुर विभागांतर्गत बाह्यस्त्रोताद्वारे कुशल मनुष्यबळ पुरविणेसाठी पात्र व नोंदणीकृत संस्था / फर्म कडून ई-निविदा पध्दतीने दोन बोली स्वरुपात निविदा आमंत्रित करत आहेत. सदरील निविदा क्र. SE/ANRC/HR/SNGR/२०२६-२७/T-०४ & SE/ANRC/HR/SRM/२०२६-२७/T-०५ असून कामाचे स्वरुप, मनुष्यबळ संख्या, निर्दिष्ट क्षेत्र, अंदाजित निविदा रक्कम, बयाना रक्कम इ.तपशीलांसाठी संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in/eatApp/ पहावे. सदरील निविदा दि.०६.०५.२०२६ ते दि.१९.०५.२०२६, ११.०० वा.पर्यंत इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध आहे. निविदा शुल्क ऑनलाईन भरुन दि.२०.०५.२०२६, ११.०० वा.पर्यंत अपलोड करता येईल. अधिक माहितीसाठी संपर्क ८९५६६२०१०३

H.O.PRO NO.१०९/२६ अधीक्षक अभियंता, अहिल्यानगर मंडल

**सूचना**

नॉर्दर्न इंडिया को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पत्ता - वडाळा स्पोर्ट्स क्लब बिल्डींग, प्लॉट क्र. २१/६, ८ वा मजला, आर. ए. किडवाई मार्ग, वडाळा-पश्चिम, मुंबई ४०००३१ चे सदस्य आणि संस्थेच्या इमारतीमधील सदनिका/निवासी जागा क्र. २०/५ आणि २०/६ चे धारणकर्ते श्री. दिलिप सत्यनारायण पोदार यांचे दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी निधन झाले.
संस्था याद्वारे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या सदर समभाग आणि हितसंबंधांच्या हस्तांतरणास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार/आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून, संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचा हिस्सा आणि हितसंबंध हस्तांतरणास असलेल्या त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावे/आक्षेपांच्या समर्थनार्थ असे दस्तऐवज आणि इतर पुराव्यांच्या प्रतिंसह सदर सूचना प्रसिद्धीपासून ७ दिवसांच्या कालावधीमध्ये दावे किंवा आक्षेप आमंत्रित करीत आहे.जर वरील विहीत कालावधीमध्ये कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या हिस्सा आणि हितसंबंधांबाबत संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास संस्था मुक्त असेल. संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचा हिस्सा आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणाकरिता संस्थेस जर कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त झाल्यास संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने त्यावर व्यवहार करण्यात येतील. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधींची प्रत दावेदार/आक्षेपदारांना पाहणीकरिता संस्थेच्या कार्यालयामध्ये/संस्थेच्या सचिवांकडे सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून तिचा कालावधी समाप्तीच्या दिनांकापर्यंत स. १०.०० ते सायं. ५.०० दरम्यान उपलब्ध असेल.

करिता आणि त्यांच्या वतीने
सही/-
नॉर्दर्न इंडिया को-ऑप. हौसिंग सोसायटी
मान. सचिव

ठिकाणः मुंबई
दिनांकः ०६.०५.२०२६

**OFFICE OF THE DEPUTY DIRECTOR (SOUTH), SANJAY GANDHI NATIONAL PARK BORIVALI EAST MUMBAI-400066**

**INVITATION FOR E-TENDER**

On behalf of the Governor of Maharashtra Deputy Director(South), Sanjay Gandhi National Park, Mumbai, Maharashtra invites e-Tender in the prescribed forms (Technical & Financial) from eligible bidders as per terms and conditions of the bid for eligible Service Providers having suitable e-procurement facilities for **"Setting a Command Control Room"** at Sanjay Gandhi National Park.

1. Details of e-Tender are given in Tender Document (RFP), which will be available on Website "http://mahatenders.gov.in". The copy of the RFP can be downloaded.
2. Online bidding will be done on "http://mahatenders.gov.in" website on date and time given below.
3. Summary of the tender notice is as follows:

| Particulars | Details |
|---|---|
| Name of the Work: | Providing & setting of Fully Automated Command Control Room at Borivali in South Division of Sanjay Gandhi National Park |
| Address and Concerned person for Correspondence | Deputy Director (South), Sanjay Gandhi National Park Address: Borivali East, Mumbai, Maharashtra 400066 Phone: 022 2886 0362 Email:ddsgnp@gmail.com |
| Availability of Tender - Bid Submission Start Date and Time | 06/05/2026 14.00PM |
| Pre-Bid Meeting | 15/05/2026 14.00PM |
| Availability of Tender - Bid Submission End Date and Time | 20/05/2026 14.00PM |
| Cost of bid document | Rs. 1120/- (non-refundable) to be paid online through the e-procurement portal |
| EMD / Bid Security Amount | Rs.50000/-online through E-procurement portal. EMD in any other form will not be accepted failing which the tender shall be Rejected summarily. |
| Date and time for opening of Technical Proposal | 21/05/2026 14.00PM |
| Method of submission of Proposal | Only through e-Procurement portal: website: http://mahatenders.gov.in |
| Validity of Bids | Minimum 90 days from the due date of submission of proposal as mentioned in this tender |

Note:
Tender document can be viewed/ downloaded from the website www.mahatenders.gov.in
- Bidders have to upload their bid document through online mode only on the www.mahatenders.gov.in. No hard copy shall be submitted.
- Bidders have to submit the document fee, processing fee amount Online only.
- EMD shall be submitted online on the eProcurement web site only on or before bid closing date & time. Scan copy of the proof shall be uploaded in eProcurement portal.
- Any further corrigendum/ addendum shall be uploaded on the e-procurement portal www.mahatenders.gov.in

-SD-
**Deputy Director (South), Sanjay Gandhi National Park Borivali East Mumbai**

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी ६२६

# माजी पंतप्रधान इम्रान खान यांची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

■ इस्लामाबाद

**अल-कादिर** ट्रस्ट १९० दशलक्ष पाऊंडच्या भ्रष्टाचार प्रकरणात पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांनी त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका इस्लामाबाद उच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. याप्रकरणातील केंद्रीय अपिलांवर आधीच सुनावणी निश्चित झाली असल्याचे न्यायालयाने नमूद केले.



सरन्यायाधीश सरदार मुहम्मद सरफराज डोगर यांच्या अध्यक्षतेखालील दोन सदस्यीय खंडपीठ ७ मे रोजी केंद्रीय अपिलांवर सुनावणी घेणार आहे. तोशाखाना भेटवस्तूंचा तपशील लपवल्याप्रकरणी इम्रान खान ५ ऑगस्ट २०२३ पासून रावळपिंडीच्या अदियाला तुरुंगात आहेत. १७ जानेवारी २०२५ रोजी १९० दशलक्ष पाऊंडच्या प्रकरणातही इम्रान खान यांना १४ वर्षांची आणि बुशरा बीबी यांना ७ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर याप्रकरणी आता दोघांनीही इस्लामाबाद उच्च न्यायालयात आपल्या शिक्षेला आव्हान दिले होते. १९० दशलक्ष पाऊंडचे हे प्रकरण २०१८ मध्ये स्थापन झालेल्या अल-कादिर ट्रस्ट या कल्याणकारी संस्थेशी संबंधित आरोपांशी निगडित आहे.

# तामिळनाडूत मंत्र्याचा एका मताने पराभव

■ चेन्नई

**तामिळनाडू** निवडणुकीतील तिरुपत्तूर मतदारसंघात अत्यंत अटीतटीच्या लढतीत द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके)चे ज्येष्ठ नेते आणि मंत्री के.आर.पेरियाकरुप्पन यांचा अवघ्या एका मताने पराभव झाला. या लढतीत तमिळगा वेत्री कळगम (टीव्हीके) पक्षाचे उमेदवार श्रीनिवास सेतुपती यांनी बाजी मारली. वीस वर्षांपासून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पेरियाकरुप्पन यांनी चार निवडणुका जिंकल्या होत्या. मात्र यावेळी त्यांना अवघ्या एका मताने पराभव पत्करावा लागला. दरम्यान, ओमानमध्ये नोकरीला असलेला मणिकंदन शिवनाथम हा या विजयाचा खरा सूत्रधार ठरल्याची चर्चा रंगली आहे. फक्त आपल्या आवडत्या नेत्याला आणि पक्षाला मत देण्यासाठी मणिकंदनने मस्कत ते तामिळनाडू असा विमान प्रवास केला.

# कृत्रिम हिरे निर्मितीसाठी गुजरात सरकारची १६ वीज उपकेंद्रे

■ सुरत

**गुजरातच्या** सुरतमधील नैसर्गिक हिऱ्यांना पैलू पाडण्याचा व्यवसाय जवळपास ठप्प झाला आहे. नैसर्गिक हिऱ्यांची जागा आता कृत्रिम हिरे (लॅब ग्रोन डायमंड) घेऊ पहात आहेत. सुरतमध्ये सध्या कृत्रिम हिरे निर्मितीच्या व्यवसायात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे या व्यवसायाला पायाभूत सुविधा पुरवण्याच्या उद्देशाने गुजरात सरकार या उद्योगासाठी १६ वीजपुरवठा उपकेंद्रे उभारणार आहे. कृत्रिम हिरे निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना अखंडित वीज पुरवठा करता यावा या उद्देशाने सरकारने हा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे.

वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने सुरतचे कृत्रिम हिरे निर्मिती करणारे उद्योजक त्रस्त झाले आहेत. त्याचा उत्पादनावर गंभीर परिणाम होत आहे. यामुळे या व्यवसायातील लाखो कामगार बेरोजगार होण्याचा धोका आहे, असा इशारा उद्योजकांनी दिला होता. त्याची गांभीर्याने दखल घेत सरकारने १६ नवी वीज पुरवठा उपकेंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

# मेहली मिस्त्रींचे विरोधात मतदान

पान १ वरून - वेणु श्रीनिवासन हे सध्या टाटा ट्रस्टचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. मात्र, जर ते टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्टसारख्या महत्त्वाच्या ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कायम राहू शकले नाहीत, तर त्यांच्या टाटा ट्रस्टमधील उपाध्यक्षपदावरही कायदेशीर आणि तांत्रिक प्रश्न उपस्थित होऊ शकतात. टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्ट हा टाटा सन्समध्ये भागीदार नसला तरी ५,००० कोटी रुपयांहून अधिक निधी असलेल्या या ट्रस्टचा प्रभाव टाटा नेटवर्कमध्ये मोठा आहे. देशातील शैक्षणिक क्षेत्रात ही संस्था कार्यरत आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर ८ मे रोजी टाटा ट्रस्टची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत टाटा सन्सच्या बोर्डावरील ट्रस्टच्या प्रतिनिधींच्या नियुक्तीचा आढावा घेतला जाणार आहे. टाटा सन्सचे आजीवन विश्वस्त नोएल टाटा यांनी अद्याप या विषयावर आपले मत व्यक्त केलेले नाही. या वादात त्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

## महावितरण — ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

म.रा.वि.वि.कं.मर्या, पुणे ग्रामीण मंडलांतर्गत बाहयस्त्रोताव्दारे मनुष्यबळ पुरविणेसाठी पात्र व नोंदणीकृत संस्था/फर्मकडून खालीलप्रमाणे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्रमांक | तपशील | निविदा रक्कम |
|---|---|---|
| SE/PRC/T-02/ 2026-27 | मुळशी विभागांतर्गत बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी कामगारांची सेवा पुराविणेबाबत | रु. ४४५/- लाख |
| SE/PRC/T-03/ 2026-27 | राजगुरुनगर विभागांतर्गत बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी कामगारांची सेवा पुराविणेबाबत | रु. ४९३/- लाख |
| SE/PRC/T-04/ 2026-27 | मंचर विभागांतर्गत बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी कामगारांची सेवा पुराविणेबाबत | रु. ७३५/- लाख |

सदर निविदा सूचना व निविदा प्रपत्र महावितरणच्या संकेतस्थळावर http://works.mahadiscom.in/e-Tender/etender दिनांक १८.०५.२०२६ (T-02 व T-03 साठी) व दिनांक २५.०५.२०२६ (T-04 साठी)पर्यंत उपलब्ध आहेत. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ७८७५७६७९०५

पी.आर.ओ.नं.- HO/PR/110/2026 अधीक्षक अभियंता, पुणे ग्रामीण मंडल

## BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION

Email:bncmc.cd@gmail.com

### Re-TENDER NOTICE NO. 19/2026-27

The Bhiwandi Municipal Corporation invites tender through e-tendering system from consultants for Appointment of Strategic Management & implementation consultant for Design, Development, Implementation and Monitoring of projects & reforms identified under city development plan of Bhiwandi Tender notice & tender document will be available on the website of of Main Portal- https://mahatenders.gov.in. The tender through e-tendering system will be accepted from 06/05/2026 up to 12/05/2026 E-tenders will be opened on at, if possible.

| Sr. No. | Name of Work | Cost of Blank tender form (Rs.) | EMD (Rs.) | Time limit for completion (months) |
|---|---|---|---|---|
| 1. | Appointment of Strategic Management & Implementation consultant for Design, Development, Implementation and Monitoring of projects & reforms identified under city development plan of Bhiwandi. | 2,000/- + 18% GST is equals to Total 2,360/- (to be paid online by NEFT/RTGS) | 5,00,000/- (to be paid online by NEFT/RTGS) | 36 months |

Pre-bid meeting for the tender will be held on 08/05/2026 at 11.00 AM at CITY ENGINEER OFFICE 5TH FLOOR, Bhiwandi Municipal Corporation Head office, Bhiwandi.

Rights to reject any or all tenders without assigning any reason thereof are reserved by the Commissioner and whose decision shall be final and legally binding on all the bidders.

Sd/-
(Jamil Patel)
CITY ENGINEER
Bhiwandi Nizampur City Municipal Corporation,

जा.क्र./ज.सं.वि./५७९

# 'एसबीआय' कर्मचाऱ्यांचा देशव्यापी संपाचा इशारा



■ मुंबई

**भारतीय** स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)च्या सेवा या महिन्याच्या अखेरीस विस्कळीत होण्याची शक्यता आहे. कर्मचाऱ्यांच्या संघटनेने दोन दिवसांच्या देशव्यापी संपाची घोषणा केल्यामुळे सलग चार दिवस बँकांचे कामकाज ठप्प राहण्याची शक्यता आहे.

ऑल इंडिया स्टेट बँक स्टाफ फेडरेशनने २५ आणि २६ मे रोजी संपाचा इशारा दिला आहे. त्यापूर्वी चौथा शनिवार २३ मे आणि २४ मे रविवार असल्याने बहुतांश शाखा सलग चार दिवस बंद राहू शकतात. मात्र, डिजिटल सेवा सुरू राहतील. काही व्यवहारांमध्ये विलंब होण्याची शक्यता आहे. युनियनच्या म्हणण्यानुसार, प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हा संप पुकारण्यात आला आहे. यात कर्मचाऱ्यांची कमतरता, सेवा अटी, भरती धोरण आणि पेन्शनशी संबंधित मुद्द्यांचा समावेश आहे. सार्वजनिक सुट्ट्यांचा विचार करता संप २७ मेपर्यंत वाढण्याची शक्यता देखील व्यक्त करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांनी सपोर्ट स्टाफची भरती वाढवणे, सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या स्थितीत सुधारणा करणे, वेतन विसंगती दूर करणे, तसेच नॅशनल पेन्शन सिस्टम अंतर्गत अधिक चांगले पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

याशिवाय करिअर प्रगतीत सुधारणा आणि पेन्शन गणनेत अतिरिक्त घटकांचा समावेश करण्याची मागणीही करण्यात आली आहे. मेसेंजर आणि सशस्त्र रक्षक पदांवरील भरतीत मोठी घट झाल्याचाही आरोप युनियनने केला आहे.

## SBI भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

### सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे इश्यूसाठी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा - ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०२१४५२७६ | श्रीमती एस शकीला | १५०० | १७७६२२ | १७७६२२ | ७४३५८१९०९१ | ७४३५८२०५९० |
| २ | ०१००८४४६ | विवियन जॉन डिसूजा श्रीमती नोरेन डिसूजा | २००० | २२२५८ | २२२६१ | ७३७७७७७४०१ | ७३७७७७९४०० |
| ३ | ०१०७९५५० | रवीन्द्र कुमार नाहटा | १००० | ११४४५४ | ११४४५४ | ७४०३५०३१३१ | ७४०३५०४१३० |
| ४ | ०१००६८४८ | अरुण कुमार अग्रवाल | ९७० | २२०९५ | १०५९६५ | ७३७७७१०३०१ | ७३९८९३३८३० |
| ५ | ०१००२७०१ | रमेश सिंह सिकरवार | ९७० | १०४६५५ | १०४६५६ | ७३९८७२२६४१ | ७३९८७२३६१० |

वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.

स्थळ: मुंबई
दिनांक: ०६.०५.२०२६

समभागांची संख्या: ६४४०
स.प्रमाणपत्रांची संख्या: ११

महाव्यवस्थापक (शेअर्स व बॉण्ड्स)

## महानिर्मिती — सुचना-एसआरएम-६

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत.

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६६०मेगावॅट/सीएचपी/टी-४८/आरएफएक्स-३००००६७८२४ | सीएचपी ३×६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे एनएबीएल कॅलिब्रेशन प्रमाणपत्र किंवा डब्ल्यू अँड एम लीगल मेट्रोलॉजी स्टॅम्पिंग प्रमाणपत्रासह ओआयएमएल मानक कॅलिब्रेशन कास्ट आयर्न एम१-एमएससीआय २००० किलो वजनाच्या ब्लॉकचे प्रापण. | रु. २८,२५०.०० / रु. २,४७५,०००.०० |
| २ | २१०मेगावॅट/सीएचपी/टी-४९/आरएफएक्स-३००००६८०६९ | सीएचपी-ऑगमेंटेशन प्लांट, २१० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे स्थापित स्टॅकर रिक्लेमर मशीनच्या स्ल्यू बेअरिंगच्या पुरवठ्यासह स्थापना आणि कार्यान्वयनाचे काम करणे. | रु. ११०,५००.०० / रु. १०,७००,०००.०० |
| ३ | ६६०मेगावॅट/बीएम/टी-५०/आरएफएक्स-३००००६७७१३ | कोराडी टीपीएस येथील युनिट-१० (६६० मेगावॅट) च्या ओव्हरहॉल दरम्यान एचपी व्हॉल्व्ह आणि सेफ्टी व्हॉल्व्हच्या इन-सिटू दुरुस्तीचे काम करणे. | रु. ४४,१५५.०० / रु. ४,०६५,४८४.६४ |
| ४ | ६६०मेगावॅट/को-ऑर्डिनेशन/टी-५१/आरएफएक्स-३००००६७९३२ | खुल्या निविदेद्वारे माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या ओएसडी करीता सीएम ऑफिस, हैदराबाद हाऊस, नागपूर येथे २४ तास दैनिक भाडे तत्वावर चालकासह प्रीमियम एमयुव्ही जसे इनोव्हा क्रिस्टा किंवा समकक्ष वाहन (टॅक्सी परमिटसह) उपलब्ध करून देणे. | रु. २०,५५२.५० / रु. १,७०५,२५०.०० |
| ५ | ६६०मेगावॅट/ओएस/टी-५२/आरएफएक्स-३००००६८०१९ | ३ × ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे जशी व जेव्हा आवश्यकतेनुसार दगड, नागरी ढिगारा, भंगार साहित्य आणि आरसीएफ कोळसा निर्दिष्ट ठिकाणी पोहोचवण्यासाठी कामाचे कंत्राट. | रु. २०,१७७.३० / रु. १,६६७,७३०.०० |
| ६ | ६६०मेगावॅट/डिस्पेनसरी/टी-५३/आरएफएक्स-३००००६८०७८ | वर्ष २०२६-२७ साठी ई निविदेद्वारे औषधांची प्रापण अनुसूची ''ए'' टॅब्लेट, कॅप्सूल (अँटीबायोटीक, वेदनाशामक, आम्लशामक) | रु. ५७,०५९.५० / रु. ५,३५५,९५०.०० |

ई-निविदेसाठी विक्रेत्यांना त्यांच्या संस्थेची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशिलासाठी संकेतस्थळावर लॉग ऑन करा.
कोणत्याही प्रश्नांकरीता संपर्क साधावा: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१-८४११९५८६२२, ई-मेल आयडी: eepurchasekoradi@mahagenco.in

हस्ता/-
मुख्य अभियंता (ओ अँड एम)
महानिर्मिती,केटीपीएस,कोराडी

# पुण्यात पुन्हा अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

**पुणे** - पुण्यातील नसरापूर येथील ३ वर्षीय मुलीवरील लैंगिक अत्याचार आणि हत्येची घटना ताजी असतानाच पर्वती भागात पुन्हा ९ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न झाला. हा धक्कादायक प्रकार लक्षात येताच नागरिक चांगलेच आक्रमक झाले. संशयित आरोपींना पर्वती पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र यावेळी नागरिक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरले होते. त्यांनी आरोपींना त्यांच्या ताब्यात देण्याची मागणी केली. वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी गर्दी कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानंतर नागरिकांनी पर्वती पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या मांडला.

# लातूरमध्ये पेट्रोल-डिझेलची टंचाई

■ लातूर

**लातूर** जिल्ह्यात पेट्रोल - डिझेलच्या तुटवड्यामुळे परिस्थिती तणावपूर्ण झाली असून बहुतांश पेट्रोलपंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी डिझेलचे दर ३ हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याच्या चर्चा रंगत असल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. गेल्या दोन दिवसांपासून इंधनटंचाई कायम असून, मर्यादित साठ्यामुळे पंपांवर मोठी गर्दी उसळली आहे. सलग सुट्ट्यांमुळे मागणीत अचानक वाढ झाल्याने हा तुटवडा निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

## ajanta pharma

Regd. Office: Ajanta Tower, 54-A, M Vasanji Road, Chakala, Andheri (E), Mumbai – 400 093
Phone - + 91-22-60609000, Fax - +91-22-66061200
CIN - L24230MH1979PLC022059
Email - info@ajantapharma.com, Website - www.ajantapharma.com

### Extract of Audited Consolidated Financial Results for the quarter and year ended 31 March 2026

₹ in Crore

| | Particulars | Quarter ended 31-Mar-26 | Year ended 31-Mar-26 | Quarter ended 31-Mar-25 | Year ended 31-Mar-25 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 1,421.64 | 5,452.86 | 1,170.41 | 4,648.10 |
| 2 | Net Profit for the period before tax (before exceptional and/or extraordinary items) | 347.11 | 1,377.65 | 269.41 | 1,189.16 |
| 3 | Net Profit for the period before tax (after exceptional and/or extraordinary items) | 347.11 | 1,377.65 | 269.41 | 1,189.16 |
| 4 | Net Profit for the period after tax (after exceptional and/or extraordinary items) | 266.70 | 1,056.00 | 225.26 | 920.39 |
| 5 | Total Comprehensive Income for the period (comprising profit for the period after tax and other comprehensive income after tax) | 284.81 | 1,085.08 | 227.30 | 922.24 |
| 6 | Equity Share Capital | 25.07 | 25.07 | 25.07 | 25.07 |
| 7 | Reserve (excluding Revaluation Reserve) | | 4,502.02 | | 3,765.22 |
| 8 | Earnings Per Share (FV of ₹ 2/- each) (a) Basic - in ₹ (b) Diluted - in ₹ | 21.35<br>21.34 | 84.53<br>84.51 | 18.00<br>18.00 | 73.56<br>73.53 |

**Key information on Standalone Financial Results :**

| Particulars | Quarter ended 31-Mar-26 | Year ended 31-Mar-26 | Quarter ended 31-Mar-25 | Year ended 31-Mar-25 |
|---|---|---|---|---|
| Total Income from Operations | 1,210.53 | 4,845.92 | 1,013.94 | 4,322.04 |
| Profit Before Tax | 257.61 | 1,231.03 | 228.15 | 1,180.06 |
| Profit After Tax | 197.28 | 946.82 | 193.43 | 916.89 |
| Total Comprehensive Income | 199.56 | 946.51 | 192.00 | 911.06 |

**Notes:**

1. The above financial results have been reviewed by Audit Committee and thereafter approved by the Board of Directors at their meeting held on 5 May 2026.
2. The above is an extract of the detailed format of Audited Financial Results filed with Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) regulations, 2015. The full format of the audited financial results is available on stock exchange websites www.nseindia.com and www.bseindia.com and on Company's website www.ajantapharma.com. The same can be accessed by scanning the QR code provided below.

By order of the Board
For Ajanta Pharma Ltd.

Sd/-
Yogesh M. Agrawal
Managing Director
DIN: 00073673

Mumbai, 5 May 2026

## Navi Mumbai Municipal Corporation

**Corrigendum - Date Extension**
**Public Health Engineering Department**
**Tender Notice No. NMMC/ACE_(Civil)/6/2026-27**

| Sr. No. | Name of Work | Tender type |
|---|---|---|
| 1 | (96099) Supplying, Installation, Testing and Commissioning of Online Continuous Effluent Monitoring System (OCEMS) at Inlet & Outlet site of STP under Jal Hi Amrut incentive at Nerul Sector-50 STP in Belapur Ward. | Rs.85,37,000/- |
| 2 | (96107) Supplying, Installation, Testing and Commissioning of Online Continuous Effluent Monitoring System (OCEMS) at Inlet & Outlet site of STP under Jal Hi Amrut incentive at Vashi Sector-18 STP in Turbhe Ward. | Rs.85,37,000/- |
| 3 | (96109) Supplying, Installation, Testing and Commissioning of Online Continuous Effluent Monitoring System (OCEMS) at Inlet & Outlet site of STP under Jal Hi Amrut incentive at Koperkhirane Sector-14 STP in Koperkhairne Ward. | Rs.85,37,000/- |
| 4 | (96111) Supplying, Installation, Testing and Commissioning of Online Continuous Effluent Monitoring System (OCEMS) at Inlet & Outlet site of STP under Jal Hi Amrut incentive at Ghansoli Sector-15 STP in Ghansoli Ward. | Rs.1,28,00,000/- |
| 5 | (96110) Supplying, Installation, Testing and Commissioning of Online Continuous Effluent Monitoring System (OCEMS) at Inlet & Outlet site of STP under Jal Hi Amrut incentive at Airoli Sector-18 STP in Airoli Ward. | Rs.85,37,000/- |
| 6 | (96106) Supplying, Installation, Testing and Commissioning of Online Continuous Effluent Monitoring System(OCEMS) at Inlet & Outlet site of STP under Jal Hi Amrut incentive at Belapur Sector-12 STP in Belapur Ward. | Rs.85,37,000/- |
| 7 | (96108) Supplying, Installation, Testing and Commissioning of Online Continuous Effluent Monitoring System(OCEMS) at Inlet & Outlet site of STP under Jal Hi Amrut incentive at Sanpada Sector-20 STP in Turbhe Ward. | Rs.85,37,000/- |

**This is to inform all concerned that the date for, originally scheduled on Dt.06/05/2026, has been extended as below.**

**Time Scheduled for the E-Tender**

| Description | | Original Date and time | Extended Date and Time |
|---|---|---|---|
| Period for sale & upload of E-Tender | - | Date:- 21/04/2026 10:00 hours onwards to | ------ |
| Period for submission of E-Tender | - | Date:-05/05/2026upto 15:00 hours. | Date:- 08/05/2026upto 15:00 hours. |
| Date of opening of E-Tender | - | Date:-06/05/2026 on 15:05 hours (if possible) | Date :- 11/05/2026 on 15:05 hours (if possible) |

**All other terms and conditions remain unchanged**

Sign/-
**(Arvind Shinde)**
**Additional City Engineer (Civil)**
**Navi Mumbai Municipal Corporation**

NMMCPRAdv/353/2026

# अर्जुनला मोठा दिलासा

अभिनेता अर्जुन कपूरला त्याच्या 'पर्सनॅलिटी राईट्स' अर्थात व्यक्तिमत्त्व हक्कांच्या संरक्षणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. आपल्या नावाचा, आवाजाचा, छायाचित्रांचा किंवा इतर कोणत्याही वैयक्तिक ओळखीचा व्यावसायिक फायद्यासाठी अनधिकृत वापर करणाऱ्यांविरोधात अर्जुन कपूरने न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणात न्यायालयाने त्याला अंतरिम दिलासा दिला असून, त्याच्या संमतीशिवाय त्याच्या वैयक्तिक माहितीचा वापर करण्यास विविध संस्था आणि व्यक्तींना प्रतिबंध केला आहे.

इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या युगात सेलिब्रिटींच्या नावाचा किंवा प्रतिमेचा गैरवापर करून फसवणूक करण्याचे किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिराती करण्याचे प्रमाण वाढले आहे. अर्जुन कपूरने या प्रवृत्तीला चाप लावण्यासाठी कायदेशीर पाऊल उचलले होते. न्यायालयाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अर्जुन कपूरच्या व्यक्तिमत्त्वाचा कोणताही भाग अनधिकृतपणे वापरला जाणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश दिले आहेत.



## तापसी बनली ब्रँड ॲम्बेसेडर


प्रसिद्ध अभिनेत्री तापसी पन्नूची आता 'इनॅमर' या नामांकित ब्रँडच्या नवीन मोहिमेसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे. महिलांच्या फॅशन आणि अंतर्वस्त्र निर्मिती क्षेत्रात अग्रेसर असलेल्या या कंपनीने तापसीसोबतच्या या नव्या सहकार्याची घोषणा केली आहे. या मोहिमेद्वारे महिलांच्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास आणि आधुनिकतेचा मिलाफ साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तापसी पन्नू तिच्या धाडसी आणि हटके भूमिकांसाठी ओळखली जाते. 'इनॅमर'च्या मते, तापसीचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या ब्रँडच्या मूल्यांशी तंतोतंत जुळणारे आहे. ही नवी मोहीम आधुनिक भारतीय महिलेच्या गरजा आणि तिच्या प्रगतीशील विचारांचे प्रतिनिधित्व करते. तापसीने देखील या ब्रँडशी जोडले गेल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

चित्रपटसृष्टीतील यशस्वी कारकिर्दीसोबतच तापसी आता जाहिरात क्षेत्रातही आपली पकड मजबूत करत आहे. मोठ्या ब्रँडसोबत तिचे जोडले जाणे हे तिच्या वाढत्या लोकप्रियतेचे प्रतीक मानले जात आहे.



## आयर्नमॅनचा नवा पराक्रम



भारताचा 'आयर्नमॅन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मिलिंद सोमणने वयाच्या ५८ व्या वर्षी पुन्हा एकदा आपल्या अचाट शारीरिक क्षमतेचे दर्शन घडवले आहे. मिलिंदने युरोप आणि आफ्रिका खंडांना जोडणारी जिब्राल्टरची सामुद्रधुनी पोहून पार करण्याचा पराक्रम केला आहे. सुमारे १५ किलोमीटरचे हे अंतर त्याने यशस्वीपणे कापले असून, त्याच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिब्राल्टरची सामुद्रधुनी पोहून पार करणे हे अत्यंत आव्हानात्मक मानले जाते. कारण येथील पाण्याचा प्रवाह आणि हवामानातील बदल वेगवान असतात. मिलिंदने हे अंतर पूर्ण केल्यानंतर समाजमाध्यमावर आपला आनंद व्यक्त केला. त्याच्या या जिद्दीला अभिनेता नील नितीन मुकेश याने दाद दिली असून, तू आम्हा सर्वांसाठी प्रेरणा आहेस, अशा शब्दांत त्याचे अभिनंदन केले आहे. मिलिंद सोमणची ही कामगिरी पाहून त्याचे चाहते थक्क झाले आहेत. वाढत्या वयातही तंदुरुस्तीचे इतके कडक निकष पाळणारा मिलिंद हा तरुणांसाठी आदर्श ठरला आहे. या मोहिमेदरम्यानचे त्याचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून, नेटिझन्स त्याच्या शिस्तीचे आणि जिद्दीचे कौतुक करत आहेत.

## वरुणच्या उपक्रमाला पसंती



बॉलिवूड अभिनेता वरुण धवनच्या लोकप्रियतेचा नवा आयाम सध्या डिजिटल व्यासपीठावर पाहायला मिळत आहे. वरुण धवनचा सहभाग असलेल्या 'ड्रीम ११' या प्लॅटफॉर्मवरील 'डगआऊट डिशूम' या उपक्रमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, या आशयाने तब्बल ३ कोटी ६४ लाख व्ह्यूजचा टप्पा ओलांडला आहे. वरुणच्या चाहत्यांनी या डिजिटल मोहिमेला दिलेली ही पसंती सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. 'डगआऊट डिशूम'च्या माध्यमातून वरुणने क्रिकेट आणि मनोरंजन यांचा सुरेख संगम प्रेक्षकांसमोर मांडला होता. या उपक्रमातील वरुणचा उत्साह आणि खेळाप्रती असलेली त्याची ओढ चाहत्यांना भावली असून, अल्पावधीतच या व्हिडिओला विक्रमी व्ह्यूज मिळाले आहेत. क्रीडा प्रेमी आणि चित्रपट प्रेमी अशा दोन्ही वर्गांनी या आशयाला पसंती दर्शवली आहे.

वरुण हा सध्याच्या पिढीतील एक अत्यंत यशस्वी आणि लोकप्रिय अभिनेता असून, त्याची ब्रँड व्हॅल्यू सातत्याने वाढत आहे.

## करीना बनणार 'सुपरहिरोईन'?



बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान आता एका आगळ्यावेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार असून, तो दिग्दर्शक जोडी राज आणि डीके यांच्या आगामी सुपरहिरो चित्रपटात काम करणार आहे. या बिग बजेट चित्रपटासाठी अभिनेत्री म्हणून सध्या करीना कपूर खानचे नाव आघाडीवर असून, तिच्याशी बोलणी अंतिम टप्प्यात असल्याची चर्चा आहे. या भूमिकेसाठी आधी सामंथा रुथ प्रभूच्या नावाची चर्चा होती. मात्र ताज्या घडामोडींनुसार करीना कपूरने या भूमिकेत रस दाखवला असून, तिने मौखिक संमती दिल्याचे समजते. खुद्द सलमान खानने करीनाशी संपर्क साधून या प्रकल्पाबाबत चर्चा केली आहे. सर्व काही नियोजित पद्धतीने पार पडले, तर सलमान आणि करीनाची जोडी तब्बल ११ वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र दिसेल. यापूर्वी त्यांनी 'बजरंगी भाईजान' (२०१५), 'बॉडीगार्ड', 'क्यूँ की' आणि 'मै और मिसेस खन्ना' यांसारख्या चित्रपटांत एकत्र काम केले आहे.

अतुल अग्निहोत्री आणि मैत्री मुव्ही मेकर्स यांची निर्मिती असलेला हा चित्रपट सलमानच्या चाहत्यांसाठी खास असणार आहे. यात सलमान एका वृद्ध सुपरहिरोची भूमिका साकारणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

## अर्जन बाजवाची खंत



बॉलिवूडमध्ये स्वतःची ओळख निर्माण केलेला अभिनेता अर्जन बाजवा याने सिनेसृष्टीतील बाहेरचा व्यक्ती (आऊटसायडर) असण्याबाबत आणि त्यातून येणाऱ्या संघर्षावर स्पष्टपणे भाष्य केले आहे. कोणत्याही गॉडफादरशिवाय किंवा भक्कम पाठिंब्याशिवाय चित्रपटसृष्टीत काम करताना अनेकदा चांगल्या संधी हातच्या निसटतात किंवा त्या मिळण्यास मोठा विलंब होतो, अशी खंत त्याने व्यक्त केली आहे.

'फॅशन' आणि 'रुस्तम' सारख्या चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवणाऱ्या अर्जनने एका मुलाखतीत सांगितले की, जेव्हा तुमचा इंडस्ट्रीत कोणी वारसदार नसतो, तेव्हा तुम्हाला प्रत्येक टप्प्यावर स्वतःला सिद्ध करावे लागते. अनेकदा मोठ्या बॅनरचे चित्रपट किंवा महत्त्वाच्या भूमिका केवळ वशिलेबाजीमुळे किंवा ओळखीमुळे दुसऱ्यांना मिळतात, हे वास्तव त्याने मांडले आहे. प्रस्थापित कुटुंबातील कलाकारांना मिळणाऱ्या संधी आणि आऊटसायडर्सना करावा लागणारा संघर्ष यात मोठी दरी असल्याचे त्याचे मत आहे. अर्जनच्या मते, संधी उशिरा मिळणे किंवा डावलले जाणे यामुळे अनेकदा मानसिक दडपण येते, परंतु चिकाटी सोडली नाही तर यश नक्की मिळते. टॅलेंट असूनही केवळ योग्य पाठबळ नसल्यामुळे अनेक कलाकार मागे पडतात, याकडे त्याने लक्ष वेधले आहे.

---

## आंब्याच्या झाडाला 'सीताफळ' भिवंडीत निसर्गाचा चमत्कार

■ भिवंडी

**निसर्गाचा** एक अजब चमत्कार भिवंडी तालुक्यात पाहायला मिळत आहे. या ठिकाणी एका आंब्याच्या झाडाला चक्क सीताफळ लागले असून, हा दुर्मीळ चमत्कार पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिक मोठी गर्दी करत आहेत.

भिवंडी - वाडा रस्त्यावरील दगाड फाटा परिसरातील साईगाव अस्नोली येथे शेतकरी जयेश पटेल यांचे घर आहे. त्यांच्या घराच्या अंगणात गेल्या आठ वर्षांपासून आंब्याचे एक झाड आहे. सध्या या झाडाला आंबे लागले आहेत. मात्र २ मे रोजी या झाडाखाली खेळणाऱ्या मुलांना काहीतरी वेगळे दिसले.

नीट पाहिल्यावर आंब्याच्या फांदीला सीताफळ लागल्याचे त्यांच्या लक्षात आले. मुलांनी ही बाब घरातील मोठ्या माणसांना सांगितली. सुरुवातीला कोणाचाही विश्वास बसला नाही. मात्र प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर कुटुंबीयही आश्चर्यचकीत झाले. या घटनेचा व्हिडिओ जितेंद्र भोईर यांनी सोशल मीडियावर व्हायरल केला. सध्या तो व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे. एकाच झाडावर दोन वेगवेगळ्या प्रकारची फळे येणे हे वनस्पतीशास्त्राच्या दृष्टीने दुर्मीळ आहे.

## भगवंत मान आणि राघव चड्ढांनी एकाच दिवशी राष्ट्रपती मुर्मू यांची भेट घेतली

■ नवी दिल्ली

**आम** आदमी पक्षाचे ६ खासदार भाजपामध्ये सामील झाल्याच्या पार्श्वभूमीवर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आज येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. भेटीनंतर मान म्हणाले की, संपूर्ण पक्ष दोन-तृतीयांश बहुमताने दुसऱ्या पक्षात विलीन होऊ शकतो, पण केवळ एका सभागृहातील ६-७ सदस्यांनी असा निर्णय घेणे योग्य नाही. ही मनमानी आहे आणि लोकशाहीची थट्टा आहे.



मान यांनी पुढे सांगितले की, पंजाबमध्ये भाजपाचे केवळ २ आमदार असताना राज्यसभेत ६ खासदार होणे हे संविधानाची खिल्ली उडवणारे आहे. त्यांनी संविधानात दुरुस्ती करून 'राईट टू रिकॉल' लागू करण्याची मागणी केली. ते सकाळीच ९० आमदारांना ३ व्हॉल्वो बसमधून घेऊन दिल्लीत पोहोचले होते.

दरम्यान, आप सोडून गेलेले खासदार राघव चड्ढा, अशोक मित्तल आणि संदीप पाठक यांनीही राष्ट्रपतींची भेट घेतली. त्यांनी पक्ष सोडल्यानंतर पंजाब सरकारकडून सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून त्यांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप केला. चड्ढा म्हणाले की, आप बदला घेण्याच्या राजकारणात गुंतली आहे. इतरांवर आरोप करणारेच आता बदला घेत आहेत. आप धोकादायक खेळ खेळत आहे आणि त्याचा शेवटही धोकादायक ठरेल.

## मुंबई उपनगरात ९५ ठिकाणी दरडी कोसळण्याचा धोका

पालिकेचा अहवाल

■ मुंबई

मुंबईसह उपनगरातील विविध ठिकाणाच्या ९५ जागी दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे महापालिकेने आपल्या अहवालात यंदा स्पष्ट केले आहे, अशी धक्कादायक माहिती मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातून देण्यात आली.

काही महिन्यांवर पावसाळा आला आहे. त्यामुळे दरडीवर व त्याच्या लगत राहणाऱ्या झोपडीधारकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न यंदाही ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या आपत्कालीन विभागाच्या सुचनेनुसार शहरात २९, पूर्व उपनगरात ५२, पश्चिम उपनगरात १४ अशा एकूण ९५ जागी पावसाळ्यात दरडी कोसळण्याची शक्यता दिसून येत आहे. अशी माहिती देऊन म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या कार्यालयातून पुढे असे सांगण्यात आले की, वरळी, भायखळा, डोंगरी, शिवडी, मलबार हिल, मालाड, दिंडोशी, गोरेगाव, जोगेश्वरी आदि भागात दरडीलगत ९ मीटर उंचीच्या संरक्षण भिंतीची कामे जिल्हा नियोजन समितीची प्रशासकीय मान्यता घेऊन सुरू करण्यात आली आहेत. संरक्षण भिंती बांधण्याची कामे ३१ मे पर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

## एलआयसी कार्यालयासमोर उबाठाचे जोरदार आंदोलन

■ मुंबई

**मराठी** अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत डावलले जात असल्याचा आरोप करत उबाठाकडून आज एलआयसी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात उबाठाचे नेते विनायक राऊत यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते सहभागी झाले. तसेच खासदार अरविंद सावंत, आमदार सुनील शिंदे आणि खासदार संजय दिना पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. कार्यकर्त्यांनी 'मराठीची होणारी गळचेपी बंद करा' अशा घोषणा देत हातात फलक घेऊन निषेध व्यक्त केला. मुंबईसारख्या राज्याच्या राजधानीत मराठी माणसांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत शिवसैनिकांनी व्यवस्थापनाविरोधात संताप व्यक्त केला. यावेळी आंदोलकांनी मराठी माणसांवर अन्याय सहन केला जाणार नाही आणि गरज पडल्यास आणखी तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा दिला.

## सरकार आपटावेच लागेल जरांगे-पाटलांचा हल्लाबोल

■ सोलापूर

**देशातील** पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले असून, भाजपाने तीन राज्यांत स्पष्ट बहुमताने सरकार स्थापन होईल. मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनीही भाजपाच्या विजयावर शंका उपस्थित केली आहे. तसेच, राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरूनही संताप व्यक्त करत, फडणवीसांचे सरकार आपटावेच लागेल, असेही म्हटले.

सध्या राज्यात वाढलेल्या गुन्हेगारीबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधताना जरांगे म्हणाले की, हे असले रत्न आपल्याला लाभले आहेत, हे गुंडांना जेलमध्ये एसी लावून देतात आणि मोबाईल फोन देतात. यांच्या काळात गुंडांचे चालणार आहे. फडणवीसांचे सरकार राक्षसी वृत्तीचे असून, आता ते आपटावेच लागेल.

जरांगे-पाटील पुढे म्हणाले की, ज्याला विचारले ते म्हणतो मी यांना मतदान केले नाही, तरी हे जिंकतात. पश्चिम बंगालमध्ये ममता बाईला पाडले, पण लोक म्हणतात ममताबाई कधीच पडणार नाहीत.

मला पहिल्यांदा वाटायचे, काही नसेल. पण आता नक्की काहीतरी भानगड आहे, त्यांनी कुठेतरी काड्या खोचून ठेवल्या आहेत.

## डोंबिवलीत पाणीपुरवठा २ दिवस बंद राहणार

**ठाणे**- बारवी (जांभूळ) जल शुद्धीकरण केंद्राच्या नियोजित देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे डोंबिवली आणि परिसरातील पाणीपुरवठा दोन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय एमआयडीसीने घेतला आहे. त्यानुसार, गुरुवारी ७ मे रोजी दुपारी १२ वाजल्यापासून शुक्रवारी ८ मे दुपारी १२ वाजेपर्यंत, तसेच २१ मे रोजी दुपारी १२ वाजल्यापासून २३ मे रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत २४ तासांकरिता बंद राहणार आहे. यामध्ये डोंबिवली आणि तळोजा औद्योगिक क्षेत्रासह कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर पालिकेतील नागरिकांचा समावेश आहे.

## तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे

■ मुंबई

**धाराशिव** जिल्ह्यातील तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या माध्यमातून चालवले जाणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे महाविद्यालयाचे सक्षमीकरण होणार असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि परवडणारे अभियांत्रिकी शिक्षण उपलब्ध होणार आहे.

या हस्तांतरण प्रक्रियेसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यापूर्वी पाच सदस्यीय तज्ज्ञ समिती स्थापन केली होती. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या प्रक्रियेला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार शासन निर्णयाद्वारे समिती गठीत करण्यात आली होती.

## वसई-विरारमधील रेल्वे उड्डाणपुलांचा मार्ग मोकळा

पहिल्या टप्प्यात दोन उड्डाणपूल

■ वसई

**वसई**-विरार शहरातील प्रस्तावित ४ उड्डाणपुलांच्या मार्गातील अडचणी दूर झाल्याने या पुलांच्या निर्मितीमधील अडथळा दूर झाला आहे.

वसई-विरार शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी लोकनेते माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी ४ रेल्वे उड्डाणपुलांचा प्रस्ताव एमएमआरडीएकडे पालिकेमार्फत मांडला होता. त्यात उमेळमान (वसई), आचोळे (नालासोपारा) अलकापुरी (नालासोपारा) आणि विराट नगर (विरार) या चार उड्डाणपुलांचा समावेश होता. या पुलांना मंजुरी मिळूनही काम रखडले होते. यासंदर्भात महापौर अजीव पाटील यांनी नुकतीच एमएमआरडीएच्या आयुक्तांबरोबर बैठक घेतली होती. आज या पुलांच्या कामाच्या पाहणीसाठी एमएमआरडीएने महापौरांसमवेत या प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलांचा पाहणी दौरा केला. या दौऱ्यात पुलाचा नियोजित आरखडा व त्यात येणाऱ्या अडचणीवर चर्चा करण्यात आली. रेल्वे स्थानक व रेल्वे रुंदीकरण काम सुरू असल्याने पुलाच्या कामाला विलंब झाल्याचे एमएमआरडीएने सांगितले.

पहिल्या टप्प्यात विरारमधील विराट नगर आणि नालासोपारामधील ओस्वालनगरी हे दोन रेल्वे उड्डाणपूल तयार केले जाणार आहेत.

## लोकार्पणनंतर स्कायवॉकचे सरकते जिने कुलुपात

■ मुंबई

**तीन** महिन्यांपूर्वी लोकार्पण सोहळा पार पडलेल्या वांद्रे (पूर्व) येथील स्कायवॉकचे स्वयंचलित जिने कुलुपात बंद करून ठेवण्याची नामुष्की पालिकेवर आली आहे. त्यामुळे स्वयंचलित जिन्यांच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मुंबई पालिकेने लाखो रुपये खर्चून वांद्रे रेल्वे स्थानक ते कलानगरपर्यंत जोडणारा ६८० मीटर लांबीचा स्कायवॉक बांधला आहे. या स्कायवॉकचा लोकार्पण सोहळा २६ जानेवारी २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या गाजावाजात संपन्न झाला होता. मात्र स्वयंचिलत जिने अधूनमधून बंद पडू लागल्यामुळे अखेर पालिकेने हे जिने लोखंडी गेटच्या कुलुपात बंद करून ठेवले आहेत. यामुळे पादचाऱ्यांना आता पायी बांधलेल्या जिन्यांचा ये-जा करण्यासाठी वापर करावा लागत आहे.

## संगीतकार पलाश मुच्छल अडचणीत सांगलीत ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल




■ सांगली

**संगीतकार** व गीतकार पलाश मुच्छल पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपावरून त्यांच्या विरोधात ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत सांगली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही तक्रार भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मंधाना हिच्या बालमित्राने, विज्ञान प्रकाश माने यांनी दिली आहे. फिर्यादीनुसार, २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सांगली-आष्टा मार्गावरील टोल नाका परिसरात हा प्रकार घडला. तक्रारीत म्हटले आहे की, पलाश मुच्छल यांनी चित्रपट निर्मितीसाठी विज्ञान माने यांच्याकडून २५ लाख रुपये घेतले होते. त्यानंतर पैसे परत मागण्यासाठी माने यांनी संपर्क साधला असता, वाद निर्माण झाला आणि मुच्छल यांनी त्यांना जातीवाचक शिवीगाळ केली.

यापूर्वीही या प्रकरणामुळे मुच्छल चर्चेत आले होते. नोव्हेंबर २०२५ मध्ये सांगली येथे स्मृती मंधाना आणि पलाश मुच्छल यांच्या विवाहाची चर्चा होती, तो विवाह रद्द झाला. त्यानंतर जानेवारी महिन्यात विज्ञान माने यांनी मुच्छल यांच्याविरोधात फसवणुकीची तक्रारही दाखल केली होती. आता नव्याने दाखल झालेल्या तक्रारीनंतर सांगली शहर पोलिसांनी मुच्छल यांच्याविरोधात ॲट्रॉसिटीच्या कलमाखाली गुन्हा नोंदवला आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१५९७



**आडवे शब्द –**

१. हुद्दा ३. सुकुमार, कोमल ६. कधीही न संपणारे शत्रुत्व याअर्थी वाक्प्रचार ११. नवनाथांपैकी एकाच्या नावाने प्रसिद्ध असलेले झाड १३. अंगरखा १५. सोन्याच्या शुद्धतेचा अंश १६. नांगर १७. डास १८. सरशी २०. डोक्यावरचे सगळे केस उतरविणे २२. गुरे बांधण्याचा दोर २५. प्रखर, उग्र २७. पूर्व दिशा २८. खळगा ३०. एकाच छापाच्या वस्तू तयार करण्याचे साधन ३१. गगन ३२. आरडाओरडा ३२. नेत्र, डोळे ३३. श्रीकृष्णाचा दादा ३६. प्रचंड, महाकाय, विशाल ३८. गुंफा ३९. त्रास, पीडा ४०. पूजेचे नक्षीदार ताट ४१. प्रवासी ४२. वृद्धी ४३. पूर्वी वापरली जाणारी कोवळ्या बांबूची लेखणी ४४. आकलन, जाण ४५. परिवर्तन ४६. लोचट ४८. पथकर ४९. शय्या ५०. तल्लीन ५१. सुकल्यावरही गंध देणारी फुले ५३. निद्रा, झोप ५५. परीघ ५७. खायला चिवट ६०. अभिमानी ६१. जखमेची खूण ६२. ढीग, शीग ६३. मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंतचा काल ६४. जानकी ६५. पूर्वी वनस्पती तूपाला या नावाने ओळखत ६८. दिवा ७०. उघड, प्रकट ७२. परिचय ७४. घनदाट जंगल ७६. दूर्वांचे गवत ७८. बोलावणे ८०. लगेच ८२. माज ८३. थांगपत्ता ८४. पलंग ८५. मृत्यू ८६. पंख ८७. शक्तिशाली ८९. गाडीचा चालक ९०. मांडी, गुणाकार ९१. झाड ९२. मासेमारीचा हूक ९३. स्वत:मध्ये काही कमतरता असल्याची भावना ९४. अंगरख्याचा घोळ ९५. पहिलवान ९६. अनियंत्रित जमाव ९९. कायमस्वरूपी १००. वार्धक्य १०२. वाईट १०४. आच, उष्णता १०५. पावलांचा आवाज १०६. चांगले १०७. नियमभंग १०८. मेघगर्जना

**उभे शब्द –**

१. 'अनुदिनी अनुतापे तापलो रामराया....' समर्थ रामदास यांच्या करूणाष्टकाची सुरूवात २. स्वच्छंद ३. काळजीत पडलेला ४. पड ५. किरकिर ६. शोक ७. बावळट ८. फजिती ९. आनन १०. घोडा, बैल यांच्या पायाला ठोकलेला पत्रा ११. सायंकालीन मुहूर्त १२. ओशाळलेला १४. सर्दी झाल्यावर घेतला जाणारा पातीचा चहा १९. सलगी २१. मोठी नदी २३. शर्टचा प्रकार २४. विचारांच्या पातळीवरचे २६. लोभी २७. विनाकारण २९. उठबस, वावर ३४. धांदल, घाई ३५. स्वार्थ ३६. अधू, असहाय ३७. टिंगलखोर ३८. शिक्षक ३९. कायदेशीर ४३. अति बोलणारा ४४. बट्ट्याबोळ ४७. गुणवत्तेला वाव न देता नात्यातील व्यक्तीला संधी देण्याचा प्रकार ५०. शासन, आथिऱ्क शिक्षा ५२. काम टाळणे ५४. शाब्दिक मार, बोलणी ५६. वाळवंट ५८. दुसऱ्यासाठी घेतलेला त्रास ५९. अंगावर रोमांच उठवणारे ६६. ध्येय, उद्दिष्ट ६७. गुरांचा समूह ६९. वायू ७०. करवंदाची झाडी ७१. जत्रेतला पाळणा, जगरहाटी ७३. प्रयत्न ७५. घर, वास्तू ७७. जोर, बळ ७९. जळण ८१. हात ८२. नेमस्त ८५. राहण्याची जागा ८७. होडके ८७अ. अश्म ८८. कर्णाचा विशेष गुण ९०. हार ९१. हुशार, प्रसंगावधानी ९६. उसळलेली गर्दी ९७. नस्ते लचांड ९८. शाप १०१. दशरथाचा ज्येष्ठ मुलगा १०३. संताप १०४. पुस्तकातील पाठ, अद्दल घडवणे-xxशिकवणे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. झगडा ३. वाण ४. चाकरी ६. विप्र ८. अचानक ११. लीलया १५. वड १७. नुपेक्षी कदा रामदासाभिमानी २०. पारपटल २३. शत २४. यज्ञ २५. तप २७. ढाल २९. दार ३२. लग्नसराई ३४. फोलपट ३६. दूर घर माझे ३८. दास ३९. बल ४०. बोध ४२. टक्कर ४३. बत्ती ४४. खुसपट ४५. गडवा ४७. कर ४९. समा ५१. चेहरा ५२. तपासणी ५४. आत्या ५६. वणी ५७. रत ५९. रुपे ६०. डाकू ६२. राब ६३. पलायन ६४. सकस ६५. सपक ६६. चकवा ६८. तरट ७०. दीनवाणा ७२. ठोक ७३. रसिक ७५. अवनी ७६. सवाल ७८. रक्षा ८१. बुजगावणे ८३. सविता ८५. तणावग्रस्त ८६. भाडेकरू ८८. बाळ ९०. नार ९१. अळी ९२. राज ९३. परिणय ९५. रोखपाल ९७. ओम ९९. दुरावा १००. कडू १०२. गारूड १०३. नकार १०४. तरबेज १०५. गरज

**उभे शब्द** : १. झरा २. डाली ३. वाया ५. कर्णकटू ७. प्रमदा ८. अनभिज्ञ ९. नवनीत १०. कड १२. ललाट १३. रुपेरी १४. पराशर १६. पौर १८. मत १९. साय २०. पाऊलवाट २१. परसदार २२. लढाई २६. पक्ष २८. पूल २९. दाट ३०. दीर ३१. सुमार ३३. रास ३४. फोल ३५. परिसर ३६. दूध ३७. घमेंड ३९. बत्तीस ४०. बोटचेपेपणा ४१. धरणी ४५. गराडा ४६. वात ४७. कसब ४८. अवनत ५०. मारक ५३. पारावार ५४. आप ५५. त्याला देव देणार ५८. तसदी ५९. रुसवा ६१. कूच करणे ६४. सटवाई ६७. ताक ६९. रस ७१. नटी ७४. सिद्धीविनायक ७७. दगाबाज ७९. अग्रलेख ८०. खडे ८१. बुरूज ८२. वळ ८४. तार ८६. भाळी ८७. करामत ८९. परिवार ९१. अलका ९३. पराग ९४. लेंगा ९५. रोड ९६. पान ९८. धाबे १०१. डूख

## हरलो नाही, आम्हाला हरवले राजीनामा द्यायचा प्रश्नच नाही

पान १ वरून

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा हेही यात सहभागी होते. भाजपाने मतमोजणी केंद्रांवर ताबा मिळवला होता. आमच्या प्रतिनिधींना मतमोजणी कक्षात जाऊ दिले गेले नाही. सीआरपीएफ आणि बाहेरील गुंडांनी मारहाण केली. माझी गाडी थांबवली गेली. मलाही आत जाऊ दिले नाही. माझ्यावर हल्ला झाला. पोट आणि पाठीवर लाथा मारल्या. मला ढकलून बाहेर काढले. मी राजीव गांधी, मनमोहन सिंग आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह अनेक सरकारे पाहिली आहेत, पण असे अत्याचार मी कधीही पाहिले नाहीत. अशी निवडणूक कधी पाहिली नाही. मतमोजणीच्या पहिल्या फेरीनंतरच, भाजप १९५-२०० जागा जिंकत आहे, असे ते म्हणू लागले. आम्ही निवडणूक आयोगावर कारवाई करू. आम्ही आता काय करणार आहोत, हे मी उघड करणार नाही. पण आम्ही ५ खासदारांसह १० जणांची एक तथ्य-शोधक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

## प. बंगाल मुख्यमंत्री निवडीसाठी गृहमंत्री अमित शहा पर्यवेक्षक



नवी दिल्ली

**पश्चिम** बंगाल आणि आसाममध्ये विधानसभा निवडणुकांमध्ये मिळालेल्या दणदणीत विजयानंतर भाजपाने या राज्यांसाठी मुख्यमंत्र्यांची निवड करण्यासाठी पर्यवेक्षक आणि सहपर्यवेक्षकांची निवड केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पश्चिम बंगालचे पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले आहे, तर ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी सहपर्यवेक्षक असतील. ९ मे रोजी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल.

बंगाल निवडणुकीत अमित शहा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. उमेदवार निवडीपासून पक्षाचा जाहीरनामा तयार करण्याची जबाबदारी त्यांनी घेतली होती. त्यांनी पश्चिम बंगालमध्ये अनेक प्रचारसभा आणि रोड शोही केले होते. त्यामुळेच भाजपाच्या विजयानंतर पर्यवेक्षक म्हणून त्यांच्यावरच जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ते येत्या दोन-तीन दिवसांत पश्चिम बंगालमध्ये जाऊन भाजपा आमदारांशी चर्चा करणार आहेत. ९ मे रोजी नव्या सरकारचा शपथविधी होईल. या दिवशी रवींद्रनाथ टागोर यांची जयंती आहे, अशी माहिती भाजपाचे पश्चिम बंगालचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य यांनी दिली.

### तामिळनाडूत त्रिशंकू

तामिळनाडूत सिनेअभिनेते विजय यांच्या टीव्हीकेने १०८ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आला आहे. मात्र, बहुमतासाठी ११८ जागांची गरज असल्याने टीव्हीकेला अजून १० जागांची जुळवाजुळव करावी लागणार आहे. यासाठी टीव्हीकेला द्रमुक किंवा अण्णाद्रमुक यांची मदत घ्यावी लागणार आहे. टीव्हीकेची प्रमुख विजय यांनी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्ले करांना पत्र लिहून सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रण देण्याची विनंती केली आहे. तसेच विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्याची मागणीही केली आहे.

ममता बॅनर्जी यांना पराभूत करणारे सुवेंदू अधिकारी यांच्याच गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडणार, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. सुवेंदू अधिकारी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून ममता बॅनर्जींच्या विरोधात एकहाती लढा देऊन भाजपाला पश्चिम बंगालमध्ये यश मिळवून दिले आहे. ते अमित शहा यांच्या मर्जीतील आहेत. मात्र, भाजपा अनेकदा धक्कातंत्राचा वापर करते. तसा तो पश्चिम बंगालमध्येही वापरणार का, याबद्दल उत्सुकता आहे. अधिकारी यांच्याव्यतिरिक्त माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष, सध्याचे प्रदेशाध्यक्ष शामिक भट्टाचार्य, उत्पल ब्रह्मचरराव आणि स्वपन दासगुप्ता, रुपा गांगुली आणि अग्निमित्रा पॉल यांची नावे चर्चेत आहेत. आसामसाठी भाजपाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांची पर्यवेक्षकपदी निवड करण्यात आली असून हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी सहपर्यवेक्षक आहेत. पुद्दुचेरीसाठी मनसुख मांडविया आणि निर्मल कुमार यांच्या पर्यवेक्षकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## अहमदाबाद विमान अपघातामागे लिथियम बॅटरी दोष! वैमानिक निर्दोष

पान १ वरून

विमानाच्या यंत्रणांवर परिणाम होऊन दोन्ही इंजिनाचा इंधन पुरवठा करणारा स्वीच आपोआप बंद झाला, असा दावा करण्यात आला आहे. वैमानिकांनी कोणतेही बटण न दाबताही हा इंधन पुरवठा खंडित झाला, ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

बॅटरीतील बिघाडामुळे संपूर्ण नियंत्रण प्रणालीवर परिणाम होऊन विमान काही क्षणांतच नियंत्रणाबाहेर जाऊ शकते, असे या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. संघटनेने या दाव्याला पूरक तांत्रिक पुरावेही सादर केल्याचे सांगितले आहे. या पत्रानंतर नागरी विमान वाहतूक संचालनालय (डीजीसीए) आणि केंद्र सरकार यांची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हा दावा खरा ठरल्यास विमान प्रवासाच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात.


### जाहीर सूचना

जनतेच्या माहितीकरिता याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, दिवंगत श्री. अजित विष्णू खानोलकर हे सुभाष नगर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६० हा पत्ता असलेल्या, आघाडी को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट लि.च्या तळमजल्यावर स्थित गाळा क्र. ३ व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ३ अंतर्गत समाविष्ट क्र. २१ ते ३० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले १० समभाग (यापश्चात एकत्रितरित्या 'सदर मालमत्ता' असे उल्लेखित) चे संपूर्ण आणि नि:संशय मालक होते. सदर भाग प्रमाणपत्र क्र. ३ ची मूळ प्रत हरवली किंवा गहाळ झाली आहे आणि/किंवा अत्यंत परिश्रमपूर्वक शोधून देखील सापडत नाही.

सदर गहाळ मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ३ च्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, आर्थिक मोबदला, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार, देखभाल, वहिवाट, योजना, मृत्युपत्र किंवा बोजा या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती आहे की, त्यांनी त्याबाबत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास, असे कोणतेही दावे दुर्लक्षित करण्यात येतील आणि सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

दिनांक ६ मे, २०२६ सही/-

**सौ. पूनम साळसकर,**
ॲडव्होकेट
०१, तळमजला, सी विंग, प्रथमेश रेसिडेन्सी सीएचएस, देऊळवाडी, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९९.

रामेश्वर मीडिया



दि हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

**The Hindusthan Co-Op. Bank Ltd., Mumbai**

HEAD OFFICE : HORIZON TOWER, 1ST & 2ND FLOOR, JAI SHASHANK CO-OP. HSG. SOCIETY LTD., OPP. ATI, V.N. PURAV MARG, CHUNABHATTI, MUMBAI - 400 022. • Tel. No.: 022-24052121 / 2424 / 2525
Email : support@hindusthan.bank.in • Website : www.hindusthan.bank.in

### जाहीर सूचना (सर्व ग्राहक व सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शी सूचनांप्रमाणे तसेच Prevention of Money Laundering Act, 2002 (As amended) च्या तरतूदीनुसार, बँक मागणी करेल त्यावेळी तसेच पुढील विशेष बाबतीत KYC ची अद्यावत कागदपत्रे ग्राहकांनी सादर करणे बंधनकारक आहे.

KYC / Re-KYC / CKYC : रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शी सूचनांनुसार खाते उघडताना अद्ययावत KYC कागदपत्रे बँकेस सादर करणे अनिवार्य आहे. त्यावेळी सादर केलेल्या KYC कागदपत्रांची **मुदत संपली असेल अथवा दि. 30.06.2026 पर्यंत कालबाह्य होणार असल्यास** तर आपण दिलेल्या पत्त्यावर, पत्राद्वारे व आपल्या मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे संपर्क साधण्यात येईलच. आपणास विनंती की, आपण KYC (Know Your Customer) आणि OVD (Official Valid Document) पूर्ततेसाठी **नोटीस दिनांकापासून 30 दिवसांचे आत** अद्ययावत कागदपत्रे नजीकच्या शाखेत सादर करावीत. निर्धारीत वेळेत KYC अद्ययावत न केल्यास खात्यावरील व्यवहार तात्पुरते थांबवले (Freez/Restrict) जाऊ शकतात. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शी तत्वानुसार सेवा मर्यादित होऊ शकते. जर कागदपत्रांमध्ये काहीही बदल नसल्यास यासाठी Re-KYC करण्याबाबत "No Change Form" भरून द्यावा.

आपल्या खात्याची CKYC झाली आहे की नाही ते तपासण्यासाठी आपण CERSAI च्या अधिकृत **Website: https://www.ckycindia.in/kyc/single** वर आणि त्यांच्या Toll Free क्रमांक 7799022129 वर Missed Call देऊन सुध्दा माहिती घेऊ शकता. आपले खाते आमच्या बँकेसाठी बहुमूल्य आहे, ते व्यवहारपूर्ण चालू रहावे यासाठी आपण सहकार्य करावे.

त्याचप्रमाणे ज्या ग्राहकांकडे CERSAI चा CKYC क्रमांक आहे अशा ग्राहकांनी त्याची माहिती बँकेस सादर करावी. जर CERSAI नोंदणी प्रक्रिया अद्यापही अपूर्ण अथवा केली नसेल तर नजीकच्या शाखेशी संपर्क साधून ती प्रक्रिया यथाशक्य लवकर पूर्ण करून घ्यावी. कोणतीही कागदपत्रे बँकेस सादर करताना मूळ कागदपत्रे व त्याची झेरॉक्स प्रत समक्ष सादर करावी. तसेच तपासणीनंतर मूळ कागदपत्रे त्वरीत ताब्यात घ्यावीत.

**Inoperative / Dormant खात्यांसाठी :** आपण आपले खाते कोणत्याही कारणाने सलग एक वर्षे वापरले नसेल तर सदर खाते Inoperative म्हणून गणले जाते आणि दोन वर्षांनी आढावा घेऊन ते Inoperative केले जाते. सदर खाते पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आपण शाखास्तरावर उपलब्ध करण्यात आलेले निर्धारीत फॉर्म पूर्ण भरून व अद्यावत KYC कागदपत्रे सादर करुन व्यवहार करणे आवश्यक आहे. सलग दोन वर्षे खात्यामध्ये बॅलन्स शून्य रक्कम असणारी खाती तसेच ATM, POS, UPI, IMPS ही सुविधा घेऊन एकदाही त्याद्वारे **व्यवहार न केलेली चालू व बचत ठेव बँक खात्यांचा आढावा घेऊन बंद करण्यात येणार आहेत.** यासाठी आपले खाते जर अशा गटात येत असेल तर त्वरीत आपल्या शाखेशी संपर्क साधावा.

- **Updation of Mobile No./ Email ID/Nominee :** सध्या सायबर फसवणूकीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. सुरक्षिततेच्या कारणासाठी आपण 1] आपल्या खात्यास आपला ई-मेल व मोबाईल क्रमांक नोंदवावा 2] Message / SMS द्वारे संपर्कामुळे अप्रिय घटना टाळता येऊ शकतील. 3] कायद्यामधील बदलामुळे आता एका ऐवजी चार व्यक्तींची नामांकने प्रत्येक खात्यास नोंदविता येतात. या सुविधेचा लाभ घेऊन भविष्य सुरक्षित करावे.
- **किमान भाग रक्कम भरणा :** बँकेच्या कायम सभासदा करिता किमान भाग रक्कम रु. 1000/- (रु 25 प्रमाणे 40 भाग) धारण करणे गरजेचे आहे. ज्या सभासदांनी किमान भाग रक्कम धारण केली नाही त्यांनी 30/06/2026 पूर्वी आवश्यक भाग रक्कमेचा भरणा करावा. आपले सभासदत्व कायम राहील याची काळजी घ्यावी विहित वेळेत आवश्यक **भाग रक्कमेचा भरणा न केल्यास त्यांचे सभासदत्व रद्द होऊ शकते याची संबधितानी नोंद घ्यावी.**
- **लाभांश :** जे ग्राहक बँकेचे सभासद आहेत, त्यांनी आपली लाभांश रक्कम वेळेवर खात्यात जमा होण्यासाठी आपले अद्ययावत संलग्न बँक खाते सभासद खात्यास जोडावे.
- **लॉकरधारक:** आपण जर लॉकर सुविधेचा लाभ घेत असाल तर कृपया लॉकर भाडे करार नव्याने करून दिल्याची खात्री करावी आणि सदर लॉकर वर्षातून किमान दोन वेळा वापरावे.
- **DICGC** : ठेव खात्यातील रु. 5.00 लाखापर्यंतची रक्कम DICGC द्वारे विमाकृत असून याकरिता आपल्या खात्याची KYC अद्ययावत असणे आवश्यक आहे.
- **सायबर सुरक्षा :** कृपया तुमचे Debit Card, Mobile Banking, Internet Banking, UPI याबाबतची माहिती जसे की PIN, CVV, OTP, MPIN, TPIN इ. कोणालाही SMS/ E-mail / फोनद्वारे अथवा तोंडी अपरिचित व्यक्तींना शेअर करू नये. बँक कधीही तुम्हाला अशी माहिती विचारत नाही. याबाबत आपण नेहमी सतर्क रहावे. आपल्या बरोबर झालेल्या Online Cyber फसवणूकीची तक्रार 1930 या Cyber Cell क्रमांकावर करावी.
- **Money Mule Account :** आपले खाते स्वतःच वापरा. थोड्या रकमेच्या अमिषाला आर्थिक बळी पडू नका. आपले ATM कार्ड दुसऱ्या धोकेबाज व्यक्तींच्या हातात देऊ नका. आपल्याला अधिक चांगल्याप्रकारे सेवा देण्याची संधी द्यावी. अधिक माहितीकरिता नजीकच्या शाखा व्यवस्थापकांशी अथवा बँकेच्या Toll Free 1800 2006600 क्रमांकावर तसेच **support@hindusthan.bank.in** या अधिकृत Email वर संपर्क साधावा.

**मुंबई, दिनांक 06/05/2026** **मुख्य कार्यकारी अधिकारी**


## व्हाईट हाऊसजवळ पुन्हा गोळीबार चकमकीत संशयित हल्लेखोर जखमी

पान १ वरून

दिली. वॉशिंग्टन डी. सी.मधील १५ वा मार्ग आणि इंडिपेंडन्स ॲव्हेन्यू परिसरात गोळीबाराची ही घटना घडली. व्हाईट हाऊस कॉम्प्लेक्सच्या बाहेर गस्त घालणाऱ्या एजंटना एक संशयित इसम आढळून आला. त्याच्याकडे बंदूक असल्याचे पाहून सिक्रेट सर्व्हिस अधिकारी त्याची चौकशी करण्यासाठी त्याच्याजवळ जाण्याचा प्रयत्न केला असता त्याने अधिकाऱ्याच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युतरादाखल अधिकाऱ्यांनी केलेल्या गोळीबारात संशयित हल्लेखोर जखमी झाला. त्याला ताब्यात घेऊन रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती क्विन यांनी दिली. दरम्यान, हल्लेखोराने केलेल्या गोळीबारात एक अल्पवयीन पादचारीदेखील जखमी झाला असून त्यालाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे एका वृत्तसंस्थेने सांगितले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### 3rd Call RFx (E-TENDER) NOTICE

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender Fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000039506 | 3rd Call of AMC for replacement of installed failed Converter Transformer 298.6 MVA (including dismantling) by spare Converter Transformer (298.6 MVA) of either Pole-1 or Pole-2 in case of failure at HVDC Terminal Station, Padghe for the year 2026-27. | INR 50,00,000/- (including taxes) | INR 50,000/- | INR 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From - 06.05.2026 from 00:00 hrs. to 18.05.2026 up to 10:00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 18.05.2026 up to 10:00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 18.05.2026 at 11:00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 18.05.2026 at 13:00 hrs. (If possible) |

**Contact Person: The Executive Engineer (ADM),** HVDC RS (O&M) Circle, Padghe, Mob. No.: 9011021483
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**

Sd/-
**Superintending Engineer**
**HVDC RS O&M Circle, Padghe**



### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे आणि आमच्या अशिलाच्या सूचनेअंतर्गत सूचना देण्यात येते की, याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात **आदेश्री रिअलइस्टेट प्रायव्हेट लिमिटेड**, नोंदणीकृत कार्यालय - कार्यालय क्र. ०१, १ला मजला, फाईन मेंशन, २०३ दादाभाई नवरोजी रोड, फोर्ट, मुंबई-४००००१ (**"कंपनी"**) यांच्या मालकी, हक्क, शीर्षक आणि हितसंबंधांची आम्ही चौकशी करीत आहोत.

कंपनीने आमच्या अशिलास असे सांगितले आहे की (i) मालमत्तेवर बजाज हौसिंग फायनान्स लिमिटेडच्या नावे विद्यमान गहाणवट (**"विद्यमान गहाणवट"**) आहे, (ii) युनिट क्र. ६०१ सध्या नोंदणीकृत भाडेपट्टी करारनाम्याअंतर्गत **जॉन डीरे फायनान्शियल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**, पट्टेदार म्हणून, यांच्या ताब्यात आहे आणि, (iii) युनिट क्र. ६०२ सध्या नोंदणीकृत लिव्ह अॅण्ड लायसन्स करारपत्राअंतर्गत **ॲपडायरेक्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**, परवानाधारक यांच्याकडे परवानाबद्ध आहे.

वरील नमूद केल्यानुसार आणि त्या व्यतिरिक्त, स्वतंत्र व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपनी (कंपन्या), बँक(का), वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म(स), व्यक्तींची संघटना किंवा स्वतंत्र व्यक्तींचे स्थापित असलेले किंवा नसलेले मंडळ, सावकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेल्या परंतु त्यास मर्यादित नसलेल्या कोणा व्यक्ती/क्तींचा/एन्टिटी/एन्टीटींचा मालमत्ता आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भाग/तुकड्याच्या संदर्भात वारसा, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाणवट, तारण, प्रभार, वाटप, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, अभिहस्तांकन, भाडेकरू, भेट, हक्कसोड, देवाणघेवाण, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड/विभागणी, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देखभाल, वहिवाट, न्यास, ताबा, कुटुंब, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारपत्रे, भागिदारी, मार्गाचा अधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, संपादन, कंत्राट/करारपत्र, सामंजस्य करार, विक्रीचा करार, मुखत्यार पत्र, पर्याय, वाटप, प्रथम नकाराचा अधिकार, पूर्व हस्तांतरण किंवा कोणतेही दायित्व किंवा कोणतीही वचनबद्धता या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही लाभ, शीर्षक, दावे, आक्षेप, मागण्या किंवा हक्क किंवा कशाही प्रकारे हितसंबंध असल्यास, त्यांनी त्याबाबत सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत निम्न उल्लेखित पत्त्यावर लेखी कळवावे, असे न केल्यास अशा व्यक्ती/एन्टिटी(टीं)चे हक्क, शीर्षक, दावे, आक्षेप, लाभ, अधिकार, मागण्या आणि/किंवा हितसंबंध जाणूनबुजून आणि स्वेच्छेने सोडून दिले किंवा त्याग करण्यात आले असे समजण्यात येईल.

**वरील उल्लेखित मालमत्तेची अनुसूचीः**

**पहिली**

सायबरसिटी 'टॉवर-XII' या इमारतीच्या विंग "ए" च्या लेव्हल ६ वर स्थित आयटी कार्यालय क्र. ६०१, मोजमाप २२,०१९.५६ चौरस फूट (विक्रीयोग्य क्षेत्रफळ) [२३,४०० चौरस फूट (भाड्याने देण्यायोग्य क्षेत्रफळ)] ही वाणिज्य जागा व त्यासह त्यामधील अंतर्गत सजावट आणि मांडणी आणि त्यासोबत सामायिक क्षेत्र आणि सुविधांमधील हिस्सा आणि इमारतीच्या लोअर तळमजल्यावर तात्पुरते वाटप केलेल्या आच्छादित ३० (तीस) कार पार्किंग जागा आणि २४ (चोवीस) दुचाकी पार्किंग जागांच्या वापराचे अनन्य अधिकार, सदर इमारत पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीमधील आणि उप-निबंधक, हवेली क्र. ३, पुणे यांच्या कार्यक्षेत्रामधील, महसूल गाव हडपसर, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या सर्व्हे क्र. १४० (भाग), १४१ (भाग), १४२ (भाग) आणि १४३ (भाग), अंतिम भूखंड क्र. एमपीटीसीसी-४ धारण केलेल्या मोजमाप ५१,४१५.०६ चौरस मीटर्स जमिनीच्या सर्व खंड आणि तुकड्यांवर स्थित आणि वसलेली आहे.

**दुसरी**

सायबरसिटी 'टॉवर-XII' या इमारतीच्या विंग "बी" च्या लेव्हल ६ वर स्थित आयटी कार्यालय क्र. ६०२, मोजमाप २२,३०८.७४ चौरस फूट (विक्रीयोग्य क्षेत्रफळ) [२३,४०० चौरस फूट (भाड्याने देण्यायोग्य क्षेत्रफळ)] ही वाणिज्य जागा व त्यासह त्यामधील अंतर्गत सजावट आणि मांडणी आणि त्यासोबत सामायिक क्षेत्र आणि सुविधांमधील हिस्सा आणि इमारतीच्या लोअर तळमजल्यावर तात्पुरते वाटप केलेल्या आच्छादित ३० (तीस) कार पार्किंग जागा आणि २५ (पंचवीस) दुचाकी पार्किंग जागांच्या वापराचे अनन्य अधिकार, सदर इमारत पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीमधील आणि उप-निबंधक, हवेली क्र. ३, पुणे यांच्या कार्यक्षेत्रामधील, महसूल गाव हडपसर, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या सर्व्हे क्र. १४० (भाग), १४१ (भाग), १४२ (भाग) आणि १४३ (भाग), अंतिम भूखंड क्र. एमपीटीसीसी-४ धारण केलेल्या मोजमाप ५१,४१५.०६ चौरस मीटर्स जमिनीच्या सर्व खंड आणि तुकड्यांवर स्थित आणि वसलेली आहे.

सही/-
दिनांक ६ मे, २०२६
**बिलावाला अॅण्ड कं.**
**खरेदीदारांकरिता**
**ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स**
**करीम चेंबर्स, २ रा मजला, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.**

रामेश्वर मीडिया



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that, in furtherance of a tender/auction process in which my clients have been declared the highest bidder (L1), my clients propose to purchase the residential flat more particularly described in the Schedule hereunder written ("the said Flat") from **NATIONAL CO-OPERATIVE AGRICULTURE AND RURAL DEVELOPMENT BANKS' FEDERATION LTD.**, a co-operative federation having its registered office at 703, A-Wing, 7th Floor, BSEL Tech Park, Opposite Vashi Railway Station, Navi Mumbai – 400 703, holding PAN AAAAN1568P ("the Vendor"), the Vendor having represented itself to be the absolute owner of the said Flat free from all encumbrances and being the holder of the share certificate issued by the concerned co-operative housing society in respect thereof.

Any person having any claim, right, title, interest, share, mortgage, charge, lien, lease, tenancy, licence, gift, trust, inheritance or any other claim of whatsoever nature in or in respect of the said Flat is hereby called upon to intimate the same in writing, with documentary proof, to the undersigned within **FOURTEEN (14) DAYS** from the date of publication hereof, failing which any such claim shall be deemed to have been waived and/or abandoned and my clients shall complete the said purchase treating the Vendor's title as clear, marketable and free from all encumbrances.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

ALL THAT piece and parcel of residential premises bearing **Flat No. 903** admeasuring approximately 91.9 sq. mtrs. built-up area, situated on the **9th Floor of "B" Wing** of the building known as **"SAFAL TWINS"**, constructed on land bearing CTS No. 396 of Village Deonar, Taluka Kurla, situate, lying and being at **Chembur, Mumbai – 400 088**, together with one (1) covered car parking space and the proportionate undivided right, title and interest in the land beneath the said building and in the common areas, amenities and facilities thereof, and the membership of **Safal Twins Co-operative Housing Society Limited**.

Date: 6th May, 2026
Place: Mumbai

Sd/-
(Sangram Chinnappa)
Advocate
Address: 511, Prospect Chambers, D. N. Road, Fort, Mumbai - 400001.
Email:advsangramchinnappa@gmail.com
Mobile: 9028566747

नवा काळ

• मुंबई | बुधवार ६ मे, २०२६ • पान -८

# चार वर्षांनंतर भारतातून गव्हाची निर्यात पुन्हा सुरू



**नवी दिल्ली -** तब्बल चार वर्षांनंतर भारतातून गव्हाची निर्यात पुन्हा सुरु झाली आहे. देशातील विक्रमी उत्पादन, सरकारी साठ्यात झालेली वाढ आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढते दर यामुळे निर्यातीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र भारतीय गहू इतर देशांच्या तुलनेत महाग असल्याने मोठ्या प्रमाणात निर्यात होण्याची शक्यता कमी असल्याचे व्यापार क्षेत्रातील सूत्रांनी सांगितले. तीव्र उष्णता व पावसाने फिरवलेली पाठ यामुळे उत्पादन घटल्याने आणि गव्हाचा सरकारी साठा कमी झाल्याने भारताने २०२२ मध्ये गहू निर्यातीवर बंदी घातली होती. त्यानंतर २०२३ आणि २०२४ मध्येही निर्बंध कायम ठेवण्यात आले होते. मात्र गेल्या वर्षी अनुकूल हवामानामुळे गव्हाचे उत्पादन चांगले झाले. त्यामुळे सरकारी साठ्यातही वाढ झाली आणि निर्यातीला परवानगी देण्यात आली. केंद्र सरकारने यंदा सुरुवातीला २५ लाख टन गहू निर्यातीस मंजुरी दिली होती. त्यानंतर एप्रिलअखेरीस आणखी २५ लाख टन निर्यातीस परवानगी देण्यात आली. यानुसार एकूण ५० लाख टन गहू निर्यात करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## होर्मुजमध्ये इराणची ६ जहाजे बुडवली
### ट्रम्पच्या 'प्रोजेक्ट फ्रिडम'मुळे तणाव वाढला

■ वॉशिंग्टन

**होर्मुज** सामुद्रधुनी खुली करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आता अधिक आक्रमक झाले असून, ट्रम्प यांच्या आदेशाने होर्मुज परिसरात प्रोजेक्ट फ्रिडम नावाने विशेष लष्करी मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत अमेरिकेच्या नौदलाने इराणची सहा छोटी जहाजे उद्ध्वस्त केल्याचा दावा केला. तर अमेरिकेच्या या कारवाईला प्रत्युत्तर म्हणून इराणने संयुक्त अरब अमिरातीच्या (यूएई)फुजैरा तेल क्षेत्रावर क्षेपणास्त्र हल्ला केला. त्यामुळे होर्मुजवरून तणाव आता प्रचंड वाढला आहे.

अमेरिकेच्या सेंट्रल



कमांडने (सेंट कॉम) दिलेल्या माहितीनुसार होर्मुज जलमार्गातून चाललेल्या तेलवाहू जहाजांना रोखण्याचा प्रयत्न करणारी इराणची किमान ६ छोटी जहाजे बॉम्ब हल्ला करून बुडवण्यात आली आहेत. ट्रम्प यांनी मात्र पोस्ट करून असा दावा केला की, अमेरिकेच्या नौदलाने इराणची सात छोटी जहाजे बुडवली आहेत. इराणकडील जहाजे संपुष्टात आली आहेत. इराणकडे आता काहीही शिल्लक राहिलेले नाही.

## मिरा-भाईंदर करवाढ रद्द करण्याचे आदेश! शिंदेंचा भाजपाला धक्का

■ भाईंदर

**मिरा-भाईंदर** महानगरपालिकेत भाजपाने केलेल्या मालमत्ता करवाढीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आक्षेप घेत थेट करवाढ रद्द करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सत्ताधारी भाजपाला हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. पालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी एप्रिलपासून नव्या मालमत्तांवर वाढीव दराने कर आकारणी करण्याचा निर्णय भाजपाने घेतला होता. त्यानुसार रहिवासी मालमत्तांच्या करात सुमारे ६० टक्के वाढ करून प्रशासनाने त्याची अंमलबजावणीही सुरू केली होती. शिंदे गटाचे नेते राजू भोईर यांनी ही करवाढ बेकायदेशीर असल्याची तक्रार उपमुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यांच्या मते, १८ फेब्रुवारीच्या महासभेतील निर्णय विषयपत्रिकेच्या कक्षेबाहेर जाऊन घेतला. तक्रारीची दखल घेत शिंदे यांनी नगरविकास विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना करवाढ रद्द करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

## लोकलच्या गर्दीचा बळी ठरलेल्या प्रवाशाच्या कुटुंबाला ८ लाख भरपाई

**उच्च न्यायालयाचा निकाल**

■ मुंबई

**जोगेश्वरी** रेल्वे स्थानकावर गर्दी असलेल्या लोकल ट्रेनमधून पडून एका १६ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना १७ वर्षांपूर्वी घडली होती. मुंबई उच्च न्यायालयाने या मृत प्रवाशाच्या कुटुंबाला ८ लाख रुपयांपर्यंतची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. पश्चिम रेल्वेने दावा केल्याप्रमाणे रेल्वे रुळ ओलांडताना हा मृत्यू झाला नसून धावत्या ट्रेनमधून पडल्यामुळे झाला, असे न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले.

न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकलपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. आरोग्यराज चेटीयार या १६ वर्षाच्या मुलाचा



२० जून २००९ रोजी जोगेश्वरी रेल्वे स्थानकाजवळ प्रवाशांच्या गर्दीमुळे लोकलमधून पडून मृत्यू झाला होता. आरोग्यराजच्या मृत्यूप्रकरणी त्याच्या कुटुंबियांनी भरपाईसाठी रेल्वे प्राधिकरणाकडे दावा केला आहे. परंतु प्राधिकरणाने आरोग्यराजचा मृत्यू ट्रेनमधून पडून नव्हे तर रेल्वे रूळ ओलांडताना झाला असल्याचा निष्कर्ष काढत भरपाई नाकारली होती. त्यामुळे त्या कुटुंबियांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. या खटल्याची सुनावणी नुकतीच पार पडली. त्यावेळी न्यायालयाने रेल्वेचा दावा निव्वळ संशयावर आधारित असून, त्याला कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा नसल्याचे निरीक्षण नोंदवित मृत प्रवाशाच्या कुटुंबियांना एकूण ८ लाख रुपयांची भरपाई मंजुरी केली.

## फ्रेंच ओपनमध्ये कमी मानधन आघाडीच्या टेनिसपटूंकडून नाराजी

■ पॅरिस

**फ्रेंच** ओपन टेनिस स्पर्धेत खेळाडूंच्या मानधनात १० टक्के वाढ केल्याची घोषणा होताच आघाडीच्या टेनिसपटूंनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. स्पर्धेमुळे आयोजकांना होणाऱ्या कमाईच्या तुलनेत खेळाडूंना दिले जाणारे मानधन फारच कमी आहे, अशी टीका जैनिक सिन्नर, एरिना सबालेंका आणि कोको गौफ आदि आघाडीच्या टेनिसपटूंनी केली.

फ्रेंच ओपन स्पर्धेतून गेल्यावर्षी आयोजकांना ३९५ दशलक्ष युरोची कमाई झाली. ही वाढ १४ टक्के आहे. असे असताना खेळाडूंच्या मानधनात करण्यात आलेली वाढ समाधानकारक नाही. खेळाडूंच्या चमकदार कामगिरीमुळे स्पर्धेला प्रेक्षक मिळतात आणि प्रेक्षकांमुळे बड्या कंपन्या आयोजकांना भरघोस मानधन देऊन जाहीराती करतात. याचा सारा लाभ आयोजकांना मिळतो. ज्या खेळाडूंच्या जीवावर ही कमाई केली जाते त्यांनाच त्याचा लाभ मिळत नाही. आयोजकांच्या एकूण कमाईच्या अवघे १४.३ टक्के रक्कम खेळाडूंच्या मानधनावर खर्च केली जाते. ही रक्कम अत्यंत कमी आणि खेळाडूंसाठी अपमानजनक आहे, असे ठाम मत या खेळाडूंनी व्यक्त केले.

## लॉटरी किंग मार्टिन कुटुंबातील तिघांचा निवडणुकीत विजय



■ नवी दिल्ली

**'लॉटरी** किंग' म्हणून ओळखला जाणाऱ्या सँटियागो मार्टिन यांच्या कुटुंबातील तीन सदस्यांनी तामिळनाडू आणि पुद्दुचेरीतील विधानसभा निवडणुकांमध्ये उल्लेखनीय विजय मिळवला आहे. सँटियागो मार्टिन यांचे जावई अर्जुना रेड्डी, पत्नी लीमा रोज मार्टिन आणि पुत्र जोसे चार्ल्स मार्टिन यांना निवडणुकीत यश मिळाले आहे.

अर्जुना रेड्डी हे मार्टिन यांची मुलगी डेजी मार्टिन यांचे पती आहेत. ते अभिनेता-राजकारणी विजय यांच्या तमिळगा वेट्री कळगम (टीव्हीके) पक्षातील महत्त्वाचे नेते आहेत. त्यांनी विल्लीवक्कम मतदारसंघातून १७,३०२ मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे. पक्षाच्या निवडणूक मोहिमेचे सरचिटणीस होते.

मार्टिन यांच्या पत्नी लीमा रोज मार्टिन यांनी तामिळनाडूतील लालगुडी मतदारसंघातून विजय मिळवला. त्यांनी अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळगम (अण्णा द्रमुक) तर्फे निवडणूक लढवली होती. या मतदारसंघात द्रविड मुनेत्र कळगम (द्रमुक) आणि टीव्हीके उमेदवारांशी कडवी लढत झाली. परंतु त्यांनी २,५०० मतांच्या फरकाने बाजी मारली.

पुद्दुचेरीतील लक्षिया जननायका कच्ची पक्षाचे संस्थापक जोसे चार्ल्स मार्टिन यांनी कामराज नगर मतदारसंघातून १०,२०५ मतांच्या फरकाने विजय मिळवला. ते सँटियागो मार्टिन यांचे पुत्र असून, उद्योजक आहेत. या पक्षाने पहिल्याच निवडणुकीत चांगली कामगिरी करत दोनपैकी एक जागा जिंकली. हा पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग आहे.

## रामनाथ कोविंद-फडणवीस उपस्थितीत काळाराम मंदिरात आज धर्मध्वजारोहण

■ नाशिक

**माजी** राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या नाशिकमधील श्री काळाराम मंदिर येथे धर्मध्वजारोहण आणि गोदावरीची महाआरती होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमामुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर मंदिर येथे दर्शनपथ उभारण्याचा महत्त्वाचा प्रकल्प हाती घेतला जाणार असून, त्याचे भूमिपूजन ऑनलाईन पद्धतीने होण्याची शक्यता आहे. कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित रिंगरोडच्या



भूमिपूजनाबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. या रिंगरोडच्या संरेखनाला मुंगसारे, मातोरीसह काही गावांतील शेतकऱ्यांचा विरोध असल्याने प्रशासन सावध भूमिका घेत आहे.

## भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरण सुरेंद्र गडलिंग यांना जामीन मंजूर

**तरी तुरुंगातच राहावे लागणार**

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने भीमा कोरेगाव हिंसाचार आणि एल्गार परिषद प्रकरणी आरोपी वकील सुरेंद्र गडलिंग यांना ८ वर्षांच्या प्रदीर्घ कोठडीनंतर जामीन मंजूर केला आहे. प्रदीर्घ काळ तुरुंगवास आणि खटला सुरू न होणे या कारणांमुळे त्यांना जामीन मिळाला आहे. मात्र २०१६ च्या गडचिरोली जाळपोळ प्रकरणातील अटकेमुळे ते तुरुंगातच राहणार आहेत.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि कमल खता यांच्या खंडपीठाने गडलिंग हे ६ जून २०१८ पासून तुरुंगात असल्यामुळे आणि खटल्याची सुनावणी अद्याप सुरू न



झाल्यामुळे त्यांना जामीन दिला. भीमा कोरेगाव प्रकरणातील जामिनानंतरही ते २०१६ च्या गडचिरोली जिल्ह्यातील सूरजगड जाळपोळ प्रकरणातील प्रलंबित प्रकरणामुळे कारागृहातच राहतील. या जाळपोळ प्रकरणात सहभागी असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. गडलिंग हे या प्रकरणातील तुरुंगात असलेले शेवटचे आरोपी होते. या प्रकरणी यापूर्वी सुधीर ढवळे, शोमा सेन, वरवरा राव, अरुण फरेरा, व्हरनन गोन्साल्विस, गौतम नवलखा, सुधा भारद्वाज, आनंद तेलतुंबडे, हनी बाबू यांना जामीन मिळाला आहे. गडलिंग यांनी ज्येष्ठ वकील सुदीप पासबोला यांच्यामार्फत हा जामीन अर्ज दाखल केला होता. त्याला सरकारी वकिलांनी विरोध केला होता.

## मंत्र्यांच्या पत्नीला हरवणाऱ्या गायत्री भंगाळेंची निवड रद्द

■ जळगाव

**जळगावच्या** भुसावळ नगरपरिषदेत मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी रजनी सावकारे यांचा पराभव करणाऱ्या राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या गायत्री भंगाळे यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले आहे. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे राज्य शासनाने त्यांची नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदाची निवड रद्द केली आहे. जातपडताळणी समितीच्या अहवालानंतर शासनाने ही कडक कारवाई केल्याने भुसावळ नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद आता अधिकृतरित्या रिक्त झाले आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत गायत्री भंगाळे यांनी मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी रजनी सावकारे यांचा पराभव करत विजय मिळवला होता. त्यांच्या उमेदवारीसोबत सादर केलेले जात प्रमाणपत्र बनावट असल्याची तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत जातपडताळणी समितीने सखोल चौकशी केली. तपासाअंती भंगाळे यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवण्यात आले.

## नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथील दर्शन काळाबाजार प्रकरणी पाच आरोपींचा जामीन फेटाळला

■ नाशिक

**बारा** ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर मंदिर येथील दर्शन काळाबाजार प्रकरणात नाशिक न्यायालयाने पाच आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला आहे. या प्रकरणात मंदिर समितीचे विश्वस्त आणि शरद पवार गटाचे कार्याध्यक्ष पुरुषोत्तम कडलग यांच्यासह चार जणांना न्यायालयाने दिलासा नाकारला आहे.

व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली भाविकांकडून तीन ते सहा हजार रुपये उकळल्याचा आरोप या आरोपींवर आहे. न्यायालयाने हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्याचे नमूद करत जामीन अर्ज फेटाळला. पोलीस तपासात त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी काळाबाजाराचे संघटित रॅकेट कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. या रॅकेटचा सूत्रधार म्हणून पुरुषोत्तम कडलग यांचे नाव पुढे आले असून, त्यांनी आपल्या नातेवाईकांच्या मदतीने हा अवैध व्यवसाय चालवल्याचा आरोप आहे.

एजंटांमार्फत भाविकांकडून पैसे गोळा करून व्हीआयपी दर्शन मिळवून देण्याचे आमिष दाखवले जात होते. सामान्य दिवशी प्रति व्यक्ती २ ते ३ हजार रुपये, तर सणासुदीच्या काळात १० ते १२ हजार रुपयांपर्यंत दर आकारले जात असल्याचे उघड झाले आहे. आरोपी कडलग गेल्या २० दिवसांपासून कारागृहात असून, त्यांच्या बँक खात्यांमध्ये तब्बल १ कोटी १३ लाख रुपयांचे व्यवहार आढळले आहेत. यातील मोठा हिस्सा अवैध मार्गाने मिळाल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

## गडचिरोलीत नीट परीक्षेत एआयच्या मदतीने कॉपी

**दोन विद्यार्थ्यांवर गुन्हा**

■ गडचिरोली

**देशभरातील** वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाची मानली जाणारी नीट परीक्षा गडचिरोलीत हायटेक कॉपीप्रकरणी चर्चेत आली आहे. ३ मे रोजी झालेल्या परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांना मोबाईल व एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने कॉपी करताना पकडण्यात आले असून, त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिली घटना धानोरा मार्गावरील शिवाजी महाविद्यालयाच्या केंद्रावर घडली. नागभीड येथील २० वर्षीय विद्यार्थिनी संशयास्पद हालचाली करताना आढळली. तपासणीदरम्यान तिच्याकडून मोबाईल जप्त करण्यात आला. तसेच तिने मूळ प्रश्नपत्रिका कपड्यांमध्ये लपवून ठेवून निरीक्षकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. दुसरी घटना गोकुळनगर येथील शिवाजी महाविद्यालय केंद्रावर घडली. आष्टी येथील १७ वर्षीय विद्यार्थ्याला मोबाईलसह परीक्षा देताना रंगेहात पकडले. त्याच्या मोबाईलमध्ये प्रश्नपत्रिकेचे फोटो आणि एआयच्या माध्यमातून मिळवलेली उत्तरे असल्याचे आढळून आले. या दोन्ही प्रकरणांमध्ये परीक्षा केंद्र प्रमुखांच्या तक्रारीवरून गडचिरोली पोलीस ठाण्यात सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ अंतर्गत गुन्हे नोंदवून विद्यार्थ्यांचे मोबाईल जप्त केले.

## धार्मिक कारणासाठी दिलेल्या कागदपत्रांचा खरातकडून गैरवापर

**प्रतिभा चाकणकरांचा दावा**

■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदू अशोक खरातशी संबंधित समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीने कारवाई राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांची सुमारे ८ तास चौकशी केली.

या चौकशीदरम्यान प्रतिभा चाकणकर यांनी असा दावा केला की, माझे आणि मुलाचे आधार व पॅन कार्ड तपशील धार्मिक कामासाठी अशोक खरात याला दिले होते. मात्र, या कागदपत्रांचा गैरवापर करून खरातने त्यांच्या नावावर बनावट खाती उघडली. या खात्यांमध्ये नॉमिनी (वारसदार) म्हणून खरातने त्याचे नाव असून, खाते उघडताना मोबाईल क्रमांकही खरातचाच आहे. प्रतिभा



चाकणकर यांनी असा जबाब दिला असला तरी ईडीच्या तपासातून १ एप्रिल २०२५ ते १७ मार्च २०२६ या कालावधीत प्रतिभा चाकणकर व अशोक खरात यांच्यात २३० हून अधिक फोन कॉल आणि २०० पेक्षा जास्त संदेशांची देवाणघेवाण झाल्याचे उघड झाले आहे. प्राथमिक तपासानुसार २०२१ मध्ये जमा झालेली सुमारे २६ लाख रुपयांची रक्कम एका खात्यात वळवण्यात आली होती. ही रक्कम २०२४ पर्यंत ठेवून त्यावर सुमारे ४० लाख रुपयांचा परतावा मिळाल्याचा संशय आहे. या प्रकरणात प्रतिभा चाकणकर यांच्यासह त्यांचा मुलगा तन्मय चाकणकर यालाही ईडीने समन्स बजावले आहे.

## तृणमुलच्या पराभवाचा आनंद नको राहुल गांधींनी कार्यकर्त्यांना सुनावले

■ नवी दिल्ली

**पश्चिम** बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या झालेल्या पराभवावर आनंद व्यक्त करणारे काँग्रेसचे काही कार्यकर्ते आणि इंडिया आघाडीतील काही घटक पक्षांना राहुल गांधी यांनी खडे बोल सुनावले. तृणमूलच्या पराभवावर आनंद वाटून घेऊ नका, अशी पोस्ट राहुल गांधी यांनी केली आहे.

हे संकुचित राजकारण बाजूला ठेवा. पश्चिम बंगालमधील निकाल कोणत्याही एका पक्षाबद्दल नाही. हा भारताच्या लोकशाहीवरील गंभीर आघात आहे. काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील जे लोक तृणमूल काँग्रेसच्या पराभवामुळे आनंदित झाले आहेत, त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, आसाम आणि पश्चिम बंगालमधील बहुमत चोरलेले आहे. लोकशाही नष्ट करण्याच्या भाजपाच्या मोहिमेतील हे एक मोठे पाऊल आहे, असे राहुल गांधी पोस्टमध्ये लिहितात. अन्य एका पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा निवडणूक आयोगावर थेट आरोप केला आहे. भाजपा निवडणूक आयोगाच्या मदतीने हरणाऱ्या निवडणुका कशा जिंकते याची आसाम आणि पश्चिम बंगाल ही ढळढळीत उदाहरणे आहेत.



## मेट गालात ईशा अंबानींची चर्चा सोन्याची साडी! हिरेजडीत ब्लाऊज

■ न्यूयॉर्क

**न्यूयॉर्कमधील** मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट येथे मेट गालाचे आयोजन काल करण्यात आले आहे. फॅशन जगतातील या मोठ्या इव्हेंटमध्ये उद्योगपती मुकेश आणि नीता अंबानी यांच्या कन्या ईशा अंबानीने गौरव गुप्ता यांनी डिझाईन केलेली खास साडी नेसली होती. ही साडी सोन्याच्या धाग्यांनी विणलेली होती. या साडीवर त्यांनी २०० कोटी रुपयांचा हिरेजडीत ब्लाऊज परिधान केला होता. ईशा अंबानीच्या मेट गालातील या साडी आणि ब्लाऊजचा फोटो सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मेट गालाची यावर्षीची थीम कॉस्च्युम आर्ट ही होती. तर सर्व पाहुण्यांसाठी फॅशन इज आर्ट असा ड्रेस कोड ठेवण्यात आला होता. ईशा परिधान केलेल्या ज्वेलरी-इंटिग्रेटेड ब्लाऊजमध्ये आई नीता अंबानी यांच्या दागिन्यांच्या कलेक्शनमधील हिरवे पन्ने वापरण्यात आले होते. या ब्लाऊजवर १८०० कॅरेटपेक्षा जास्त हिरे जडवले होते. यामध्ये पन्ना, पोल्की आणि कुंदन यांचाही समावेश होता. हा खास पोशाख तयार करण्यासाठी ५० कलाकारांनी तब्बल १,२०० तास मेहनत घेतली.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून महाराष्ट्रातील दोन बँकांना दंड

■ मुंबई

**रिझर्व्ह** बँक ऑफ इंडिया (आरबीआय) ने महाराष्ट्रातील दोन बँकांना आर्थिक दंड ठोठावला असून, एका बँकेवरील निर्बंधांचा कालावधी वाढवला आहे. आरबीआयच्या आदेशानुसार, पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पंढरपूरला २ लाख रुपयांचा दंड केला आहे. अनुत्पादक (एनपीए) खात्यांसंदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे पालन न केल्याने ही कारवाई करण्यात आली. संबंधित बँकेने थकीत कर्जदारांना पुन्हा कर्ज सुविधा दिल्याचे तपासात आढळले होते. तसेच मोगवीरा को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबईला २० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

## अघोरी पूजेच्या नावाखाली १३ वर्षीय मुलीवर बलात्कार

**भोंदू बाबाला अटक**

■ डहाणू

**उपचाराच्या** आणि अघोरी पूजा करण्याच्या बहाण्याने एका भोंदूबाबाने १३ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना डहाणू तालुक्यात घडली. या प्रकरणी कासा पोलिसांनी आरोपी भोंदू बाबाला अटक केली आहे.

पीडित मुलगी १३ वर्षांची आहे. तिचा मासिक पाळीदरम्यान रक्तस्राव थांबत नव्हता. या समस्येसाठी ती ३० एप्रिल रोजी डहाणू येथील शिवराम परश सावर (५५) ह्या भोंदू बाबाला भेटायला गेली होती. भोंदू बाबाने तिला गावठी औषधोपचार करून बरे करेन, अशा भूलथापा दिल्या होत्या. त्यानुसार या पीडितेला अघोरी पूजा करून औषध देण्याच्या बहाण्याने ४ मे रोजी रात्री बारा वाजता कासा जवळील चरी पावण येथील स्मशानभूमीजवळ बोलावले. तिच्यासोबत असलेल्या व्यक्तींना बाहेर वाहनात थांबवून तिला जंगलात नेले आणि उपचाराच्या नावाखाली तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणाची कुठे वाच्यता केल्यास ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे मुलगी गप्प बसली होती. मात्र तिने काल हा प्रकार आपल्या कुटुंबियांना सांगितला आणि कासा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास करून भोंदू बाबा शिवराम सावर याला अटक केली. त्याच्यावर विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.